# इंदिरा.

लेखक,
शांताराम महादेव सोनाळकर, वकील.

प्रकाशक,
हिंद एजन्सी,
बुकसेलर्स आणि पब्लिशर्स,
मुंबई नं. ४.

किंमत १२ आणे.] [एप्रिल १९१४.

मुद्रक-**चिं. स. देवळे**, मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीज्
होम, सँढर्स्ट रोड, गिरगांव-**मुंबई.**

प्रकाशक-**नारायण नरसो केतकर**, म्यानेजर, हिंद एजन्सी, बुकसेलर्स
आणि पब्लिशर्स, माधवबाग, **मुंबई.**

# अर्पणपत्रिका.

तीर्थरूप

सौ० मातोश्रीस

प्रेमपूर्वक

अर्पण.

ग्रंथकर्ता.

# प्रस्तावना.

अप्रसिद्ध व नवीन लेखकाला प्रेमळ मित्रांच्या साह्याची किती आवश्यकता असते याचा मला चांगलाच अनुभव आला. प्रस्तुत नाटक लिहितांना व नंतर-ही माझे परम मित्र श्री. यशवंत नारायण टिपणीस व श्री. गणेश नारायण टिपणीस यांनीं जी मदत केली ती जर मला न मिळती तर माझे हातून हें काम पार पडणें जवळ जवळ अशक्यच होतें. या मित्रद्वयाचे मजवर अगणित उपकार झाले आहेत. तसेंच श्री भारत नाटक मंडळींतील नटवर्गांनीं फारच मेहेनतीनें सदरील नाटक बसवून लोकादरास पात्र केलें त्याबद्दलही मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें. तसेंच या नाटकाचा तारीख ३० आगष्ट १९१३ रोजीं जळगांव येथें प्रथम प्रयोग झाल्या-पासून माझ्या ज्या ज्या मित्रांनीं मला प्रोत्साहन दिलें त्यांचा त्यांचा मी अत्यंत आभारी आहें. शेवटीं माझे मित्र श्री. केतकर व्यवस्थापक हिंदएजन्सी यांनीं हें नाटक शक्य तितक्या लवकर छापून प्रसिद्ध केल्याबद्दल व माझे मित्र. श्री. मार्तंड सखाराम प्रधान व वासुदेव पांडुरंग गुप्ते यांनीं प्रुफें तपासण्याचें कामीं मजला साह्य केल्याबद्दल त्यांचे आभार मानून ही लहानशी प्रस्तावना संपवितो.

जळगांव
२५ एप्रील १९१४ } **शांताराम महादेव सोनाळकर.**

# इंदिरा.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

**स्थळ**—मानाजीरावाचा दिवाणखाना.

**माना०**—ठीक आहे. प्रतापराव, या सर्पाच्या शेंपटीवर तूं पाय देतो आहेस. जहाल कृष्णसर्पही एक वेळ आपला जातिस्वभाव विसरेल, परंतु हा मानाजीराव अपकार विसरत नाहीं, हें तुझ्या लवकरच प्रत्ययाला येईल. आजपर्यंत तुझ्या बहिणींकडे—इंदिरेकडे—पाहून तुझी गय करीत होतों. परंतु या पुढं या मानाजी-रावाविरुद्ध एक ब्र काढणं किती धोक्याचं आहे याचा तुला चांगलाच अनुभव येईल. आज अमात्य असलेला हा मानाजीराव वर्ष सहा महिन्यांचे आंतच या भव्य विजयनगरचा राजा होण्याच्या तयारींत आहे, याची तुला दादही नाहीं. अथवा नाहीं हेंच ठीक आहे. इंदिरेला मी आपल्या बरोबर खुषीनं राज्ञीपदावर चढविणार होतों परंतु तिनं माझ्या मागणीचा उघड उघड धिकार केला आहे. कांहीं हरकत नाहीं. मानाजीराव राजा झाला कीं, इंदिरा राणी झालीच पाहिजे, मग तिची खुषी असो वा नसो. आजपर्यंत एका दगडानं दोन पक्षी मारणाराला जगांत शहाणा ह्मणत आले आहेत. परंतु हा मानाजी आतां एका दगडानं तीन पक्षी मारून दाख-विणार आहे. इंदिरेवर विलासरावाची नजर आहे, तिचीही त्याच्यावर प्रीति आहे

व त्यांचंच लग्न होण्याचा संभव आहे. परंतु आमच्या विलासी जयदेव महाराजांच्याही नजरेस एक वेळ इंदिरा पडली आहे. आणि तेव्हांपासून त्या स्वारीला तिचा अगदीं ध्यास लागला आहे. ती मिळवून देण्याची कामगिरी आमचेवर आहे. हेंही एकपरी ठीकच आहे. हंबीरराव शिरके वारल्यामुळं त्यांची एकुलती एक मुलगी तारा त्यांच्या अवाढव्य संपत्तीची मालक झाली आहे. युक्ती प्रयुक्तीनं मी विलासराव तिच्या गळ्यांत बांधणार. नंतर इंदिरा जयदेवाकडून भ्रष्ट करविण्याचा घाट घालून तिथं अवचित प्रतापरावास पाठविणार. त्या मूर्ख परंतु आपल्या घराण्याच्या अब्रूकरितां जीव देणाऱ्या प्रतापरावाकडून जयदेवाचा वध करविणार. लागलीच त्याला कैद करण्याची व्यवस्था करणार व त्या राजघातक्याला सुळीं देऊन या विजयनगरच्या जनतेकडून हा मानाजीराव विजयनगरच्या रिकाम्या सिंहासनावर इंदिरेसह राजा होऊन बसणार. तेव्हां हा घाट बरोबर जुळवून आणण्याचे तयारीस याच घटकेपासून लागलें पाहिजे. ( तुकोजी येतो ) कोण तुकोजी ? काय खबर आहे ?

**तुको०**—आपल्या सांगण्याप्रमाणं प्रतापरावाच्या सर्व हालचालीवर बारीक नजर ठेविली आहे. व अशी बातमी लागली आहे कीं, प्रतापराव दरबारांत येऊन आपल्या विरुद्ध महाराजांजवळ कागाळी करणार आहे.

**माना०**—हं ! असं काय ? तो आतां पुन्हां दरबारांत येऊं पहातो काय ? ठीक आहे, पहातां येईल. पण तुह्मांला दुसरी कामगिरी दिली होती त्याचं काय केलंत ?

**तुको०**—शहरांत ठिकठिकाणीं आपले साथीदार पसरून ठेविले आहेत. व प्रजेला जो त्रास होतो आहे तो महाराजांच्याच हट्टी व एककल्ली स्वभावामुळं होत आहे अशी लोकांची खात्री करण्याचे प्रयत्न रोज चालू आहेत. शिवाय ह्मटल्यावेळीं उपयोगीं पडतील असे तीन हजार जवान आज तयार करून ठेविले आहेत.

**माना०**—शाबास ! तुकोजीराव, शाबास ! वेळ आली ह्मणजे तुमची कामगिरी मी विसरणार नाहीं. तुह्मी जा आतां आणि हें पहा जातांना तारेला मी बोलावलं आहे ह्मणून कळवा. ( तुकोजी जातो. ) एक दैव अनुकूल असलं ह्मणजे काय होणार नाहीं ? पांच वर्षांपूर्वीं या विजयनगरांत यत्किंचित् सर-

-शार असलेला हा मानाजीराव आज अमात्यपदावर आहे. आमचे बलदेव महाराज वारल्यापासून आज चार वर्षांत माझ्या नशीबानं मला बराच हात दिला. महत्वाकांक्षी व कर्तृत्ववान् पुरुषानं दैव अनुकूल आहे तोंपर्यंतच आपलं इष्ट साधून घेतलं पाहिजे. एकदां दवडलेली संधि पुन्हां येईल ही अपेक्षा करणं मूर्खपणाचं आहे. आतां हा प्रतापराव दरबारांत येणार ! व माझ्याविषयीं खऱ्या खोट्या गोष्टी महाराजांच्या कानावर घालणार परंतु याच संधीचा फायदा घेऊन मी आपल्या कपट नाटकाचा पुढील अंक सुरूं करणार. एक एक सावज कसं आयतंच जाळ्यांत येत आहे ! ही पहा तारा आलीच ! ( तारा येते. )

**तारा**—मामा, मुरारराव आजच विजयनगरांत आले आहेत. व ते मला भेटायलाही येणार आहेत.

**माना०**—बाळे, मुरारराvांचा नाद आतां तुला सोडला पाहिजे. या मानाजीरावाच्या भाचीला मुरारराvापेक्षां श्रेष्ठ दर्जाचाच नवरा मिळाला पाहिजे. मी तुला कितीदां सांगितलं विलासरावांना वरण्यांत तुझं हित आहे.

**तारा**—मामा, माझं हिताहित कशांत आहे हें माझ्यापेक्षां तुह्मालाच अधिक कळतं खरं, पण माझं मन मात्र मलाच कळतं. विलासराव राजकुलीन आहेत, शूर आहेत, रूपानंही सुंदर आहेत पण माझं मन त्यांच्याकडे जात नाहीं याला मी काय करूं ?

**माना०**—परिचयानं आपोआप प्रीति उत्पन्न होईल. शिवाय यांत राजकारण आहे. महाराजांच्या मागं विलासराव या विजयनगरचे राजे होण्याचा संभव आहे !

**तारा**—हें राजकारण कांहीं मला समजत नाहीं. मला एवढं कळतं कीं तुह्मी ह्मणतां तसं फसवून विलासराव माझे व्हावेत अशी कांहीं माझी इच्छा नाहीं. इंदिराबाईचें प्रेम त्यांच्यावर आहे हें आपल्याला माहित आहे. इंदिराबाईची व माझी आपणच ओळख करून दिलीत. ती बिचारी मला आपली जिवाची मैत्रिण समजते. तिचा घात करणं पाप नाहीं कां ?

**माना०**—( स्वगत ) हं ! आतां पापपुण्यावर आली वाटतं पाळी ! आतां असं उपयोगी नाहीं. ( उघड ) तारे ! पापपुण्य मला चांगलं समजतं ! तुझ्यासारख्या पोरींनां आपलं हित कळत असलं तरी तें वडीलमाणसांना पाहिलंच पाहिजे. तें कांहीं नाहीं. मी ह्मणतो त्याप्रमाणं झालं पाहिजे. नाहीं तर बघ

मुरारराव तर नाहींतच पण विलासरावही हातचे जातील आणि तुला एखाद्या भ्याड व अजागळ नवऱ्याबरोबर जन्म काढावा लागेल.

**तारा**—पण मामा—

**माना०**—पोरी तुला माहित आहे तुझे बाबांनीं मरतांना तुला कुणाला देऊं केली आहे ती ? बोल ! साठ वर्षांचा थेरडा दौलतराव पाहिजे कीं विलासराव पाहिजे ?

**तारा**—पण दौलतराव तर जयदूर्गाच्या लढाईंत पडले ह्मणूनच मुरारराव त्यांच्या मिळकतीचा ताबा घ्यायला आले आहेत.

**माना०**—खुळे पोरी, दौलतराव जिवंत आहे, व लवकरच विजयनगरला येणार हें मला आतांच माझ्या हेरानीं कळवलं. त्यांनीं महाराजांचा अपराध केला आहे पण त्यांना क्षमा मिळवून देणं माझ्या हातांत आहे हें पुरं ध्यानांत ठेव. मी आतां दरबारला जातों आहे. माझं ऐकलं नाहींस तर दौलतरावाला महाराजां-कडून क्षमा मिळालीच ह्मणून समज. ( रागानें निघून जातो. )

**तारा**—अगबाई ! मामा तर रागानं निघून गेले, आतां कसं करावं ? एकीकडे आड आणि दुसरीकडे विहिर अशा पेंचांत मी सांपडलें आहें.

( जाते. )

## प्रवेश २ रा.

---

**स्थळ**--दौलतरावाचा वाडा.

[ दौलतराव व हिरोजी बोलत बोलत येतात. ]

**हि०**—मला अद्याप खरं नाहीं वाटत. आपण कांहीं आमचे धनीसाहेब नाहींत खास. दौलतराव माने जयदुर्गचे लढाईत ठार झाल्याचं प्रत्यक्ष सरकारांतून जाहीर झालं आहे.

**दौल०**—अरे वेड्या, तें जर खरं असतं तर मी तुला जिवंत दिसलों असतों का ?

**हि०**—मग काय ? खरंच तुम्ही जिवंत आहां ?

**दौल०**—पण मी जिवंत आहें हें कोणालाही कळतां कामा नये. नाहीं तर मी मेलोंच ह्मणून समज.

**हि०**—ह्मणजे ? जिवंत असायला कोणाची भीति आहे कीं काय ?

**दौल०**—होय, सध्यां तरी निदान आहे.

**हि०**—तें कां ?

**दौल०**—सांगतों–पण इथं दुसरं कोणी नाहीं ना ?

**हि०**—कोणी नाहीं धनीसाहेब, सर्व माणसांना मी रजाच देऊन टाकली आहे. तेव्हां वाड्यांत नोकरचाकर कोणीच राहिला नाहीं. मात्र माझा पुतण्या सावळ्या तेवढा आहे, पण त्यालाही आतां इतक्यांत दुध आणायला पाठविला आहे.

**दौल०**—ठीक ठीक–ऐक तर. जयदुर्गाच्या लढाईच्या आरंभीं महाराजांचा मला असा सक्त हुकुम झाला होता, कीं, माझ्या एक हजार शिलेदारांनिशीं मी जवळच्या एका टेकडीवर बसून असावं, आणि हुकुम झाला तरच तिथून

हलावं. पण लढाईत सारा जन्म गेलेल्या या दौलतरावाला तें माशा मारीत स्वस्थ बसणं कसं आवडणार? समोर मारे धुमश्चक्री उडते आहे, आणखी मीं मात्र ती स्वस्थपणानं पहायची हें मला कितीसें रुचणार? तरी पण हिरोजी, अशा स्थितींत मोठ्या शर्थीनं मी दोन घटका काढल्या—

**हि०**—वा वा! मी तर तसाच बसून सगळी लढाई पाहिली असती कीं!

**दौल०**—हिरोजी, त्या दिवसाचं स्मरण झालं ह्मणजे अंगांत वीरश्री चमकूं लागते. दोन प्रहर दिवस येईपर्यंत विजयश्री कोणाला माळ घालते हें निश्चयानं सांगतां येत नव्हतं. आमची शिकस्त चालली होती. पण तुर्क एक तसूभरही मागं हटेनात. तेव्हां जयदेव महाराजांनीं रागानं गर्जना करून आपला घोडा खानाच्या आंगावर घातला. त्याबरोबर लढाईचा रंग पालटला. महाराज लांडगे तोड करूं लागले. शेंकडों तुर्कांचीं प्रेतं पडलीं. हिरोजी काय सांगूं तुला? त्यावेळीं महाराज कुमार कार्तिकस्वामीप्रमाणं किंवा खड्गधारी बाल वीर अभिमन्युप्रमाणं दिसत होते. त्यांच्या प्रत्येक घावाबरोबर त्यांच्या तरवारींतून ठिणग्या पडत होत्या. त्यांच्या पराक्रमानं खानही क्षणभर चकित झाला. पण लागलाच सावरून महाराजांवर निकराचा मारा केला. उभयपक्षाचें बहुतेक सैन्य एका ठिकाणीं गोळा झालें आणि जी रणधुमाळी उडाली त्याची तर कल्पनाही होणार नाहीं. शत्रूचा जोराचा मारा महाराजांच्या खास पथकावर पडलेला पाहिल्याबरोबर विलासराव, प्रतापराव वगैरे वीर महाराजांच्या रक्षणार्थ धावले. त्यावेळीं मला कांहीं महाराजांच्या हुकुमाचं भान राहिलं नाहीं आणि मीही माझे शिलेदार घेऊन त्या गर्दींत घुसलों. ईश्वरानं खैर केली, नाहीं तर विजयनगरची राजलक्ष्मी त्याच दिवशीं विधवा झाली असती!

**हि०**—ह्मणजे?—

**दौल०**—ह्मणजे काय? आह्मी तिथं पोहोंचलों त्यावेळीं महाराज इतके युद्धलोलुप झाले होते कीं आपल्या आसपास कोण आहेत त्याची त्यांना शुद्ध नव्हती. खानानं त्यांना बहुतेक गराडा घातला होता. एकट्या महाराजांनीं खान आणि त्याचे तीन सरदार लढाईला गुंतवून ठेवले होते. खान एकाद्या चिरडीस गेलेल्या वाघाप्रमाणं चवताळला होता. त्यानं आपली अजस्र तलवार महाराजांवर उगारली. तो वार चुकविण्याकरितां महाराजांनीं घोडा वळविला तों संधि साधून

एका सरदारानं महाराजांच्या मस्तकावर प्रहार करण्याकरितां तलवार उचलली. माझी नजर महाराजांवर होतीच. हें संकट पाहून निमिषार्धांत मी असा सफाईचा वार केला कीं त्या सरदाराचा हात तरवारीसुद्धां तुटून पडला. एका क्षणाचा विलंब झाला असता तर महाराज आपल्याला अंतरले असते. पण इतक्यांत कोणी दुष्टानं माझ्या खांद्यावर सपाट्याचा वार केला त्यानं मी बेशुद्ध पडलों. पुढं काय झालं तें मला ठाऊक नाहीं. शेवटीं शुद्धीवर आल्यावर पहातों तों मी एका गोसाव्याच्या झोंपडींत खाटेवर पडलों असून तो माझी शुश्रूषा करीत आहे ! महिन्याभरांतच भवानीच्या कृपेनं आणि त्याच्या रानटी ओषधानं माझी जखम बरी होऊन मला पुनर्जन्म मिळाला.

**हि०**—पण सरकार, आपल्याला बरं वाटतांच घराकडे कसं नाहीं आपलं येणं झालं ?

**दौल०**—ऐक. त्यादिवशीं महाराजांचे प्राण वांचून आमची फत्ते झाली. ती केवळ माझ्यामुळं, हें जरी मला पक्कं ठाऊक होतं तरी मी महाराजांचा हुकुम मोडलेला ! हुकुम मोडणाराला आणि जयदेव महाराज सोडणार ? स्वप्नांतही आणायला नको. यानं हुकुम मोडला, तरी आज याच्या मर्दुमकीमुळं आपला प्राण वांचला इतका विचार त्यांच्या डोक्यांत कधींच यायचा नाहीं, हें मी जाणून होतों आणि ह्मणून आतां कसं करावं अशा विवंचनेंत तेथेंच एक संबंध महिना घालविला. शेवटीं शत्रूची कायमची खोड जिरवून आमचें लष्कर परत फिरल्याचें, तसेंच जयदुर्गाच्या लढाईत मी कामास आलों असं सरकारी रीतीनं जाहीर झाल्याचें मला कळलं. तेव्हां कुठं माझ्या जिवांत जीव आला. आणि मग खोटं नांव धारण करून घरीं येण्याचा मी विचार केला. अखेर मजल दरमजल करीत येथें येऊन तर पोहोंचलों.

**हि०**—पण सरकार, महाराज हल्लीं शहरांत आले आहेत त्यांना आपण जिवंत असल्याचा सुगावा लागला तर ?

**दौल०**—तें शक्यच नाहीं ! अरे मी कामास आल्याचें सरकारांतून जाहीर झालें आहेच. तेव्हां ती भीति नको ! कोणाच्या नजरेसच पडलों नाहीं ह्मणजे कोणालाही तसा संशय घेण्याचें कारण नाहीं. आणि शिवाय संधि साधून कोणाजवळून तरी मी खरी हकीकत महाराजांच्या कानावर घालून काय तो सोक्षमोक्ष

करून घेईन. पण तोंपर्यंत मात्र लोकवार्तेप्रमाणं मी मेलों आहें असेंच मला राहिलें पाहिजे ! तेव्हां हिरोजी असें कर. वाड्यांत कोणाही माणसाला कांहींही कामानिमित्त येऊं द्यायचं नाहीं, आणखी माझा जीव तुझ्या मुठींत आहे असें समजून वागायचं, हें नीट ध्यानांत ठेव !

**हि०**—ती नको आपल्याला काळजी ! पण सरकार, आपले पुतणे मुरारराव आपले वारस ह्मणून दौलतीचा कबजा घेण्याकरितां शहरांत आल्याची बातमी आहे. ते वाड्यांत आले तर मग कसं करणार ?

**दौल०**—मुरारराव आला तर कसं करणार ? खरंच ! तो आला तर कसं करणार ? हा विचारच नव्हता माझ्या डोक्यांत आला !—मुरारराव मला ओळखणार तर खास नाहींच ! त्याच्या बापाचं आणि माझं फाटून तो मुसलमानांच्या चाकरीस रहायला सहकुटुंब निघून गेला. त्यावेळीं मुरारराव अवघा चार वर्षांचा असेल नसेल ! त्यावर गेल्या वीस वर्षांत मीही त्याला पाहिला नाहीं व त्यानंही मला पाहिलेलं नाहीं ! तेव्हां मी कोण हें त्याला मुळींच कळविलं नाहीं तर ?—पण होय, त्यानं दौलतीचा कबजा घेऊन टाकला ह्मणजे मग ? का त्याला मसलतींतच घ्यावा ?—बरं पहातां येईल तो आलाच तर पुढं काय करायचं तें ! पण कायरे, हंबीरराव शिरकें वारल्याची बातमी आहे का इकडे ?

**हि०**—होय. ती बातमी तर दोन महिन्यापूर्वींच इकडे कळली आहे. तेव्हांपासून त्यांची एकुलती एक मुलगी तारा तिचे मामा अमात्य मानाजीराव यांचेकडेच असते. व त्यांचा लवकरच तिचं लग्न करण्याचा विचार आहे.

**दौल०**—खरं का ? मला आतां गेलं पाहिजे. बिचारा लढाई सुरूं होण्याच्या पूर्वींच वारला. त्यावेळीं मी जवळच होतों, तेव्हां त्यांनीं मला एक कामगिरी सांगितली आहे. तारेला आतांच गुप्तपणें भेटलं पाहिजे.

**हि०**—धनीसाहेब ! आतांच जायला नको. स्नान, जेवण झाल्यावर जावं सावकाश.

**दौल०**—आतांच गेलं पाहिजे. तसंच कारण आहे ! पण तुझ्याजवळ लपवून कशाला ठेवूं ? हें बघ तारा मला देण्याचा हंबीररावांचा बेत झालेला होता आणि माझीही या गोष्टीला समति आहे तेव्हां या योजनेप्रमाणें आतां लवकरच मंगलकार्य उरकून घेण्याचा मनोदय झाल्याचें तिला आधीं कळविलें पाहिजे.

हि०—सरकार, मी स्वप्नांत तर नाहीं ! काय ! आपण लग्न करणार !

दौल०—ह्मणजे ? मीं लग्न करूं नये कीं काय ? पहिलीनं अंतर दिलं, त्याला आज पंधरा वर्षं झालीं. हीं पंधरावर्षं मी विधुरपणांत कंठलीं. ह्मणून पुढंही तशींच कंठावीं कीं काय ? मी लग्न तर करणार, आणि तेंही त्याच पोरीशीं ! हें बघ. तुझा तो चुलता कीं पुतण्या कोण तो–दूध घेऊन आला, कीं तयार करून ठेविव तेवढं आधीं ! मी हा असाच वर जाऊन येतों ! ( जाऊं लागतो )

हि०—जी धनीसाहेब !

दौल०—( त्याला वेडावून ) ' जी धनीसाहेब ! ' बेवकूब कुठला ! आणि हें असं जोडे मारल्यासारखं आंबट तोंड घेऊन बाहेर जाऊं नको ! आणि लक्षांत ठेव, मला कोणी इथं चुकून पाहिलं तर मी तुझा ' धनीसाहेब' नव्हे, समजलास.

हि०—होय सरकार !

दौल०—मी मेलों आहें–जयदुर्गाच्या लढाईत कामास आलों आहें, हें विसरायचं नाहीं, समजलास ! ( दौलतराव जातो. ) ( सावळ्या येतो. )

साव०—काका, दूध आणलं आहे.

हि०—शाबास पोरा ! आतां असं कर तेवढं तापीव, नि साखर, वेलची, केशर, बदाम घालून छान तयार करून ठेव. अन् हें पहा–इथं एक गृहस्थ येतील. धन्यांचे ते जिवलग स्नेही आहेत बरं. त्यांनां काय हवं नको त्याची नीट विचारपूस कर ! मी हा असाच बाहेरून जाऊन येतों.

साव०—होय काका, हा मी जातोंच ! ( दोघे दोन्ही बाजूस जातात. पडदा पडतो. )

———

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—बाग.

( इंदिरा आणि विलासराव बांकावर बसले आहेत. )

**विला०**—इंदिरे, माझ्या मागणीचा स्वीकार करून मला आज धन्य केलंस ?

**इंदिरा**—महाराज, यांत आपल्याला धन्यता वाटण्यासारखं काय आहे ? उलट माझ्यासारख्या गरीब पोरीला पदरांत घेतल्याबद्दल मलाच धन्यता वाटते.

**विला०**—लाडके, हा विनय तुझ्या उदार अंतःकरणाची साक्ष देत आहे. या विजय नगरांतील कित्येक सरदार पुत्रांनीं आजपर्यंत या गोंडस हातांच्या प्राप्तीकरितां मागण्या घातल्या. प्रत्यक्ष अमात्य मानाजीरावाच्या मागणीचा तूं धिक्कार केलास. येवढी जबरदस्त नकारपरंपरा असतांना माझ्याच मागणीचा स्वीकार होईल अशी आशा करायला काय बरं जागा होती ? लाडके, तूं अमात्यांच्या मागणीचा स्वीकार करायला पाहिजे होतास. अग, आमात्य आजकाल या विजयनगरचे प्रतिमहाराजच आहेत ! ते ह्मणतील तें करायची त्यांची आज सत्ता आहे, त्यांची जर तूं पट्टराणी झाली असतीस तर या विजयनगरचं अनभिषिक्त राज्ञीपद तुझ्याकडे आलं असतं !

**इंदिरा**—महाराज, अभिषिक्त राज्ञीपदाचीही जर मला किंमत वाटत नाहीं तर अनभिषिक्त राज्ञीपद मला कसा मोह घालील ? माझ्या अंतःकरणांतल्या प्रेमाच्या सिंहासनावर विराजमान होणाऱ्या राजाच्या राज्ञीपदापेक्षां प्रत्यक्ष इंद्राणीपद मला कमी दर्जाचं वाटतं. कुबेराचं भांडार प्रेमधनाच्या पासंगालाही पुरणार नाहीं. प्रेमाची भरारी हत्ती, घोडे, पालखी, यांच्या सारख्या मानवी वाहनांच्या गतीला तेव्हांच मागं सारील. वल्लभाच्या प्रेमाच्या एका शब्दानं होणारं सुख हजारों दासदासींच्या सेवेनं होणाऱ्या सुखापेक्षां सहस्रपट अधिक आहे. आणि प्रेमविरहित राजवाड्यांतील मृदुशय्येला वल्लभाच्या गळ्यांत अस्सा

( विलासरावांच्या गळ्यांत हात टाकून) हात टाकून बसलेल्या प्रणयिनीस आसन झालेल्या एखाद्या मोडक्या झोंपडींतील फाटक्या गोधडीचीही सर येणार नाहीं.

**विला०**—शाबास ! लाडके शाबास ! खऱ्या प्रेमाची तुलना कोणत्याही नाशवत वस्तूशीं होणं शक्य नाहीं. त्यांतून तुझ्यासारख्या रूपगुणयुक्त कुमारीच्या प्रेमाला तर तुलनाच नाहीं.

**इंदिरा**—प्रणयीजनाला आपल्या प्रेमाच्या विषयाची किंमत वाजवीपेक्षां जास्त वाटते हेंच खरं.

**विला०**—या प्रेमवादांत तूं मला हार जाशील हें शक्यच नाहीं. तुझ्या या काव्यमय प्रेमांतून आपल्याला जडसृष्टींत उतरलं पाहिजे. तुझ्या माझ्या लग्नाला अद्याप कांहीं अडचणी आहेत. त्या दूर करायाच्या विचाराला आपल्याला लागलं पाहिजे.

**इंदिरा**—आतां कसल्या अडचणी ? माझ्या लग्नाच्या बाबतींत मला बाबांनीं पूर्ण मोकळीक दिली होती. त्यांच्यामागं दादांनींसुद्धां माझ्या मनाचा कल अमुकच दिशेला फिरला पाहिजे असं कधींही मला वाटूं दिलं नाहीं. माझा दादा फारच प्रेमळ आहे. त्याच्यासारखा भाऊ त्रिभुवनांत मिळणार नाहीं. मला यत्किंचित् दुःख झालं तर तो त्रिभुवन हालवून सोडील. आणि माझं सुखसाधन कितीही दुष्प्राप्य असलं तरी तो तें साध्य करण्यांत आपल्या स्वतःचे सुखावर पाणी सोडील.

**विला०**—प्रतापराव माझेही जिवलग स्नेही आहेत. ते आपल्या सुखाचे आड येतील हें शक्यच नाहीं. आपल्या लग्नाला त्यांची संमति मिळवणं ह्मणजे केवळ औपचारिक आहे. मला त्याबद्दल बिलकुल काळजी वाटत नाहीं. पण भीति आहे, ती निराळ्याच दिशेनं आहे.

**इंदिरा**—दादाची भीति नाहीं तर मग आतां भीति तरी कुणाची बाई ?

**विला०**—तुला माहितच आहे, कीं राजघराण्यांत माझा जन्म आहे. या विजयनगरच्या कायद्याप्रमाणं माझ्या विवाहाला महाराजांची संमति पाहिजे.

**इंदिरा**—मग त्याची इतकी कां काळजी ! आमचं घराणं पिढीजाद सरदारांचं ! आमच्या पूर्वजांनीं या विजयनगरच्या गादीकरितां प्राणसुद्धां दिले आहेत. त्यांत बाबा तर जयदेव महाराज युवराज असतांना त्यांचे गुरु होते. थोरले

महाराजांनीं युवराजांच्या शिक्षणाकरितां या राज्यांतल्या शेंकडों सरदारांमधून त्यांचीच निवड केली होती. आणि शेवटीं बदामीचे लढाईत महाराजांचे प्राण वांचविण्याकरितां त्यांनीं आपल्यां प्राणाचाही बळी दिला आहे. मला नाहीं वाटत महाराज आपल्या लग्नाच्या आड येतील ह्मणून !

**विला०**—इंदिरे, तूं भोळी आहेस. जगांतले व्यवहार तुझ्यासारख्या पवित्र अंतःकरणाचे माणसाला कळणं शक्य नाहीं. तुला वाटतं सगळं जग आपल्यासारखंच सरळ आणि शुद्ध आहे.

**इंदिरा**—पण आपल्या सुखाच्या आड महाराज कशाला येतील !

**विला०**—महाराज आपल्या सुखाच्या आड येतील असं माझं ह्मणणं नाहीं. ते उदार अंतःकरणाचे आहेत. पण महाराज तरुण आहेत. राज्यकारभारांत अद्याप ते फारसं लक्ष घालूं लागले नाहींत त्यामुळं मानाजीरावांचं त्यांच्याजवळ फारच वजन आहे. अमात्यांच्या सल्ल्याशिवाय ते कोणतीही गोष्ट करीत नाहींत. तेव्हां अर्थातच आपल्या लग्नाविषयीं ते त्यांचाच सल्ला घेणार. मानाजीरावाच्या मागणीचा तूं धिक्कार केला आहेस. अर्थात् ते चिडलेले असणार. तेव्हां ते आपल्या विवाहांत शक्य तेवढया अडचणी आणणारच. शिवाय तुझी मैत्रिण तारा, ती अमात्यांची भाची आहे, व सध्यां तर ती त्यांच्या जवळ राहत आहे. तेव्हां तिच्या सुखाकडे अमात्यांचं साहजिक जास्त लक्ष असणार. त्यांचा घाट तिला माझ्या गळ्यांत बांधायचा आहे. त्याबद्दल उडत उडत त्यानं एक दोनदां माझ्याजवळ गोष्ट सुद्धां काढली होती. आतां या एकंदर गोष्टींचा विचार केला तर तूंच सांग, हें काम तुला वाटतं तेवढं सोपं आहे का ?

**इंदिरा**—खरंच. परवां मी सहज विजयेश्वराच्या दर्शनाला गेलें होतें. त्यावेळीं महाराजही देवदर्शनाला येणार आहेत हें मला कांहीं माहित नव्हतं. मी आंत गेलें. महादेवाला प्रदक्षणा केली. इतक्यांत महाराज तिथं आले त्यांच्याबरोबर मानाजीरावही होतेच. माझं सहज त्यांच्याकडं लक्ष गेलं. तर त्यानीं बाई लागल्याच कपाळाला आठया घातल्या, आणि डोळे अगदीं लाल केले. मी बाई अगदीं भिऊन गेलें. पण इतक्यांत हांसरं तोंड करून, त्यांनीं कांहीं महाराजांच्या कानांत सांगितलं. महाराजही माझ्याकडे टकमक पाहूं लागले. माझं लक्ष अमात्यांच्याकडे होतंच. त्यांनीं हें सगळं पाहून ते असे हंसले कीं माझं काळीज भीतिनें चर्र् झालं. मी जेमतेम देवाला नमस्कार केला आणि घरीं आलें.

**विला०**—परवां दरबारांत असाच प्रकार झाला. प्रतापरावांना अमात्यांच्या-बद्दल पक्का संशय आला आहे. जयदुर्गाच्या लढाईत महाराजांच्या प्राणावर बेतली असतां ऐनवेळीं अमात्य आले नाहींत त्यामुळं प्रतापराव भर दरबारांत अमात्यांना टाकून बोलले. मानाजीरावांनीं तीच संधि साधून महाराजांच्या मनांत उलट सुलट भरवून देऊन परवानगीशिवाय त्यांनीं दरबाराला येऊं नये ह्मणून हुकूम केला.

**इंदिरा**—खरं कीं काय ? आई जगदंबे, तूंच दादाची पाठीराखी आहेस. महाराज, आमच्या घराण्याचा असा अपमान कधींहि झाला नाहीं. दादाला अब्रू ह्मणजे प्राण आहे. त्याला हा अपमान सहन होणार नाहीं, आणि तो भलतं सलतं करील, त्याला कारण मीच. ( रडूं लागते )

**विला०**—हें काय ? लाडके, तूं अशी भिऊं नकोस. मी ही गोष्ट निकरावर येऊं देणार नाहीं. महाराजांची गांठ घेऊन धोरणा धोरणानं त्यांचा प्रतापरावांवरचा रोष मी कमी करीन. ( एक शिपाई येऊन पत्र देतो आणि मुजरा करतो. ) ( पत्र वाचून ) लाडके, सरकारांतून मला निकडीचं बोलावणं आलं आहे. मला आतां गेलंच पाहिजे. पुन्हां संध्याकाळीं मी जरूर येईन. तितक्यांत तूं ही हकीकत प्रतापरावाला सांगून, त्यांची संमति मिळवून ठेव.

**इंदिरा**—बरं आहे. मी संध्याकाळीं वाट पहात बसेन. ( विलासराव जातो. ) देवा ! तुझ्या कृपेनं मनुष्य प्राण्याला होणाऱ्या सुखाची योग्य कल्पना व्हावी ह्मणून का तूं त्यांत दुःखाचं मिश्रण करीत असतोस ! अथवा निर्भेळ सुखोपभोगांत मी तुला विसरेन अशी शंका येऊनच कां तूं माझ्या सुखाच्या पेल्यांत दुःखबिंदु टाकलास ? विलासरावाच्या मागणीनं झालेला आनंद घटका अर्ध घटकाही टिकला नाहीं तोंच दादाच्या दरबारांत झालेल्या अपमानाच्या बातमीनं त्याच्यावर साफ विरजण घातलं. अमात्यांच्या मनांत माझ्याबद्दल राग असेल तर ते विलासरावांवरही कांहीं संकट आणायला कमी करणार नाहींत. आई जगदंबे, तुलाच आमची काळजी आहे. या अनाथ लेंकराला धीर देउन योग्य मार्ग दाखविणारी तूंच आहेस. खऱ्या पतिव्रता संकटाला जुमानीत नाहींत. त्यांचीं संकटं ह्मणजे त्यांच्या उज्ज्वल कीर्तीच्या कसोटी असतात. त्या कसोटीला ज्या स्त्रिया उतरतात त्याच शेवटीं जगांत श्रेष्ठ ठरतात. मला माझ्याबद्दल फारशी

काळजी वाटत नाहीं. पण दादाबद्दल मात्र माझ्या जिवाला सारखी हुरहुर लागली आहे. त्याच्या मानी स्वभावाला हा अपमान सहन होणार नाहीं आणि रागाच्या भरांत तो भलतेंच कांहीं तरी करील. ( प्रतापराव येतो ) हा दादा आलाच. याच्या अपमानाची माहिती मला आहे हें याला कळूं नये.

**प्रता०**—ताई, तुला सगळ्या वाड्यांत शोधली. पण पत्ता लागला नाहीं. आज सकाळींच बागेंत काय काम होतं येवढं ?

**इंदिरा**—दादा, सकाळीं विलासराव तुला भेटायला आले होते. पण तूं घरांत नव्हतास. तेव्हां तूं येईपर्यंत त्यांची करमणुक व्हावी ह्मणून सहज बागेंत आलें

**प्रता०**—अस्सं ! बरं ताईसाहेब, विलासराव माझ्या भेटीला आले होते तर मी परत येईपर्यंत कां बरं थांबले नाहींत ?

**इंदिरा**—थांबलेच होते. परंतु इतक्यांत त्यांना महाराजांकडून निकडीचं बोलावणं आलं, ह्मणून निघून गेले.

**प्रता०**—आणि जातांना आपण कां आलों होतों, हें सांगायलाही विसरले.

**इंदिरा**—आणि मीसुद्धां विचारायला विसरलें.

**प्रता०**—तें व्हायचंच. पण त्यांचं आणि तुझं येवढं भाषण तरी काय चाललं होतं ?

**इंदिरा**—कांहीं नाहीं, पण दादा त्यांनीं जर एखाद्या मुलीला मागणी घातली असली तर तूं तिला काय ह्मणशील ?

**प्रता०**—त्या मुलीचं आणि त्यांचं कुलशील जर समान असलं तर तिला मीं भाग्यवान ह्मणेन. विलासराव शूर असून दिलदार आहेत. ते माझे स्नेही आहेत. त्यांचा राजघराण्यांत जन्म आहे. पण त्यांच्या कुळाला शोभेल अशीं घराणीं या विजयनगरांत थोडींच आहेत.

**इंदिरा**—पण या विजयनगरांतल्या मुलीलाच त्यांनीं मागणी घातली असं मी कुठं ह्मटलं ?

**प्रता०**—पण तेवढं समजायला कांहीं ज्योतिषाची जरूर नाहीं. मी सांगूं कुणाला विलासरावानीं मागणी घातली ती ?



इंदि०—पण अमात्य आहेतना ?
प्रता०—अमात्यांचा याच्याशीं काय संबंध ?
फोटोग्राफर्स गुरुदास ॲन्ड को.]

**इंदिरा**—सांग पाहूं.

**प्रता०**--तुला. ( इंदिरा लाजते ) लाजूं नकोस, विलासराव तुला सर्वतोपरी योग्यच आहेत. आणि माझी तुमच्या लग्नाला पूर्ण संमति आहे. माझ्यावरची जबाबदारी अशा गोड रीतीनं दूर झाली यांत मला आनंदच आहे.

**इंदिरा**—पण दादा हें तुला कसं कळलं ?

**प्रता०**—अग वेडे, आतांच इथून विलासराव गेले ना ? ते मला बागेच्या फाटकाजवळ भेटले आणि त्यांनींच मला सगळी हकीकत सांगितली.

**इंदिरा**—पण दादा विलासराव एक अडचण सांगत होते. आमच्या लग्नाला महाराजांची संमति पाहिजे. त्याची बाई मला मोठी काळजी वाटते.

**प्रता०**—अंः त्यांत काळजी वाटण्यासारखं काय आहे ? मी जाऊन महाराजांना सांगेन, आणि त्यांची संमति मिळवीन. आमच्या घराण्याचे आजपर्यंत राजघराण्याशीं कित्येक संबंध झाले आहेत.

**इंदिरा**—पण अमात्य आहेत ना ?

**प्रता०**— ( रागानं ) अमात्यांचा याच्याशीं काय संबंध ? आमच्या घराण्यांतील मुलींनीं कुणाशीं लग्न लावावं हें आह्मी आमात्यांना विचारीत नाहीं.

**इंदिरा**—दादा रागावूं नको. पण अमात्यांचा या लग्नाशीं संबंध आला आहे.

**प्रता०**—काय ? तूं काय बोलतेस, मला कांहींच समजत नाहीं.

**इंदिरा**—दादा क्षमा कर. मी एक गोष्ट तुझ्यापासून चोरून ठेविली आहे. मानाजीरावांनीं मला मागणी घातली होती, आणि ती मी नाकारली.

**प्रता०**—काय ? त्या जंबुकानं सिंहिणीला मागणी घातली ? कावळ्यानं कोकिळेच्य[1] समागमाची हांव धरली ! नीचा मानाजी ! तूं आमच्या कुळाचा अपमान करायचा विडाच उचलला आहेस काय ? ठीक आहे. तूं आपल्या पापाचे घडे असेच भरीत रहा. वेळ आली ह्मणजे या सगळ्यांचा चांगलाच चचपा काढीन. बरं आहे, ताई तूं आतां घरांत जा. मी या गोष्टीबद्दल योग्य विचार करीन. ( इंदिरा जाते. )

**प्रता०**—मानाजीराव, आमच्या घराण्याचा हा दुसरा अपमान. तुला वाटत असेल कीं आपण अमात्य आहों, प्रतिमहाराज आहों. आपलं कुणाच्यानं वांकडं होणार आहे? पण लवकरच तुझ्या ध्यानांत येईल, कीं हा तुझा भ्रम आहे. मला तुझ्याबद्दल इतके दिवस नुसता संशय होता, पण या चार सहा दिवसांत माझी पुरी खात्री झाली. दरबारांत माझा अपमान केल्यापासून मी तुझ्या पाळतीवर आहें. तूं जातोस कुठं, तुझे हस्तक कोण आहेत, ते कुणाला भेटतात, त्यांचीं काय काय खलबतं होतात याची माहिती तुला नसेल इतकी मला आहे. वेळ तर येऊं दे, कीं तुझे सगळे बेत ढांसळून तुझे दांत जर तुझ्या घशांत घातले नाहींत तर नांवाचा प्रतापरावच नव्हे!

( जातो. )

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—वाड्यांतील पुढील चौक.

( मुरारराव व श्रीधरपंडित बोलत बोलत प्रवेश करितात. )

**श्रीध०**—अरे कोण—वाड्यांत कोणी आहे कीं नाहीं ?—हो ह्मणायला तर कोणीच दिसत नाहीं ! मुरारराव—नाहीं नाहीं—चुकलों—माफ करा—सरदार साहेब!—कारण, आतां तसेंच ह्मटलें पाहिजे ! वाडा असा हा उघडा टाकून सारे चाकर नोकर गेले तरी कुठें ? काय ह्मणावं या हलगर्जीपणाला !

**मुरा०**—असेल, आंत कोणी तरी असेल !—अरे कोणी चाकर माणूस—कोणी आहे का रे ? ( सावळ्या येतो. )

**साव०**—( स्वगत ) हेच ते गृहस्थ ! पण बरोबर आणखीही एक दिसतो आहे. ( पुढें होऊन हात जोडून ) आपल्या सेवेला तयार आहें सरकार ! चलावं, वर दिवाणखान्यांत चलावं !

**श्रीध०**—थांब. ( कागद काढून वाचतो ) जाहिर करण्यांत येत आहें कीं, राजराजेश्वर जयदेव महाराजांचे पहिल्या दर्जाचे सरंजामदार, मनसबदार, दसहजारी सरदार दौलतराव माने राहणार शहर विजयनगर हे जयदुर्गाचे लढाईत तुर्कांबरोबर लढतांना सरकारकामास लागले, सबब त्यांचे पुतणे व विद्यमान वारस मुरारराव माने बेदर पातशाही मनसबदार, दरकदार, एकहजारी सरदार राहणार सांप्रत शहर विजयनगर हे राजेश्री श्रीधर पंडित उलाढाले, कलम बहाद्दर प्रांत बेदर हल्लीं वस्ती शहर विजयनगर यांचे मार्फत मयताच्या सरंजामी दौलतीचा व हरेक तऱ्हेच्या जंगम व झाडझाडोऱ्यासुद्धां स्थावर मिळकतीचा कबजा घेण्यास आले आहेत तरी—

**मुरा०**—अरे, त्या पोराला कां घाबरवतोस ? कायरे, सरदार दौलतराव मान्यांचाच हा वाडा ना ?

**साव०**—होय सरकार !

**मुरा०**—तुझ्यावांचून इथं हल्लीं दुसरं कोणी नाहीं वाटतं ?

**साव०**—नाहीं सरकार, यावेळीं दुसरं कोणी नाहीं. घर कारभारी हिरोजी होते पण ते आतां इतक्यांत कांहीं कामाला गेले, आपल्याकारितां त्यांनीं मला दूध तयार करून ठेवायला सांगितलं आहे !

**मुरा०**—( हंसून ) दूध ! ह्मणजे आह्मी आतां इतक्यांत इथं येणार हें अगोदर कळलं होतं तर ?

**साव०**—होय सरकार, कळलं होतं !

**मुरा०**—ठीक, ठीक. येऊं दे तर दूध.

**साव०**—जी सरकार.

**मुरा०**—श्रीधरपंत ! आधीं तेवढी घोड्यांची व्यवस्था करा.

**श्रीध०**—ठीक आहे सरदार साहेब ! ( इतक्यांत सावळ्या दुधाचे दोन पेले आणून ठेवितो त्यास ) ए पोरा !

**साव०**—जी सरकार !

**श्रीध०**—काय रे, तुझं नांव काय ?

**साव०**—सावळ्या, सरकार.

**श्रीध०**—सावळ्या ! अन् जात ?

**साव०**—मराठा.

**श्रीध०**—नांव सावळ्या अन् जात माराठा ! प्रतिज्ञेवर सांग ‘ माझं नांव सावळ्या आणि जात मराठा’ हें !–पण आधीं नीट बघ माझ्याकडे–नीट बघ माझ्याकडे ! आणि प्रतिज्ञेवर सांग मी मराठा सावळ्या ह्मणून !

**साव०**— प्रतिज्ञेवर ? प्रतिज्ञेवर कां ह्मणून नाहीं सांगणार !

**श्रीध०**—हं. मग ठीक ? बरं सावळ्या तेवढी पागा दाखीव बरं मला.

**साव०**—चला. ( दोघे जातात. )

**मुरा०**—( स्वगत ) अखेर आमची स्वारी या विजयनगरच्या पहिल्या दर्जाचे सरदार तर बनलीच. असल्या अवाढव्य संपत्तीचा एकटा मालक होणं हें भाग्य तर खरंच–पण त्यांतही थोडी उणीव आहे. हंबीरराव शिरके पादशाहींत असतांना तारा मलाच देणार होते. पण आतां कळतं कीं त्यांनीं मरतांना आमच्या जांवुवंत काकासाहेबांना ती देऊं केली होती. बरं झालं ! कीं काकासाहेब

लवकरच स्वर्गवासी झाले. नाहीं तर–पण जाऊं द्या–आतां काय त्याचं ?–शिरके विजयनगरांत आल्यापासून तारेचं मन पालटलं कीं काय हें समजत नाहीं. माझ्यावर जर पूर्वीप्रमाणंच तिचं प्रेम असेल तर माझ्या सुखाला सीमा नाहीं. तिचा बाप इकडे आला तेव्हांच मी तिची आशा सोडली. त्यावेळीं स्वप्नांतही इतक्या लौकर तिच्या माझ्या भेटीचा योग येईल असं वाटत नव्हतं. पण आमच्या काकासाहेबांच्या मरणानं तो योग आला. कित्येक माणसं जिवंतपणीं उपकार करितात पण माझ्यावर काकासाहेबांनीं मरून उपकार केले आहेत. खरोखर काकासाहेब तुमच्या सारखा उपकारी मनुष्य मिळणार नाहीं. ( दूध-पितो ) ( दौलतराव येतो. )

**दौल०**—( स्वगत ) आतां थोडं दूध प्यावं ( मुराररावास पाहून. ) अं ! हे कोण राव, दूध ढोसित बसले आहेत इथं ?

**मुरा०**—( दौलतरावास पाहून स्वगत ) हं ! हे कारभारी वाटतं ? ( उघड ) रामराम कारभारी, रामराम ! आह्मी आलों आहों, तुह्मी पहातांच—

**दौल०**—हो, तुह्मी आलां आहां–आह्मी पहातोंच आहों ! पण राव,–तुह्मी कोण ? अन् आलां कशाला ?

**मुरा०**—आह्मी कोण ? वा ! म्हणजे तुह्मी आमची थट्टाच मांडली आहे वाटतं ? आह्मी आतां येणार हें तुह्मांला कळलं नव्हतं तर सावळ्याला दूध तयार करून ठेवण्याची आज्ञा उगाच दिलीत कीं काय ?

**दौल०**–तें दूधही गट्ट केलंत का ? ठीक ठीक !–पण राव तुह्मी कोण ? कुठले ?

**मुरा०**—( लोडास ताठ टेकून कुर्‍यानें ) या इथलेच ! या सर्व दौलतीचे या वाड्याचे–आणि तुमचेही–धनी ! समजलं का आतां आह्मी कोण ते ? हें बघा, नीट अदबीनं आणि इमानानं रहाल, तर तुह्माला जागेवरून हालवायचा नाहीं ! नाहीं तर—

**दौल०**—मला तुह्मी जागेवरून हालवणार ? ब्रह्मदेव उतरला पाहिजे ! कोण हो तुह्मी ? नांव काय तुमचं ?

**मुरा०**–थेरडेबुवा ! तुमचा हा उद्दामपणा सरदार दौलतराव मान्याचे पुतणे मुरारराव चालूं देणार नाहींत बरं ! पुनः बजावतों ! नीट आदबीनं बोला ! नाहीं तर फुकट जागेला मुकाल !

**दौल०**--( स्वगत ) अरे बापरे ! हा तर मुराररराव हा तर इथं येऊन ठेपला देखील ! हें एक लचांडच झालं ! आतां कसं करावं, या स्वारीचा मनोदय तरी काय आहे, तो समजून घ्यावा, आणि तोपर्यंत हें कारभाऱ्याचंच काम करावं ! ( नम्रतेनं ) काय हुकूम आहे रावसाहेब ?

**मुरा०**—कारभारी ! असं करा. ते श्रीधरपंडित तिकडे घोड्यांची व्यवस्था लावायला गेले आहेत, त्यांना तेवढं इकडे लावून द्या. तसंच त्या सावळ्याला ह्मणावं कीं शिरक्याची ताराबाई घरीं आहे का पाहून ये.

**दौल०**—रावसाहेब, काय ह्मटलंत आपण ? शिरक्यांच्या ताराबाई !

**मुरा०**—होय. ताराबाई लवकरच तुमची धनीण होणार आहे समजलांत !

( दौलतराव आश्चर्यचकित होतो. )

**दौल०**—पण रावसाहेब, ताराबाई तर दौलतरावांना द्यायचं ठरलं होतं !

**मुरा०**—होय. काकासाहेब हयात असते तर तसं झालं असतं ! पण ( स्मित करून ) त्यांच्यामागें मीच त्यांचा वारस असल्यामुळं तिलाही मीच वरणार आहे.

**दौल०**—( स्वगत ) अरे शहाण्याच्या कांद्या !

**मुरा०**—कां बरं ? एकदम तुमची ही अशी काय चर्या झाली ? ताप तर नाहींना आला ?

**दौल०**—ताप नाहीं. संताप आला आहे. माझी बायको नि माझी दौलत दुसराच कोणीं उपटूं लागला—तर संताप कसा नाहीं होणार ?

**मुरा०**—तुमची बायको आणि तुमची दौलत ! ह्माताऱ्याचं डोकं तर नाहीं फिरलं ?

**दौल०**—होय डोकंच फिरलं आहे ! आतां सोंग नाहीं करवत । ऐक गाढवा ! तुझा काका अजून मेला नाहीं ! हा मी—मीच तुझा काका—समजलास ?

**मुरा०**—अं ? काय ह्मणतां ? तुह्मी माझे काका ? ( हंसून ) कोणाला खरं वाटेल हें ? तुह्मी कोणी वेडेपीर तरी आहां, किंवा महाठक तरी आहां !

**दौल०**—गाढवा ! मी सरदार दौलतराव माने समजलास !

**मुरा०**—झूट ! सगळं झूट ! काकासाहेब आज हयात असते तर या वाड्याचे मालक तेच असते व ते या पूर्वीच विजयनगरांत आले असते.

**दौल०**—पण त्याचं कारण असं—

**मुरा०**—बस्स, पुरे झालं कारण ! अगदीं पक्के बिलंदर दिसतां तुम्ही ! तुम्हाला सरकारांत पाठविलं पाहिजे.

**दौल०**—( स्वगत ) कपाळमोक्ष ! मग पुरीच गच्छंती ! ( उघड ) राव-साहेब ! तेवढं बरीक करूं नका ! सरकारांत पाठवून काय मिळवणार आपण ?

**मुरा०**—( स्वगत ) सरकारांत पाठवितों ह्मणतांच स्वारी कशी पण विरमली ! ( उघड ) राव, तुम्ही अगदीं महाठक आहां, याबद्दल आतां बिलकूल शंका राहिली नाहीं ! तुमची आतां चावडीवरच रवानगी करतों !

( इतक्यांत हिरोजी प्रवेश करतो. )

**हिरो०**—( स्वगत ) ही काय गडबड आहे ?

**दौल०**—हा हिरोजी आला ! हाच आतां खात्री करील मी कोण ही ?—हिरोजी सांग ह्याला मी कोण तें ? मी तुझा धनी सरदार दौलतराव कीं दुसरा कोण ?

**हिरो०**—( स्वगत ) मघाशीं खाशांनीं ताकीद दिली आहे, त्याप्रमाणेंच सांगायला हवं ! ( उघड ) काय ? माझे धनी दौलतराव माने ? कोण ह्मणतें तुह्मी ते ह्मणून ?

**दौल०**—अरे गध्या !

**मुरा०**—पहा, त्यांनीं खरं तेंच सांगितलं ! ( हिरोजीस ) हिरोजी तुम्ही काकासाहेबांच्या दिमतींतलेच, होय ना ?

**हिरो०**—होय.

**मुरा०**—मग असं करा, ह्या तोतया सरदारांची सरकारांत रवानगी करायची आहे, तेव्हां इथल्या महालकऱ्याकडे जाऊन त्यांनां सरदार मुरारराव मान्यांनीं आपला रामराम कळवून या गृहस्थांना आपल्याकडे पाठविलं आहे ह्मणून सांगा.

**हिरो०**—( स्वगत ) मुरारराव ! —ह्मणजे ही स्वारी दौलतीचा कब्जा घ्यायला आलीच वाटतं !

**दौल०**—गाढवा ! मी तुझा धनी दौलतराव नव्हे ? तुझी कणीक तिंबविल्या-वांचून ताळ्यावर नाहींस येणार तूं !

**हिरो०**—( दौलतरावाच्या कानांत ) पण धनीसाहेब आपणच मघाशीं मला ताकीद दिली ना, कीं, आपण खरे कोण तें सांगायचं नाहीं ह्मणून ? कशी पण शहाणपणानं वेळ मारून नेली ?

**दौल०**—चल, काळं तोंड कर इथून ! बरं पोरा, तुझी खात्री करायला आतां एकच खूण गोष्ट सांगतों ! गेल्या दिवाळींत तूं मला एक पत्र पाठविलं होतंस, त्याची आठवण आहे ? ‘ काकासाहेबांच्या भेटीचा सुयोग अद्याप आला नाहीं, हें बालकाचं दुर्भाग्य ’—

**मुरा०**—( स्वगत ) अं ? अगदीं पत्रांतलेच शब्द !

**दौल०**—‘ बालक सध्या पैशाच्या पेंचांत सांपडल्यामुळं आपली करुणा भाकित आहे, तर पत्रदर्शनीं एक हजार होनांची कुमक आल्यास कांहीं धड-गत आहे—’

**मुरा०**—( स्वगत ) अगदीं हुबेहुब माझेच शब्द ! बेशक, काकाच हे ! ( दौलतरावांचे पाय धरून, उघड ) काकासाहेब, गुन्हा झाला, माफ व्हावा ! आतां मला आपणाबद्दल मुळींच शंका राहिली नाहीं ! सरदार दौलतराव ते आपणच !

**दौल०**—कां, बघ कांहीं शंका बिंका असेल ! असो. आतां तरी तुझी खात्री झाली, का ? पण पोरा, तूं हें ढोंग तर नव्हतें केलेंस ?

**मुरा०**—ढोंग ? काकासाहेब, मला काय ठाऊक आपण हयात असून इथंच आहांत हें ? दरबारांतून आपण लढाईत पडल्याचं जाहीर नाहीं का झालं ?

**दौल०**—ह्मणून काय झालं ? उद्यां तूं लढाईत पडल्याचं दरबार जाहीर करील, ह्मणून तुला तें खरं वाटेल ? बरं असो आतां मी जिवंत आहें. मग मी आपली दौलत आणि बायको दुसऱ्याला बळकावूं देऊं का ? पण हें बघ, मी हयात असल्याचं एका पिसूलाही कळतां कामा नये बरें ! नाहींतर माझ्याशीं गांठ आहे ! चल ये हिरोजी !

**हिरो०**—होय सरकार !

**दौल०**—माझी बायको आणि दौलत उपटूं पहात होतास, नाहीं पोरा ? पण माझ्याशींच गांठ पडली—या ह्मातार्‍याशींच गांठ पडली, ह्मणून निभावलं !

**मुरा०**—पण काकासाहेब—

**दौल०**—चुप् ! बोलूं नकोस जास्त ! ऐकूं येत नाहीं मला आतां, हिरोजी चल ये.

( श्रीधरपंडित घाईघाईनें प्रवेश करतो. )

**श्रीध०**—( मुराररावास ) सरदारसाहेब ! ताराबाई घरांत आहेत ह्मणून सावळ्यानं निरोप सांगितला आहे.

**दौल०**--अस्सं ? मग मीच जातों तिकडे ! सरदारसाहेब, आपण इथून हलण्याचं आणि तसदी घेण्याचं कारण नाहीं ! आपण आणि हे पंडित इथंच बसा अन् आतां इतक्यांत मी आपल्याला बजावलं तें मात्र विसरायचं नाहीं ! ( दौलतराव व हिरोजी जातात. )

**श्रीध०**--सरदारसाहेब ! आपल्याला हें असं इथंच बसायला दरडावून सांगणारा हा ह्मातारा तरी कोण ?

**मुरा०**--हें पहा, सध्यां मला कांहींही विचारूं नको ! मी मोठ्या चमत्कारिक जागीं चमत्कारिक स्थितींत येऊन पडलों आहें !

**श्रीध०**—चमत्कारिक ? यांत काय संशय ? वाड्याची ही अशी सुंदर बांधणी, हे एकापेक्षां एक विस्तीर्ण चौक, हे राजविलासी दिवाणखाने, ह्या मनोहर गच्च्या, तशीच सभोंवार ही फळांफुलांनीं गजबजलेली नंदनवनतुल्य बाग, अशीं चमत्कारिक ठिकाणें एका विजयनगरांत मात्र पहायला मिळतात—इतरत्र नाहीं !

**मुरा०**—( श्रीधरपंडिताच्या बोलण्याकडे लक्ष्य न देतां स्वगत ) इतकंही करून सगळी इमारत ढांसळली—

**श्रीध०**—ढांसळली ? मुळींच नाहीं. सरदार साहेब मला तर वाटतं, कीं, ह्या इमल्याला कांहीं नाहीं तर आणखी हजारपांचशें वर्षेपर्यंत तरी दुरुस्तीसाठीं ह्मणून एक कपर्दिकही खर्च पडणार नाहीं.

**मुरा०**—( स्वगत ) फुकट फुकट—

**श्रीध०**—फुकट ? दुरुस्ती फुकट होईल ह्मणतां सरदार साहेब ? ह्मणजे संरजामी गांवचे बिगारी धरून आणून कीं काय ?

**मुरा०**—( स्वगत ) बिगारी ! मीच जन्माचा बिगारी झालों ! जगांत तोंड दाखवायला जागा नाहीं राहिली ! ( जातो )

**श्रीध०**—जन्माचा बिगारी ! तोंड दाखवायला जागा नाहीं राहिली ? ह्मणजे ! कुणाला ? ह्यांनां वेड तर नाहीं लागलं ? अकल्पित वैभवलाभ झाल्यानं डोळे फाटून डोकीं फिरल्याचीं उदाहरणं मीं पुष्कळ ऐकिलीं आहेत ! पण प्रत्यक्ष पहाण्याचा योग हा आजच आला ! सरदारसाहेब—सरदारसाहेब—( जातो. )

## प्रवेश ५ वा.

**स्थळ:**–राजदरबार–राजा जयदेव, तुकोजी व इतर सरदार.

**जय०**—काय ह्मणतां तुकोजी? प्रतापराव दरबारांत यायची परवानगी मागतो आहे!

**तुको०**—होय सरकार. रागानं भिवया चढवून कुर्रेबाज नजरेनं आपल्या हुकुमाची वाट पहात प्रतापराव पलीकडल्या दालनांत उभा आहे.

**जय०**—आमच्या मानाजीरावाबद्दल याच्या मनांत मत्सर उत्पन्न झाल्याचं आमच्या लक्षांत आल्यापासून याला, आह्मी दरबार बंद केला आहे.

**तुको०**—यामुळं सरकारचं हितच झालं आहे. त्याचं ते सशस्त्र शहरांतून फिरणं, आह्माला पाहातांच तिरस्कारानं हंसणं व आपमानकारक बोलणं यांनीं आमचं मस्तक कसं फिरून गेलं आहे. अलीकडे दरबारची टवाळी करण्यांत त्याचा सगळा वेळ जात असतो.

**जय०**—तरी त्याला या वेळीं विन्मुख पाठवतां येत नाहीं. त्याला एक बहीण आहे—

**तुको०**—होय. इंदिरा नांवाची एक सुंदर बहीण आहे खरी.

**जय०**—स्वर्गांतली इंदिराही तिची दासी शोभेल. तिच्याकरितांच आह्मी त्याला वाटेल तें बोलूं देतों, व त्याचं तें तिरस्काराचं बोलणं ऐकून घेतों.

**प्रता०**—( येऊन ) नाहीं. मी यापुढं बिलकूल थांबणार नाहीं. प्रतापराव दरबारांत जाण्यास परवानगीची वाट पहात नसतो. चला. बाजूला–व्हा. मी असाच आंत जाणार. ( मुजरा करून ) सरकार—

**तुको०**—खबरदार! उभे रहा! दरबारांत परवानगीवांचून येण्याचा तुह्माला काय हक्क आहे?

**प्रता०**—स्वामीहित साधणं हा प्रत्येक राजनिष्ठ प्रजाजनाचा हक्क आहे. त्याच हक्कानं मी आंत आलों आहें. सरकार—

**जय०**—प्रतापराव आपल्याला दरबारची मुभा आहे.

**प्रता०**—मी सरकारजवळ एक विनंति करायला आलों आहें.

**जय०**—आह्माला मान्य करतां येणार नाहीं अशी विनंति प्रतापराव केव्हांही करणार नाहींत अशी आमची खात्री आहे.

**प्रता०**—सरकार माझी विनंति अशी आहे कीं, ती राजांना मान्य करण्याचं मोठं संकट वाटतं ! सरकार, मला या राज्याची खरी स्थिती कळवायची आहे.

**जय०**—बोला काय तुमचं ह्मणणं आहे तें निर्भयपणें सांगा.

**प्रता०**—सरकार ! माझ्या विनंतीनं आपली दरबारी मंडळी चकित झाल्यासारखी दिसते. तेव्हां त्यांच्याबद्दलच प्रथम सांगतों. सरकार ! हे हांजीहांजखोर व खुशामती सरदार आपले हितशत्रु आहेत. यांचे हे हंसरे चेहरे, त्यावरील हें निष्कारण हास्य हेंच प्रजेच्या दुःखाची कल्पना आपल्याला होऊं देत नाहीं. आणि हेच लोक आपल्या दरबारांत आपल्या गांजलेल्या प्रजेचे हाल व त्यांच्या कागाळ्या ऐकूं येऊं नयेत ह्मणून एक प्रकारचें कृत्रिम वातावरण तयार करतात. व त्यामुळेंच प्रजेचीं दुःखें व त्यांच्या कागाळ्या सरकारचे कानावर येत नाहींत.

**जय०**—कोण गांजलं आहे व कोण कागाळ्या करतं ?

**प्रता०**—सर्व प्रजा गांजली आहे व सर्व कागाळ्या करीत आहेत. फरक इतकाच कीं, मी इथं प्रत्यक्ष सांगतों आहें व त्यांना दरबारांत शिरकाव नसल्यामुळं त्यांच्या कागाळ्या सरकारचे कानावर जात नाहींत. सर्व राष्ट्र दुःखानं गांजून गेलं आहे. आपल्या दरबारांत आज दिसणारी शांति ही खरी शांति नसून पुढं होणाऱ्या भयंकर भूकंपाचेंच सूचक आहे. आज आपलं राज्य वरवर स्फटिकासारखं स्वच्छ दिसत आहे. परंतु आंत मात्र सर्वत्र कुजून घाण झाली आहे. प्रजेची भरभराट नाहींशी झाली असून सर्वत्र अवनती झपाट्यानं पसरत आहे.

**जय०**—( स्वगत ) बेमुर्वत, हरामखोर—

**प्रता०**—सरकार ! आपले हे वैभवशाली राजवाडे, त्यांतील आरामवस्तु हीं मनोहर राजचिन्हें हीं सर्व नाटकांतील क्षणोक्षणीं बदलणाऱ्या देखाव्याप्रमाणं केव्हां नाहींशीं होतील याचाही नेम नाहीं. सरकार, एका सत्कृत्याची किंमत सहस्र रत्नांपेक्षांही जास्त आहे. व सदाचरणावर उभारलेली इमारत या भव्य राजवाड्यापेक्षांही टिकाऊ असते.

**तुको०**—( पुढें येऊन ) हं बस्स करा ! आपलं भाषण मर्यादा सोडून होत आहे.

**जय०**—बोलूं द्या त्यांना ! प्रतापरावाचं असलं भाषण ऐकून घेणारा राजा जुल्मी नाहीं, अशी त्यांची खात्री होईल.

**प्रता०**—सरकार, आपण जुलमी आहां, असं माझं ह्मणणं नाहीं. ईश्वरानं राजघराण्यांतील पुरुषांना अवश्य लागणारे गूण आपल्या आंगीं ठेविले आहेत. व आपलं हृदय पूर्ण प्रजावत्सल आहे. परंतु आपल्या भोंवतालच्या मंडळीनं आपल्याला पूर्ण ग्रासलं आहे. हे सर्व आपले हितशत्रु असून त्यांचा मुख्य तर पक्का राजद्रोही आहे !

**जय०**—राजद्रोही ! आपण कुणाबद्दल ह्मणतां हें ?

**प्रता०**— आपले आवडते-वरून हास्य पांघरणारे दांभिक-सध्याचे अमात्य.

**जय०**—हे अमात्य आलेच.

**प्रता०**—मूर्तिमंत राजद्रोह आहे. या नीचाच्या पापाचं माप त्याच्या पदरांत घालण्याची संधि मिळाल्याबद्दल मला फार आनंद वाटतो.

( मानाजीराव येतो. )

**माना०**—( राजाजवळ जाऊन ) सरकार, आपल्याला महत्वाची बातमी सांगण्याकरितां ( चपापून ) प्रतापराव दरबारांत !

**प्रता०**—होय. प्रतापरावच मी ! आणि मी सरकारला काय सांगत होतों याचीं माहिती पाहिजे असेल तर ऐका. राजद्रोह आणि मानाजीराव यांची सांगड घालून सरकारनां दाखवित होतों.

**माना०**—( तलवार अर्धी उपसून ) यावेळीं आपण राजसभेंत नसतों तर माझ्या संबंधीं बोलतांना कोणती भाषा वापरली पाहिजे हें माझ्या तरवारीनं तुला चांगलं शिकवलं असतं. सरकार, या नीतिशास्त्रविशारद निंदकानं आपल्या या इमानी नोकराबद्दल काय सांगितलं ?

**जय०**— ते तुह्माला—

**प्रता०**—राजद्रोही ह्मणाले ! आणि सरकार आपल्याला पुन्हां विनंति करतों कीं या कृष्णसर्पाबद्दल सावध असा. यानं आपल्या सशस्त्र गुंड लोकांनीं शहर सध्यां भरून टाकलं आहे. हूं, ह्मणतांच आपली मान चिरण्यास तयार असलेले तीन हजार लोक याचा पगार खाऊन आज शहरांत फिरत आहेत. विजयनगर सर्व खुनी लोकांनीं खच्चून भरून ठेवलं आहे.

राजद्रोह आज जरी लहानशा ठिणगीप्रमाणं दिसतो आहे तरी याचा लवकरच वणवा होईल व त्यांत आपली आणि आमच्यासारख्या राजनिष्ठ सरदारांची आहुती पडेल! सरकार, इतकं सांगूनही आपल्या डोळ्यावरचं पटल दूर होत नसेल तर जास्त बोलण्यांत काय अर्थ आहे! सरकार, माझं कर्तव्य मीं केलं मी आपली रजा घेतों. मी गेल्यावर आपल्या डोळ्यावरील पटल अधिक पुढं ओढून आपणाला स्वस्थ झोंप यावी ह्मणून ही मंडळी आपल्या स्तुतीचीं व माझ्या निंदेचीं गाणीं गावूं लागतील. ( प्रतापराव जाऊं लागतो त्यास मानाजीराव अडवून )

**माना०**—( प्रतापरावास ) थांबा! चाललेत कुठं?

**प्रता०**—तुझ्या हुकुमानं हा प्रतापराव थांबणार नाहीं. सरकार, दरबारची हवा मला अलीकडे मानवत नाहीं. मी रजा घेतों. शेवटीं एवढंच सांगणं आहे कीं, मानाजीरावाबद्दल सावध असा. ( जाऊं लागतो. )

**माना०**—नीचा! फिर मागं!

**प्रता०**—( तलवार उपसून ) प्रतापराव कमरेस तलवार बाळगतो हें लक्षांत ठेवा. ( जातो. )

**माना०**—गेला! निघून गेला! ह्मणूनच बचावला! नाहीं तर या मानाजीरावाला राजद्रोही ह्मणणाराचा काय शेवट होतो हें आतांच जगाला दाखविलं असतं! राजद्रोही! सरकार या सेवकाच्या कोणत्या कृतींत आपल्याला राजद्रोह दिसला?

**जय०**—आमच्याशीं आजपर्यंत तुह्मी कधीं कृतघ्नपणानं वागलां असं आह्माला ह्मणवत नाहीं.

**माना०**—सरकार, या मानाजीरावास आत्मश्लाघेची संवय नाहीं. मी जी आजपर्यंत सरकारसेवा केली त्यांत विशेष कांहींच नाहीं. तें मीं माझं कर्तव्य केलं. परंतु सरकार मी आपणाला विचारतों कीं, ज्यांनीं आपल्या वैभवाकरितां लढाया जिंकल्या, शत्रूचा धुव्वा उडवून आपली विजयी सेना विजयनगराला आणली, ज्यानं आपला डळमळीत राजमुकुट आपले मस्तकावर स्थिर केला, आपल्या यशाच्या व कीर्तीच्या वृद्धीकरितां ज्यानं रात्रीच्या रात्रीं जागून काढल्या, त्याच्या हातून राजद्रोह होईल काय? सरहद्दीवर वारंवार

होणारीं बंडं कोणीं मोडलीं ? स्वातंत्र्य या गोंडस नांवाखालीं या शहरांत चाललेला राजद्रोहाचा फैलाव कुणी बंद केला ? सरकार हें सर्व या मानाजी-रावानं केलं आहे.

**जय०**—खरं आहे.

**माना०**—आणि असं असूनही प्रतापराव मला राजद्रोही ह्मणतो ! त्याचं स्वतःचंच शरीर राजद्रोहानं थबथबलेलं आहे ! हा जिथं जातो तिथं राजद्रोह पसरीत जातो. सरकार ! माझं वैभव व कीर्ति आपल्या मर्जीवर अवलंबून आहे. आणि आपण या निंदकाला आज दरबारांत येण्याची परवानगी दिल्यामुळं या आपल्या सेवकाचं हृदय फाटून त्यास अत्यंत वेदना होत आहेत. राजद्रोही ! मानाजीराव राजद्रोही अं ! !

**जय०**—मानाजीराव !—

**माना०**—( गुडघे टेकून ) सरकार हें हृदय आपल्या हातानं फाडून पहा ह्मणजे त्यांतून वहाणाऱ्या पवित्र रक्तानं आपल्या मनांतील संशय तरी दूर होईल.

**जय०**—उठा ! मानाजीराव उठा ! माझ्या हृदयांत आपल्याबद्दल यत्किंचित सुद्धां संशय घेण्यास जागा नाहीं. ( मानाजी उठतो. ) आमच्या संशयानं जरी नाहीं तरी प्रतापरावाचे येवढे प्रलाप ऐकून घेतल्यानंच आपल्याला दुःख झालं आहे खरं ! ( त्यास एकीकडे घेऊन ) परंतु अद्याप मला त्याची बहीण मिळवि-ण्याची आशा आहे ?

**माना०**—हं ! प्रतापरावाच्या रागाचं हेंच तर मुख्य कारण आहे ! कारण आपल्या आज्ञेप्रमाणं मी इंदिरेला भेटून आपल्याविषयीं तिजजवळ गोष्ट काढली. आणि हेंच प्रतापरावाला कळल्यापासून तो सरकारची मजवर नाराजी व्हावी असे प्रयत्न करीत आहे.

**जय०**—त्यांत त्याला यश येणं शक्य नाहीं ! परंतु इंदिरेची कांहीं आशा आहे का ?

**माना०**—मानी प्रतापरावाची बहीण आपली होणार इतकंच नाहीं तर हें लक्षांत ठेवा कीं, प्रतापरावच ती आपण होऊन आपल्याला देणार !

**जय०**–परंतु विलासरावाचं व तिचं लग्न ठरल्याचं ऐकतों. त्यामुळं आपल्या कार्यांत विघ्न येण्याचा संभव आहे.

**माना०**–विलासरावसुद्धां या कामीं आपल्याला साह्य करतील.

**जय०**–ती विलासरावावर फारच प्रेम करते.

**माना०**–ती सरकारवर जास्त प्रेम करील.

**जय०**–मानाजीराव, तुह्मी तिला सांगा कीं, आह्मी तिचा मोठा मान मरातब ठेवूं, आणि याची खूण ह्मणून ( तसबीर देऊन ) ही आमची तसबीर आह्मी स्वतः तिच्याकडे पाठवितों. ती तुह्मी तिला नेऊन द्या.

**माना०**–सरकारच्या मर्जीप्रमाणं सर्व करतों.

**जय०**–चला मानाजीराव. दरबारच्या कामानं आज फारच त्रास झाला आहे. तेव्हां आपणही थोडी विश्रांति घेऊं. ( दरबार बरखास्त. पडदा पडतो. )

**अंक १ ला समाप्त.**

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

**स्थल**—( मानाजीरावाच्या वाड्यांतील दिवाणखाना. )

( मानाजी, तुकोजी. )

**मा०**—आत्तां माझ्या जिवांत जीव आला. प्रतापराव ! तुझ्या आजच्या कृतीची सव्याज फेड करीन, आणि तुझी लुबलुबणारी जीभ कायमची बंद करीन तरच नांवाचा मानाजी. तुकोजी या मानाजीरावाच्या अकलेनं आजचं संकट तर टळलं; परंतु आतां फार दिरंगाईवर टाकणं धोक्याचं आहे. हा प्रतापराव कोणत्या वेळीं काय करील याचा नेम नाहीं. तेव्हां त्याचा प्रथम निकाल लावला पाहिजे.

**तु०**—माझी कट्यार त्या कामाला पुरे आहे.

**मा०**—नको अशा करण्यानं विनाकारण गवगवा मात्र होईल. त्याचा सूड घेऊन त्यांत मी आपला फायदाही करून घेणार आहें, राजाचा मारेकरी मीं कोण योजला आहे अशी तुमची कल्पना आहे ? हा प्रतापरावच !

**तु०**—कोण प्रतापराव ?


**मा०**—होय प्रतापराव !

**तु०**—छे. अगदींच अशक्य ! अहो त्यांच्या घराण्यांत वाडवडिलांपासून राजनिष्ठेचं व्यसनच आहे. आणि प्रतापरावामध्यें तर त्याचा कळसच झाला आहे.

**मा०**—तरी जयदेवाचा वध मी त्याच्याच हातून करविणार. त्याला एक बहीण आहे. हें तुह्माला माहितच आहे !

**तु०**—होय. इंदिराबाईवर आपलेंही प्रेम होतं आणि आपण मागणीही करणार होतां !

**मा०**—विलासरावावर फिदा होऊन माझ्या मागणीचा तिनं उघड धिक्कार केला आहे. परंतु त्यामुळं तिच्याबद्दल माझी लालसा मात्र वृद्धिंगत झाली आहे. विला-



**माना०**—म्हणजे मी त्याच्या मनांत जो संशय उत्पन्न करीन तो ही तसबीर तिच्याजवळ पाहून दृढ होईल. (पृष्ठ ३१.)
फोटोग्राफर गुरुदास ... को.]

सरावानं इंदिरा हिरावून घेतली इतकंच नाहीं. परंतु राजा मेल्यावर विलासरावाच्या घराण्याचा राजघराण्याशीं संबंध असल्यामुळं माझ्या पुढील मार्गांत तो मोठाच कांटा आहे. विलासराव मेलाच पाहिजे. प्रतापरावही मरणार आणि या विजयनगरची राजलक्ष्मी इंदिरेसह या मानाजीरावालाच माळ घालणार. बरं तुह्मी आतां जा. ( तुकोजी मुजरा करून जातो. )

**मा०**—( राजाची तसबीर काढून ) या राजखेळण्याचा आतां उपयोग केला पाहिजे. आपली नीच मनोवासना तृप्त करून घेण्याकरितां इंदिरेला वश करून घेण्याची कामगिरी मला सांगतानां जयदेवांनीं जशी हास्य मुद्रा केली होती, तशी या तसबीरीमध्यें सुद्धां हुबेहुब उतरली आहे. काय हा पोषाखाचा डामडौल ! इंदिरा पाहिजे आहे! माझी प्रिया इंदिरा मीं याला मिळवून देणार! माझ्या ऐवजीं हा इंदिरेचा उपभोग घेणार! या अपराधाबद्दलच जयदेवमहाराज आपल्याला मरणाची शिक्षा झाली आहे. भोळ्या जयदेवा! सध्या या प्रेमाच्या तेजानं लुकलुकणाऱ्या तुझ्या डोळ्यांच्या लवकरच हा मानाजीराव खांचा करणार. इंदिरेच्या उपभोगाला मी शय्या तयार करून देईन अशी याची कल्पना आहे, परंतु राजेसाहेब ! आपल्याला लवकर कळेल, कीं मानाजीराव जी शय्या तयार करणार ती स्मशानांत असेल आणि तिच्यावर एकदां शयन केलं, कीं त्यांतून जागृत होण्याची आशा नाहीं. ( तारा येते ) ये तारे ये. शेवटीं विलासराव तुला मिळवून देण्याचं साधन माझ्या हातीं आलं ! ते आजच विजयनगरला येणार आहेत. विलासरावाचं इंदिरेशीं लग्न ठरलं आहे. परंतु जयदेवमहाराजांचाही तिच्यावर डोळा आहे. तेव्हां महाराजांवर इंदिरा फिदा आहे अशी मी त्याची समजूत करून देणार आहें. पण या कामीं तुझंही मला साहाय्य पाहिजे.

**ता०**—माझ्याकडून काय होईल तें मी करीन.

**मा०**—हें पहा. ही तसबीर ( तसबीर काढून ) महाराजांनीं इंदिरेला देण्याकरितां माझ्या जवळ दिली आहे. ती तूं घेऊन युक्तीनं तिच्याजवळ असलेल्या विलासरावाच्या तसबिरीशीं बदल केली पाहिजे ! ह्मणजे मी त्यांच्या मनांत जो संशय उत्पन्न करीन तो ही तसबीर तिच्या जवळ पाहून दृढ होईल. ( तसबीर देतो. )

**ता०**—असं करणं निंद्य आहे असं माझं मन मला साक्ष देत आहे. पण मी तरी काय करूं ? मी आपली गुलाम बनलें आहें. आपण सांगतां तें तें मी

मुकाव्यानें करतें आहें. इंदिराबाईच्या निष्कपट हृदयांत शिरून तिचं काळीज कापीत आहें. आपल्या सांगण्यावरून तिनं विलासरावानां लिहिलेली प्रेमपत्रिका मी आपल्याला आणून दिली आहे. मला माहित आहे, कीं हें काम वाईट आहे. परंतु वाईट वाटून उपयोग काय ?

**मा०**—( पत्र दाखवून ) या प्रेमपत्रिकेनं मी विलासरावांच्या मनांत असूयाग्नि उत्पन्न करीन. परंतु तो तूं नेहमीं प्रदीप्त ठेवला पाहिजेस. मीं जिकडे तिकडे इंदिरा आणि जयदेवमहाराज यांच्या संबंधाच्या कंड्या पसरून विलासरावांच्या मनांत मत्सर उत्पन्न करण्याची पूर्ण तयारी केली आहे. त्यांच्यावर सोंपविलेल्या कामगिरीची खबर देण्याला त्यांनां प्रथम माझ्याकडेच आलं पाहिजे. ते बहुधा इतक्यांत येतीलच. ते एकदां आले कीं त्याच्या हृदयांत असं जहर पसरून देतों कीं इंदिरेच्या सहस्र चुंबनांनींही त्यांचा परिणाम कमी होणार नाहीं.

**ता०**—बरं तर मी जातें आणि शक्य त्या प्रयत्नानं आपली कामगिरी बजावतें. पण हे विलासरावही आलेच. ( बाजूला उभी रहाते. ) ( विलासराव येतो. )

**वि०**—रामराम मानाजीराव.

**मा०**—यावं विलासराव ! आपल्या भेटीचा योग फार दिवसांनीं आला. आपण कामगिरीवर गेल्यापासून या विजयनगरांत एक एक दिवस कसा वर्षासारखा वाटत होता.

**वि०**—या गरीबाची आठवण येत असे हें माझं भाग्यच ह्मणायचं. ( तारेला पाहून ) कोण ? ताराबाई ! बाहेरच्या सूर्य प्रकाशनं माझे डोळे कसे दिपल्यासारखे झाले आहेत. नाहीं तर आपल्या मुखचंद्राचा प्रकाश मला पूर्वीच दिसला असता ! आपल्या प्रिय मैत्रिणीची तब्येत खुशाल आहे ना ?

**ता०**—महाराज ! कोण माझी मैत्रिण ?

**वि०**—माझा प्रश्न आपल्याला समजला नाहींसा दाखवितां तर इंदिराबाईवर कांहीं संकट तर आलं नाहीं ना ? माझ्या भावी पत्नि इंदिरेबद्दल मी आपल्याला विचारलं होतं !

**ता०**—इंदिराबाई कशा आहेत ? महाराज ! हा नाजूक प्रश्न जयदेव महाराजांनां विचारा. ( जाते. )

**वि०**—( एकीकडे ) जयदेव महाराजांचा यांत काय संबंध ? ही काय भानगड आहे ?

**मा०**—विलासराव आपण चिंतातुर दिसतां ? ताराबाईला निदान एखाद्या गोडीच्या शब्दानं अडकवून ठेवायची होतीत.

**वि०**—मानाजीराव ! आपण मजवर सोंपविलेल्या कामगिरीचे कागद आपल्या स्वाधीन करायला मी आलों आहें. या कामगिरीनंच माझं लग्न आतां-पर्यंत लांबणीवर पडलं ! तरी पण विजयनगरला लवकर परत बोलावल्याबद्दल मी आपला आभारी आहें.

**मा०**—या अल्प सेवेचा मोबदला मागण्याचा आमचेवर लवकरच प्रसंग येईल. विलासराव आपण आतां वैभवावर चढणार तेव्हां या मानाजीला मात्र विसरूं नका !

**वि०**—मानाजीराव मी कांहीं मनकवडा नाहीं. तुमचं ह्मणणं स्पष्ट होऊं द्या.

**मा०**—असं वेड पांघरूं नका ! आपल्या वैभवाची वार्ता सर्व शहरभर पसरली आहे. आपण जर पेठेंतून हिंडाल तर आपल्या तसबीरा ठिकठिकाणीं विक्रीला मांडलेल्या आपल्याला दिसतील. वाः असं वेड्यासारखं त्यांत आश्चर्य काय दाखवितां. आज मी जरी जयदेव महाराजांच्या मर्जींतला आहें तरी आपण लवकरच या मानाजीरावाला बाजूला सारून अमात्य होणार !

**वि०**—मानाजीराव हें भविष्य समजायला मी कांहीं जोतिषी नाहीं बुवा.

**मा०**—विलासराव ! तुह्मी मला स्पष्ट बोलायला लावणार तर. तुह्मी जयदेव महाराजांचे पूर्ण मर्जींतील अमात्य होणार !

**वि०**—काय ? मर्जींतील अमात्य ?

**मा०**—यांत काय संशय. या विजयनगरांत आज काल उदार मनाचा नवरा ह्मणजे राजाच्या बहाल मर्जींतला माणूस. त्याला आपल्या बेअब्रूनंच महाराजां-कडून अलोट बहुमान आणि मंत्रीमंडळांतील उच्च जागा सहज मिळूं शकतात. विलासराव मी आपलं अभिनंदन करतों. काय ! असं वेड्या सारखं काय करतां तुह्माला माझं बोलणं अजून समजलं नाहीं. महाराजांचं प्रियपात्र प्रतापरावांची बहीण इंदिराबाई यांच्या बरोबर तुमचं लग्न नाहीं ठरलेलं ? मग झालंतर. आतां तरी समजलं !

**वि०**–( तरवार उपसून ) नीचा ! ही तुझी लबाडी आहे.

**मा०**–काय ? तुमचं इंदिराबाईशीं लग्न नाहीं ठरलं ?

**वि०**–नीचा ? तूं अमात्य ऐस किंवा त्याहून मोठा ऐस ! पण या तुझ्या पाजीपणाबद्दल या विलासरावाच्या तडाख्यांतून तूं सुटणार नाहींस.

**मा०**–( तरवार उपसून ) जर माझी इच्छा असती तर या तरवारीनं तुझ्या बडबडीचा क्षणांत निकाल लावला असता. जा तुला जीवदान देतों. (तरवार म्यानांत घालून. ) मानाजीराव अशा तरवारीनां भीत नसतो हें जगाच्या पूर्णपणें अनुभवाला आणून दिलं आहे. मला तुझी दया येते इतकंच नाहीं तर हा तुझ्या मनाचा मोठेपणा दाखविणारा तुझा राग पाहून मला तुझ्या बद्दल अभिमान वाटतो. जा आतां तुम्ही जा ( स्वतः जाऊं लागतो. ) हिताची गोष्टही ऐकून घ्यायची तुझी सध्यां मनःस्थिती नाहीं परंतु जाण्यापूर्वी पत्र काढून देतों. हें पहा ! म्हणजे स्त्रियांच्या प्रेमावर किती विश्वास ठेवावा त्याची तुला कल्पना येईल ! ( त्याला पत्र देतो. )

**वि०**–हें तिचंच अक्षर. या पत्रावर माझ्या हातीं देण्यापूर्वी तूं जहाल विषाचा लेप केलेला दिसतो. ( वाचूं लागतो. )

**मा०**—वाच ! म्हणजे तुझं नशीब कसं आहे तें तुला चांगलं कळेल !

**वि०**—हें पत्र कुणीं पाठविलं ?

**मा०**—कोणी ? पहा त्या पत्रावर सही आहे.

**वि०**—इंदिरा !—

**मा०**—हें इंदिरेनं जयदेव महाराजानां लिहिलं आहे; आणि त्यांनीं आपण मिळविलेली विजयपताका म्हणून मोठ्या प्रौढीनं मजजवळ दिलं ! ही गोष्ट मेजवानीचे वेळीं सर्वांना कळली आहे. आणि गरीब बिचारा विलासराव म्हणून तुमची हेटाळणी चालली आहे.

**वि०**—गरीब–बिचारा–विलासराव !

**मा०**—( एकीकडे ) याच्या मुद्रेवरून हा राजाचा खून करीलसं वाटतं. छे. पण तसं होऊं देतां उपयोगी नाहीं. जयदेवरावाचा खून प्रतापरावानंच केला पाहिजे. ( उघड ) प्रतापरावालासुद्धां तुमची दया येते आणि त्यालाही तुमच्या स्थितीबद्दल वाईट वाटते आहे.

वि०—काय ? प्रतापरावाला माझी दया येते ?

मा०—मी सुद्धां बरेच दिवस राजाची इंदिरेबद्दलची बडबड आत्मश्लाघा समजत होतों. परंतु—

वि०—इंदिरेचंच हें ! मानाजीराव, या देखल्या छटेलीचा बेईमानपणाचा पुरावा हा असा चुरून टाकतो. ( पत्र चुरतो. ) आणि आजपासून माझ्या हृदयांतील तिच्या प्रितीचाही अस्सा चुरा करणार. ( पत्र पायाखालीं तुडवतो; ) ही पहा इंदिरेची मूर्ती हा विलासराव पायाखालीं तुडवतो आहे.

मा०—ही हकिगत तुम्हाला खरंच का कळली नव्हती ! अहो ही बातमी तर कित्येक दिवस शहरांत पसरली असून परदेशांत सुद्धां गेली आहे.

वि०—मी अशी कुणकुण ऐकत होतों. परंतु तिच्यावर माझा विश्वास बसला नाहीं. परंतु आतां या पुराव्यानं सर्व संशयाची निवृत्ती झाली. बरं आहे. रजा घेतों मी. ( जाऊं लागतो. )

मा०—माझं ऐका. विलासराव निराश होऊं नका. अद्याप तुह्मांला या गोष्टीचा सूड घेतां येईल. तिचंच उदाहरण घ्या. नुसतं तिला हृदयांतून काढूनच राहूं नका. तर तिच्या जागीं—तिच्या रिकाम्या झालेल्या जागीं—दुसऱ्या योग्य स्त्रीची योजना करा—अहो. सध्यां तुह्मी ही गोष्ट ऐकण्याच्या स्थितींत नाहींसे दिसतां. ठीक आहे. पुन्हा कधींतरी आपण याबद्दल बोलूं. पण जर तुह्मी इतके माझ्यावर रागावलां होतांत तर ही बातमी सांगून मी तुमची किती अब्रू वांचवली आहे याचा तुह्मीच विचार करा.

वि०—खरं आहे. एखादा शस्त्रवैद्य मरणाऱ्या रोग्यावर शस्त्रप्रयोग करून जशी त्याची हालांतून लवकर मुक्तता करतो त्याप्रमाणंच तुमचे माझ्यावर उपकार झाले आहेत. ( जातो. )

मा०—जा. खुशाल जा. या मानाजीचं अर्धं काम झालं आहे. आतां इंदिरेजवळ याच्या तसबिरीच्या बद्दल राजाची तसबीर यानं पाहिली कीं काम फत्ते झालं ! सावजं कशीं एकएक जाळ्यांत चालून येत आहेत. आधीं प्रतापराव नंतर तारा आणि आतां हा विलासराव. ठीक आहे. माझ्या कपट नाटकाला, आतां कुठं रंग भरत चालला आहे. ( जातो. )

———

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—( दौलतरावाचे वाड्यांतील पुढचा भाग—दौलतराव येतो. )

**दौलत०**—(स्वगत) मी तारेच्या भेटीला गेलों त्यावेळीं अमात्य दरबारला गेले होते हें वरं झालं ! खरोखर पोर पण पोर आहे ! आतां घटका अर्धी घटका तिच्याजवळ बोलत बसलों, तर तेवढ्या वेळांत पोरीनं आपल्या स्वभावांतले सगळे अवगुण मला अगदीं मोकळेपणानं सांगून टाकले ! पण तिचे ते अवगुण माझ्या दृष्टीनं गुणच ठरत आहेत ! त्या अवगुणांनीं तर मला ती अधिक आवडते. ह्या अगदीं काडीचा अवगुण नसलेल्या सर्व गुणसंपन्न बायकांचा तर मला मनापासून तिटकारा ! नवरा ह्मणेल तें आपलें कबूल. ‘ आज सूर्य पश्चिमेस उगवला बरं,’ ‘ होय खरंच ’ अशा नेभळ्या बायकांनां का बायका ह्मणावं ? नवऱ्याच्या उत्तराला प्रत्युत्तर न करणारी, नवऱ्याच्या आवडी नावडी त्याच जिच्या आवडी नावडी, नवऱ्याच्या शब्दागणिक नंदीबैलासारखी मान हालवणारी, अशी बायको मिळणं ह्मणजे खरं खरं दुर्भाग्य ! अशा बायकोच्या सोबतींत सगळा जन्म घालायचा ह्मणजे आपली जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा ! रोज कांहीं नाहीं तरी निदान पांचचारदां थोडी तरी चकमक उडाल्याशिवाय कसलं प्रेम आणि कसलं गृहसुख ! ( पाहून ) हे कोण ? हें एक लंचांडच आलं.

**तुकोजी०**—( प्रवेश करून व दौलतरावास पाहून ) राम राम, राम राम, कारभारी ! आपणच इथले कारभारीना ?

**दौलत०**—मी—होय—होय—पण ( स्वगत ) आतां कसं बरं करावं ? सुटकाच नाहीं त्यावांचून. ( उघड ) होय—पण, धनीच हल्लीं इथं आहेत सरदार दौलतरावांचे पुतणे आणि वारस मुरारराव. आपण दौलतरावांना ओळखीत असालच.

**तुकोजी०**—हो तर ! कोण ओळखणार नाहीं. लढवय्या पण लढवय्या होऊन गेला असं अमल दुनिया ह्मणत आहे ! पण ह्मातान्यानं तेवढा महाराजांचा हुकूम मोडून हल्ला केला नसता तर सगळं ठीक होतं. त्यांतल्या त्यांत दुःखांत सुख इतकंच कीं ह्मातारा त्या हल्ल्यांत कामास आला.

**दौलत०**—ह्मणजे ? दुःखांत सुख तें कसं बरं ?

**तुकोजी०**—तुह्मांला महाराजांच्या स्वभावाची माहितीच नाहीं असं दिसतं जयदेवमहाराजांचा राग अन् तो हुकूम मोडणाराचा बळी घेतल्यावांचून शमेल ? हें शक्यच नाहीं !—पण तुमचे नवे धनी तरुण सरदारसाहेब कुठंसे आहेत.

**दौलत०**—काय त्यांना भेटलंच पाहिजे कीं काय ? कांहीं निरोप असल्यास त्याप्रमाणं व्यवस्था करतों. सरदारांना भेटण्याचं कारण नाहीं.

**तुकोजी०**—नाहीं, ते इथं आहेत तेव्हां प्रत्यक्ष त्यांनाच भेटलेलं बरं. शिवाय—

**दौलत०**—बरं आपण जरा इथंच थांबा.

( हातांत कागद घेतलेला श्रीधरपंत येतो. )

**श्रीधर०**—सरदारसाहेब ! सरदारसाहेब !

**तुकोजी०**—( स्वगत ) सरदारसाहेब !

**दौलत०**—( श्रीधराला एकीकडे ) हो, हो, माणसाच्या कांद्या ! गप्प ! परक्याच्या देखत मी सरदारसाहेब नाहीं अशी तुला ताकीद नव्हती का दिली ( तुकोजीस ) सरदारसाहेब कुठं आहेत ! तेवढं मी पाहून येतों. आणि अशीच आपली गांठ घालून देतों ! ( मुरारराव व तारा येतात. ) ( त्यांना पाहून ) ( स्वगत ) घात झाला ! हा मूर्खशिरोमणीहि इकडेच येऊन ठेपला आणि तोही मीं सूचना देण्यापूर्वी ?

**मुरा०**—काकासाहेब ! आपली अगदीं मनापासून क्षमा मागण्याकरितां—

**दौलत०**—( एकीकडे ) तोंडाला कुलुप घाल ! गद्धया, अगदीं खिळी घाल !

**तुकोजी०**—हेच सरदारसाहेब ?

**दौलत०**—होय–होय !—( मुराररावाकडे पाहून ) हेच सरदारसाहेब ! हेच सरदार मुरारराव माने.

**मुरार०**—कोण मी सरदार ?

**दौलत०**—( एकीकडे ) हो, हो, गप रहा, तूंच ! अरे मी मेलों आहें, तूंच सरदार साहेब !

**तुकोजी०**—रामराम, सरदारसाहेब ! ( ताराबाईकडे पाहून ) सरदारीण बाईसाहेब वाटतं ?

**मुरार०**—सरदारीण बाईसाहेब ! ( दौलतरावाकडे पाहून ) काय–

**दौलत०**—नाहीं ! होय ! ह्मणजे त्या लवकरच सरदारीण बाईसाहेब होणार !

**तुकोजी०**—असं असं समजलों सरदारसाहेब, आपण मोठे भाग्यवान् ह्मणून आपल्या अनुरूप अशी आपल्याला—

**मुरार०**—मी ? भाग्यवान् ? तसं असतं तर–

**दौलत०**—( मुराररावास एकीकडे ) हो, अरे हो तूं भाग्यवान् ! ह्मण–ह्मण–आहेस ह्मणून ! ( उघड ) सरदार मुराररावसाहेबांसारखं भाग्य आहे कुणाचं ? आणि तें काय त्यांना सांगायला पाहिजे ?

**मुरार०**—( दौलतरावाला एकीकडे. ) काय ? खरंच ? मग तारेनं मला वरायला आपली हरकत नाहीं तर ?

**तारा०**—( स्वगत ) मग बाई देवच पावला.

**दौलत०**—( मुराररावाला ) अरे नाहीं, तसं नाहीं ह्मणत गद्ध्या ! माझं ह्मणणं कीं–हा मला वेड लावणार ! खास वेड लावणार आणि ठार करणार

( हिरोजी येतो. )

**हिरोजी०**—( दौलतरावाला ) धनीसाहेब !

**दौलत०**—( त्रासून ) मी नव्हे धनीसाहेब ! हे गृहस्थ दिसत नाहीं का ? ( हिरोजीला ) हिरोजी, मी ठार मेलों.

**तुकोजी०**—सरदार दौलतरावसाहेब, माफ करा. मी बरोबर ऐकलं.

**हिरोजी०**—नाहीं नाहीं ! हे सरदार दौलतरावसाहेब मुळींच नव्हत ! खरंच नव्हत हे सरदार दौलतराव.

**मुरार०**—ह्मणजे ! खरोखरच ?

**हिरोजी०**—( मुराररावाला नमस्कार घालून ) गुन्हा माफ करा सरकार गुन्हा माफ करा.

**मुरार०**—गुन्हा ? कसला गुन्हा ? हिरोजी ! कसल्या गुन्ह्याची माफी मागतोस !

**हिरोजी०**—गुन्हा पोटांत घालाल तर सगळं सांगतों सरकार.

**मुरार०**—घातला पोटांत. उठ सांग काय तें !

**हिरोजी०**—( उठून ) हे–हे गृहस्थ—

**मुरार०**—हं ! कोण–कोण आहेत हे गृहस्थ ?

**हिरोजी०**—तें कांहीं मला ठाऊक नाहीं ! खरंच मला ठाऊक नाहीं. पण हे आपले काकासाहेब कांहीं नव्हत. इतकं मात्र मला ठाऊक आहे !

**मुरार०**—मग दोन घटकांपूर्वी हे काकासाहेब ह्मणून तूं कसं ह्मटलंस. श्रीधरपंडित, पहा. मला शंका आली होती ती खरी ठरली. ( हिरोजीला ) हिरोजी ! मग तूं हे काकासाहेब असं कां सांगितलंस !

**हिरोजी०**—हे गृहस्थ आज सकाळीं असे झुंजूमुंजु अगदीं राजरोस वाड्यांत शिरून मी भूपाळ्या ह्मणत होतों तिथं आले आणि मला म्हणतात कसं !

**मुरार०**—काय काय ह्मणाले ?

**हिरोजी०**—मला ह्मणतात हा खंजीर बघ.

**दौलत०**—माणसाच्या लेका ! काय–काय सांगतोस हें ?

**श्रीधर०**—थांबा–थांबा–थांबा मला आधीं लिहून घेऊं द्या ही यांची फिर्याद ! घरफोडीतर स्पष्टच होते–आणि खुनाचा प्रयत्नहि–

**हिरोजी०**—नाहीं नाहीं सरकार ! खंजीर नव्हता तो ! काय मी खंजीर ह्मटलं ? देवा, देवा, खंजीर कुठून असेल ! पण मला असे घाबरवूं नका तुह्मी काय ह्मणत होतों मी ?–हो–हे ह्मणाले–हा–हा–हा कसा बघ, कसा पैशाचा.

**श्रीधर०**—असं का ? मग लांच द्यायचा प्रयत्न केल्याचा गुन्हा होतो.

**मुरार०**– कायहो, तोतये सरदार, हिरोजी ह्मणतो तें खरं कीं नाहीं अशी हरामखोरी करून, आपणच सरदार दौलतराव माने ह्मणून आमची दौलत लुटूं पहात होतां काय ?

**श्रीधर०**—आणि माझ्या दिवाणगिरीवर गदा आणीत होतां ? चोराचे राजे कुठले !

**दौलत०**—चोराचे राजे ! बत्तीशी हालवून टाकीन ! ( श्रीधरपंताच्या अंगावर धावत जातो. )

**हिरोजी०**—( त्याला धरून ) हें काय ?– हें काय ?

**मुरारराव**—रावांना खांबाला बांधून फटक्यानंच फोडलं पाहिजे. मग कबूल होतील.

**श्रीधर०**—तें कांहीं नाहीं. त्यांना सरकारांत रवाना करून फांशीच्या वडाला लटकावलं पाहिजे. ह्मणजे कबूल होतील !

**तारा०**—नका हो नका ! ( मुराररावाला ) क्षमा करा ह्मताऱ्याला ! यांच्या पांढऱ्या केसांकडे पाहून तरी जास्त कांहीं करूं नका. एवढं मी पदर पसरून मागतें ! ( दौलतरावास ) ह्मातारेबुवा, तुह्मी आतां इथून जा कसे ! आणि हें पहा, पुनः अशा फंदांत पडूं नका !

**दौलत०**—पण मी–

**हिरोजी०**—( एकीकडे दौलतरावास ) खरंच, आपण इथून जाच कसे ! गेलांत तरच बरं ( मोठ्यानं ) चला, जा इथून ! ( त्याला ढकलतो. )

**मुरार०**—चला, राव ! चालते व्हा इथून ! अन् आपण सुखे सुटलांत, त्याबद्दल या बाईचे आभार माना !

**श्रीधर०**—ठकाला सोडून देणं ह्मणजे ठकबाजीला उत्तेजन देणंच आहे.

**हिरोजी०**—जा, जा ! जा आतां !

( दौलतरावाला ओढून नेतो. )

**श्रीधर०**—( मुराररावास ) एकूण, शेवटीं आपण सरदारसाहेब आहांतच.

**मुरारराव**—( तिरस्कारानं हंसून. ) श्रीधरपंडित आंत चला जरा. ( तुकोजीस ) आपलं माझ्याजवळ कांहीं काम असेल तर आंत दिवाणखान्यांत येऊन भेटा.　( तुकोजीशिवाय सर्व जातात. )

**तुकोजी०**—( स्वगत ) माझा तर्क वाहतो, कीं हा तोतया ह्मणून गव्हांडी मिळालेला गृहस्थच सरदार दौलतराव आहे ! –नाहीं, त्याबद्दल शंकाच नको ! तोच गृहस्थ हा ! महाराजांच्या रागाला भिऊनच ह्मातारा हे सोहळे आणि हा अपमान् मूग गिळून सहन करतो आहे. आतां या वाड्यावर चांगला पहारा ठेवला पाहिजे. आणि अमात्यांचें काम होईपर्यंत या ह्माताऱ्याला बाहेर फिरकूं देऊं नये ह्मणजे झालं.　( जातो. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**— ( इंदिरेचा दिवाणखाना. )

**इंदिरा**--अद्याप कां बरं येत नाहींत ? आज स्वारी विजयनगराला येणार असल्यामुळं सकाळपासून मी वाड्याच्या गच्चीवर बसून शहरच्या वेशीकडे कशी टक लावून पहात होतें. बारा वाजतां स्वारी शहरांत आली, मग अजून बाहेर काय चाललं आहे बाई. माझ्या मनाला कशी हुरहुर लागून राहिली आहे. स्वारी कामगिरीवर होती तेव्हां मेली मनाची समजूत तरी करतां येत होती. हो माणूस शेंकडों कोस दूर असलं तर प्रत्यक्ष भेट होणार कशी. पण बाई आज स्वारीला शहरांत येतांना पाहिल्यापासून मनाचा कसा अगदीं धीर सुटला आहे. केव्हां एकदां स्वारी इथं येते आणि मी डोळे भरून पहातें असं झालं आहे. ( पावलां-चा आवाज होतो, तारा येऊन उभी रहाते. ) स्वारी आली वाटतं. महाराज, ( तसबीर हातांत घेऊन ) आपल्या तसबिरीकडे रोज ही इंदिरा किती आतुरतेनं पहात असते. हें जर आपल्याला कळलं तर खात्रीनं आपण मला सोडून पुन्हां कधीं कामगिरीवर विजयनगराबाहेर जाणार नाहीं. ( तसबीर मेजावर ठेवते. तारेकडे नजर जाते ) कोण ताराबाई, तुह्मी केव्हां आल्यात.

**तारा**--इंदिराबाई क्षमा करा ! मी गुपचुप आल्यामुळं, तुमच्या आपल्या-शींच चाललेल्या आनंदाच्या भाषणामध्यें व्यत्यय आला. कांहीं लाजायाला नको इतकं !

**इंदिरा**—करा थट्टा बाई, शहरांत येऊन इतका वेळ झाला, तरी इकडे येणं झालं नाहीं ह्मणून मी स्वारीवर अगदीं रागावण्याच्या बेतांत होतें.

**तारा**—विलासराव आल्याबरोबर त्यांना सरकारी कामाकरितां मानाजी-रावाकडे जावं लागलं त्यामुळें थोडा उशीर झाला हो. ( तसबीर घेऊन ) या चेहऱ्याबर हें हलुच हंसणं किती सुंदर आहे बाई आणि त्या हंसण्याकरितां थोड्याशा उघडलेल्या ओंठामुळं विलासरावांचा चेहरा तरी किती मोहक दिसत आहे. मला वाटतं ही तसबीर काढतांना इंदिराबाई, तुह्मी खास त्यांच्या समोर उभ्या होतां.

**इंदिरा**—बाई तुह्मांला कशाशीच काळजी नाहीं. तेव्हां तुह्मीं माझी थट्टा करावी हें सरळच आहे. पण ऐकलंत का--पावलांचा आवाज ऐकूं येत आहे. ( पुढं जाते. )

**तारा**--( एकीकडे ) नशीबानं ही संधि चांगली मिळाली.

**इंदिरा**--( पडद्याकडे पाहून. ) होय. हाच त्यांच्या पावलाचा आवाज. मी पुरा ओळखतें. द्या, ताराबाई द्या ती तसबीर इकडे.

**तारा**--तुमची बाई शिकस्त आहे हो. अगदीं केवळ्यानें ओढलीत तीं जसं कांहीं विलासरावांना तुमच्याजवळून हिरावून घेत होतें. घ्या बाई ही ( तिला विलासरावांच्या तसबीरीबद्दल जयदेवाची तसबीर देते-इंदिरा न पाहतां ती हृदयाजवळ लपवून ठेवते. ) ( एकीकडे ) झाली बाई मामाची कामगिरी. ( उघड ) मी जातें बाई. तुमच्या प्रेमाच्या भेटीच्या वेळीं मी तिसरी कशाला हवी. ( तारा जाते. )

**इंदिरा**--आले, जिना चढून आले. महाराज आपल्या येण्यानं या इंदिरेला किती आनंद होत आहे. याची कल्पना तरी आहे काय ? ( विलासराव येतो ) महाराज फावलं का यायला ? एका बिंदूकरितां चातकाची काय स्थिती होत असते याची पावसाला दाद तरी असते काय ?

**विलास०**--( स्वगत ) बेईमान जात.

**इंदिरा**--हें काय बाई ? महाराज आपला चेहरा अगदीं बदलल्यासारखा दिसतो.

**विला०**--पण तुझ्या चेहऱ्यांत बिलकुल फरक दिसत नाहीं. तो दिसायला पाहिजे होता. इंदिरे तुझ्या त्या गोंडस चेहऱ्याकडे मला एकदां नीट पाहूं दे. ( पाहून ) तुझ्या तोंडाकडे पाहून चंद्रानंसुद्धां लाजेनं खालीं मान घातली पाहिजे. तुझ्या या रुंद कपाळावर पवित्रता अद्याप बसलेली आहेशी वाटते. हे ओंठ पोंवळ्यांना लाजवितात. आणि स्मित हास्यामुळें आंतून दिसणाऱ्या दांतांच्या तेजापुढें तुझे मोत्यांचे दागिनेहि फिके दिसत आहेत. इंदिरे, तुझ्या चेहऱ्यांत बिलकुल फरक झाला नाहीं. पण तो व्हायला पाहिजे होता.

**इंदिरा**—महाराज, आपल्या जिवाला प्रवासाच्या श्रमानं बरं का वाटत नाहीं.

**विलास०**—खरंच ! या माझ्या हृदयांत जबरदस्त जखम झाली आहे. पण ती प्रत्यक्ष अश्विनीकुमारांच्यानेंही बरी करविणार नाहीं. इंदिरे, ती जखम तूं केली आहेस.

**इंदिरा**—मी महाराज ?

**विलास०**—इंदिरे ! तुझी माझ्यावर प्रीति आहे, असं तूं मला कां सांगितलंस. मानाजीरावांसारखा माझाही तूं धिक्कार कां केलास नाहींस. मानाजीरावांशीं तूं सरळपणानं तरी वागलीस आणि त्याच्या प्रीतीचा उघडा धिक्कार केलास. परंतु माझ्याशीं तूं लडिवाळपणानं वागलीस, हंसलीस, खेळलीस आणि एखाद्या हलकट बायकोलाही करतां येणार नाहीं अशी तीव्र जखम तूं या हृदयांत केलीस.

**इंदिरा**—महाराज, कां हा माझ्यावर गहजब ? मी काय केलं ?

**विलास०**—काय, इतक्यांत फसवणुकीच्या विद्येंत इतकी तरबेज झालीस ? मनांतले विचार मनांत दावून, हें चेहऱ्यावरचं हास्य कुणाकरितां ?

**इंदिरा**—महाराज ! या इदिरेचं सर्वस्व आपल्याकरितां आहे.

**विलास०**—राजाकरितां आहे असं ह्मणायला पाहिजे होतं.

**इंदिरा**—काय ? राजाकरितां.

**विलास०**—इंदिरे चल ! एकदम कबूल करून टाक आणि लोकांची बडबड कायमची बंद कर. त्यांना स्पष्ट सांग कीं, प्रतापरावाची बहिण इंदिरा, जयदेव महाराजांचं प्रीतिपात्र आहे. परंतु या विलासरावाची बायको राजाचं प्रीतिपात्र आहे, हें जगाला ह्मणूं देऊं नकोस.

**इंदिरा**—( कानांत बोटं घालून ) देवा ! हा निवळ गहजब आहे.

**विलास०**—शहरभर फिरणारा वारासुद्धां सहस्र मुखानं हीच गोष्ट सांगत फिरत आहे.

**इंदिरा**—( रागानं ) महाराज, वाराच काय ? पण प्रत्यक्ष देवदूतांनीं येऊन मोठ्यानं कर्णे फुंकून जरी या गोष्टीची द्वाही फिरविली असती तरी ही इंदिरा तुमच्याशीं बेईमान आहे या गोष्टीवर विश्वास ठेवायला नको होता. जो बायकांच्या अब्रूला बेधडक डाग लावायला पाहतो त्याच्या बोलण्यावर किती विश्वास ठेवावा, हें आपल्याला तरी सांगायला नको. जा. महाराज, आपल्याला वाटेल तिथं जाऊन

आपली करमणुक करून घ्या. या इंदिरेबद्दल असा संशय घेणाऱ्या माणसाचं तोंड पाहणं पाप वाटतं. महाराज, या इंदिरेची आपण हीच का पारख केलीत. (रडते.)

**विलास०**—देवा, मी जर हिला विनाकारण दोष देत असेन तर—

**इंदिरा**—मी या बाबतींत मुळींच बोलत नाहीं. महाराज, मला वाटतं कीं, आपण माझ्याशीं घेतलेल्या आणाभाकांबद्दल आपल्याला वाईट वाटूं लागलं आहे. आणि आपल्या वचनांतून आपल्याला मी सोडवावं एवढ्याच करितां आपण आज इथं आलांत. आणि एवढ्याकरितांच आपण थांबत असलांत तर मी आपल्याला आपल्या वचनांतून मुक्त केलं आहे बरं. आपण खुशाल जा. मी आपल्याला मुळींच दोष देणार नाहीं. ( रडूं लागते व जाऊं लागते. )

**विलास०**—इंदिरे !

**इंदिरा**—काय महाराज !

**विलास०**—थांब जाऊं नकोस ! ( इंदिरा परत येते ) इंदिरे, माझ्या तोंडाकडे पहा पाहूं. ( इंदिरा पहाते तिच्याकडे पाहून ) छे, हें शक्य दिसत नाहीं. मला त्या नीचानं फसवलं असलं पाहिजे. या चेहऱ्यावर लबाडीचं बिलकुल चिन्ह दिसत नाहीं. तरी पण इंदिरे ! एकदां शपथ घेऊन मला सांग.

**इंदिरा**—महाराज, कशाबद्दल शपथ घेऊं.

**विलास०**—कीं तुझा जयदेव महाराजांशीं कांहीं संबंध नाहीं.


**इंदिरा**—महाराज, परमेश्वर साक्ष त्यांचा माझा कांहीं संबंध नाहीं.

**विलास०**—तूं त्यांना कधींही प्रेमपत्रिका लिहिली नव्हतीस ?

**इंदिरा**—नाहीं. महाराज ! जन्मांत कधीं मी त्यांना पत्रच लिहिलं नाहीं. महाराज, कुणी दुष्टानं आपले कान भरले आहेत. जाऊं द्या मला. दादानं पहाण्यापूर्वीं हे दुःखाश्रु मला लपविले पाहिजेत. नाहीं तर दादाचा स्वभाव फार तापट आहे. त्यांनीं जर मला रडतांनां पाहिलें तर त्याचा परिणाम काय होईल हें सांगवत नाहीं. महाराज, आपल्या मुद्रेवरून आपल्या मनांत अजून संशय आहे.

**विलास०**—इंदिरे, माझी तसबीर कुठं आहे ?

**इंदिरा**—महाराज, मी आपली तसबीर नेहमीं हृदयाजवळ बाळगीत आहें. आपण माझ्याजवळ व्यर्थ संशय घेतलात. ही पहा आपली तसबीर.



**विला०**—भयंकर यमदूतसुद्धां माझ्या दृष्टीला या तसबिरीहून कमी भेसूर दिसतील. ( पृष्ठ ४२. )
फोटोग्राफर्स गुरुदास ॲन्ड को. ]

( आपल्या हृदयापाशीं ठेवलेली राजाची तसबीर काढून देते )

**विलास०**—( तसबीर पाहून ) भयंकर यमदूत सुद्धां माझ्या दृष्टीला या तसबीरीहून कमी भेसुर दिसतील. इंदिरे, बोल, बोल. कुणाची तसबीर ही ? नाहीं तुझ्या प्रियकराचं गोंडस चित्र तूंच पहा. ( तिला तसबीर दाखवितो. )

**इंदिरा**—अगबाई, महाराज कुणी तरी चेटुक केलं हो. ही काहीं आपली तसबीर नाहीं.

**विलास०**—ही जयदेवमहाराजांची आहे.

**इंदिरा**—नाहीं नाहीं असं होणार नाहीं. आपण उगाच संशय घेऊं नका. काय करूं ? मी गोंधळून गेलें आहें. मला कांहीं सुचत नाहीं. दडवा ! दडवा ती तसबीर. माझ्या दृष्टीसमोरसुद्धां आणूं नका.

**विलास०**—माझ्या सुदैवानंच तुझं खरं स्वरूप दाखवलं आणि आज जगांत माझी अब्रू वांचविली. कुटिले, तुझीं सर्व पाताळयंत्रं बाहेर पडलीं. या पुढं तुझा माझा संबंध सुटला. मी तुझं या उप्पर तोंड पाहूं इच्छित नाहीं. पण याद राख, अशी एक वेळ येईल कीं, सगळ्या जगांत तुझी छीः थुः होऊन तुझं तारुण्य संपल्यावर जेव्हां या विजयनगरच्या रस्त्यावर तूं एखाद्या भणंग भिकारणीप्रमाणं फिरत राहशील, तेव्हां हा विलासराव आजच्या दिवसाची तुला आठवण देईल. (जातो.)

( प्रतापराव येतो, त्यास विलासराव जातांना दिसतो. )

**इंदिरा**—( विलासराव गेला हें न समजून ) परमेश्वराची शपथ मी निरपराधी आहें. ( इंदिरा धांवत· प्रतापरावाचे अंगावर जाते आणि त्यालाच विलासराव समजून ) देवा शपथ महाराज मी निरपराधी आहें.

**प्रताप०**—कोण तुझ्याबद्दल संशय घेतो. सगळ्या जगाला माहीत आहे कीं भ्याड पुरुष आणि उच्छृंखल स्त्रिया आमच्या घराण्यांत जन्माला येत नाहींत.

**इंदिरा**—( स्वगत ) गेले ! गेलेच ते शेवटीं.

**प्रताप०**—ताई हें काय आहे ? नेहमीं तुझा आनंदी दिसणारा चेहरा आज म्लान कां दिसतो ? काय झालं !

**इंदिरा**—कांहीं झालं नाहीं दादा. नुसतं—

**प्रताप**--नुसतं काय ?

**इंदिरा**--दादा क्षमा कर. मला उभं राहवत नाहीं. मीं आंत जातें. ( जाऊं लागते. )

**प्रताप०**--ताई, दम धर उभी रहा. अशी जवळ ये. ताई, विलासरावानं--

**इंदिरा**--( जणुं कांहींच झालं नाहीं असं दाखवून ) दादा माझ्या अंगांत पुरुषाचं मन वळवायचं कांहींच कसब नाहीं असं कां समजतोस.

**प्रताप०**--छे, हें रास्त नाहीं. मला वाटतं कीं, तूं विलासरावाचं मन वळवायला अशा कृत्रिम कसबाचा उपयोग करूं नये. हें आपल्या घराण्याला शोभणार नाहीं. पहिल्यानदां माझ्या मनांत विलासरावांच्या मागं जाऊन एकंदर हकीकतीचा खुलासा त्यालाच विचारायचं आलं होतं.

**इंदिरा०**--तुला त्यांनीं सांगितलं वाटतं, कीं मी त्याच्याशीं एखाद्या जुलमी माणसासारखी वागतें म्हणून; आतां पाहिलं नाहींस का ? स्वारी कशी चिडून गेली ती ! ( एकीकडे ) देवा ! माझं हृदय फाटून गेलं. ( रडते )

**प्रताप०**--ताई, मी येईपर्यंत तूं आंत बस.

**इंदिरा०**--आणि तूं कुठं जाणार ?

**प्रताप०**--मी कुठं जाणार हें तूं मला विचारूं नये हेंच बरं. ताई, तुला दुःख देणाऱ्याचा सूड घ्यायला जात असतां, या प्रतापरावाला अडवायची ब्रह्म-देवाची प्राज्ञा नाहीं.

**इंदिरा**--थांब दादा. तुला मी आपल्या दृष्टीआड होऊं देणार नाहीं.

**प्रताप०**--असं आहे तर तूंही माझ्याबरोबर चल. जर विलासरावानं वचन देऊन तुला फसवलं असेल, तर प्रत्यक्ष जयदेवमहाराजही त्याचं रक्षण करूं शकणार नाहींत. चल. आज सगळ्या गोष्टीची मी स्वतः चौकशी करतों. यांत विलासरावांचा वांक दिसला तर, इंदिरेची पाठ राखणारा या प्रतापरावासारखा तिला भाऊ आहे याची त्याला चांगलीच प्रचिति दाखवितों. ( जातात. )

## प्रवेश ४ था

( शिपाई पहारा करीत आहे. तारा त्याला न कळत येते. )

**तारा**--( स्वगत ) हिरोजीनं मला सगळं कांहीं सांगितलं. बाबांचा आणि दौलतरावांचा फार स्नेह होता. तेव्हां त्यांना या संकटांतून सोडवलंच पाहिजे. अजून हा शिपाई हालत नाहीं–याला फसवून जर दूर नेतां येईल, तर–तर काय देवच पावला. ( पुढं होऊन ) नाईकसाहेब—

**शिपाई**--( स्वगत ) अं ! नाईकसाहेब ह्मणून मला कुणी बरं हटकलं. काय, महाराजांनीं मला या कामगिरीबद्दल नाईक करून टाकलं. ( तारेला पाहून. ) आं ? ही पोर–ही नाजूक फटाकडी हिनं–हिनंच हटकलं !

**तारा**--नाईकसाहेब !

**शिपा०**--काय--काय ?

**तारा**--नाईकसाहेब ! आपण लांबीच्या प्रवासांत अगदीं थकून गेलां असाल आणि तुह्माला भूकहि सडकून लागली असेल. आंत पानं वाढलीं आहेत. थोडं जेऊन घ्या ह्मणतें ? येतां कां आंत ?

**शिपाई**—हो, हो, येतों ह्मणून काय विचारतां. तुमच्या सारख्यानं हुकूम केल्यावर हा बंदा कां नाहीं येणार ! चला, तुह्मी सांगाल तिथं येतों मी ! ( पुढं जाऊं लागतो, तोंच मागं वळून ) पण नाहीं ! मी आपला पहारा अगदीं विसरूनच जात होतों. काय बिडती आली तरी ही ! इकडे तुह्मी बोलावतां, तिकडे वढती हांका मारते ? आतां ऐकावं तरी कोणाचं ! माफ करा. यावेळीं इथून हालतां येत नाहीं.

**तारा**--( स्वगत ) मोठा रामोशी दिसतो हा शिपुर्डा ! पण नाईकसाहेब ? ( श्रीधरपंडित दिसतो त्याला पाहून ) ( स्वगत ) पंडित इकडे आले बरं झालं. एक नामी कल्पना सुचली आहे. पाहूं तर खरी कशी काय वठते ती !

**शिपाई**—( स्वगत ) पोर अशी गोंधळल्या सारखी कां बरं झाली ? सावध रहा मर्दा ! हा कांहीं गनीमी कावा दिसतो. आपल्या पाहऱ्यांत गाफिल राहूं नको !

( श्रीधरपंडित हातांत कागद घेऊन वाचित येतो )

**श्रीधर०**—" मृत्युपत्र शके १४११ वैशाख शुद्ध ११ रोजीं मी सरदार दौलतराव माने, सरमजामदार पहिल्या दर्जाचे सरदार; राहणार विजयनगर " ( श्वास टाकून ) फुकट गेली मेहनत ? पण त्याला कसं करावं ! भामट्यानं फसगतच केली. त्याला काय करणार !

**तारा**—( घाबरल्याचं मिष करून मोठ्यानं ) अगबाई ! सरदार दौलतराव माने इकडे कशाला आले ! आतां हे नाईक त्यांना पकडतील !

**शिपाई**—कोण ? सरदार दौलतराव माने ? काय काय ह्मटलं ?

**तारा**—नाहींहो ! मी कांहीं नाहीं ह्मटलं ! मी कांहीं–नाहीं ह्मटलं.

**शिपाई**—हे सरदार दौलतराव माने, ह्मणून नाहीं ह्मटलं तुह्मीं ? मीं तर स्पष्ट ऐकलं ( श्रीधरपंडिताजवळ जाऊन ) सरदार दौलतराव माने ते हेच ना ?

**श्रीधर०**—कोण मी सरदार दौलतराव माने, वा–वा–वा ! तुह्मी तर गम्मतच करतां राव !

**तारा**—अगबाई, मी वेडीनं काय केलं हें ! फसून नकळत सरदाराच्या गळ्याला फांस लाविला.

**शिपाई**—बाई, तुह्मी फसलां ह्मणूनच माझं काम झालं ! नाहीं तर मोठी फसगत होती आज. मारे जामानिमा चढवून आणि कानांत सव्वा हात लेखणी अडकवून कलमबहाद्दर बनले आहेत जणुं ( श्रीधरपंडितास ) सरदार दौलतरावसाहेब, तुह्माला मी आपलं गिरफदार केलं आहे.

**श्रीधर०**—सरदार, दौलतरावसाहेब, ह्मणजे–याचा अर्थ काय ? मी तर श्रीधरपंडित कारकून बेदरकर ! –प्रतिज्ञेवर सांगतों पाहिजे तर ! हं माझ्या अंगाला हात लावूं नका. नाहीं तर बेकायदा अटक केल्याबद्दल सरकारकडे फिर्याद लावीन !

**तारा**—हें पहा, माझी चूक झाली ! मी चुकलें क्षमा करा.

**श्रीधर०**—क्षमा !

**तारा**—माझ्या चुकीमुळं आपण खरे कोण तें या नाईकांना कळलं.

**श्रीधर०**—मी खरा कोण ?–श्रीधर पंडित बेदरकर नाहीं का मी ?

**शिपाई**--राव, कशाला हे लंपडाव आतां ? आपण खरे कोण तें या बाईच बोलून चुकल्या. आतां सोंगाची बतावणी फुकट आहे.

**श्रीधर०**--( हात जोडून ) पण हें पहा.

**शिपाई**—तें कांहीं नाहीं राव ! आपण आमचे कैदी आहां !

**श्रीधर०**--पण कोणत्या गुन्ह्याबद्दल !

**शिपाई**--सरकारचा हुकूम मोडल्याबद्दल ?

**श्रीधर०**--मी आणि सरकारचा हुकूम मोडला ! 'नी हुकूम माझ्या पाच्यावर पुजला असून मी हुकूम मोडणार ? काय कायदा हा !

**शिपाई**--हा लष्करी कायदा. आपल्यासारख्या समशेरबहाद्दरांनां ठाऊक आहे तोच !

**श्रीधर०**—कोण ? मी समशेरबहाद्दर आणि मला लष्करी कायदा ठाऊक ? शिपाईसाहेब मी बोलूनचालून कलमबहाद्दर, मी एक कलमी कायदा जाणतों—

**शिपाई**—राव, सोंग पण बेमालुम आणित आहां ! ही कारकुनी ऐट, ही कानावर लेखणी, आणि आपण कारकून नाहीं असं कोण ह्मणेल ? पण राव आह्मी फसणारे गडी नव्हे ! आह्मी सगळें जाणतों. आपल्या समशेरीनं गनीमांच्या लेखण्या करणारे सरदार दौलतराव माने ते आपणच, हें का या मर्दाला कळत नाहीं.

**श्रीधर०**—समशेरीनं गनीमांच्या लेखण्या करणारा मी ? आतां या जुलमाला काय ह्मणावं ! एकूण, तुह्मी मला मारून मुटकून समशेर बहाद्दर बनविणार ? तुह्मांला जर संषय असेल तर हा कागद पहा ह्मणजे तुमची खात्री होईल.

**शिपाई**—हा कागद कसला ?

**श्रीधर०**— दौलतरावांचं मृत्युपत्र आहे.

**शिपा०**--सरदार दौलतरावांचं मृत्युपत्र. ह्मणजे राव, आणखी ! पुरावा काय पाहिजे ? आपण तेच सरदार दौलतराव असं ठरवायला ? एऱ्हीं आपल्याजवळ हा कागद कसा आला ?

**श्रीधर०**—कसा आला ह्मणजे—त्या तोतया दौलतरावानंच माझ्याजवळ दिलं नाहीं का ? आणि—

**शिपा०**--झुट ! जास्त बात नको, चलाव.

**तारा०**—( स्वगत ) हें बाई ठीक जमलं ! ( उघड ) हाय हाय ! सरदार साहेब मी दुष्टेनं हें काय केलं आपल्याला ?

**श्रीधर०**—ताईसाहेब, आपलं डोकंच फिरलं आहे; कीं—माझें फिरवायचं आपला बेत आहे ? काय याला ह्मणावं-तरी काय ?

**तारा०**—ज्यांचे माझ्यावर इतके उपकार झाले—

**श्रीधर०**—उपकार ?

**तारा०**—त्यांनांच मी तोफच्या तोंडीं देववावं ना ?

**श्रीधर०**—तोफेच्या तोंडीं ? अरे बापरे ?

**तारा०**—अगबाई, तोफ डागली देखील ?

**श्रीधर०**—तोफ डागली.

**तारा०**—डोळे बांधून आपल्याला तोफेपुढें उभं केलं ! झालं ! तोफेला सरबत्तीहि दिली !-तोफ उडवली ! आणि आपल्या राईराईएवढ्या ठिकऱ्या झाल्या ! ( मुद्दाम मुर्च्छा येऊन पडते. )

**शिपाई०**—( तिला सांवरून ) अरे-रे ! हें काय ! असं करून कसं चालेल ? ( तारा शुद्धीवर आल्यासारखं करून त्याच्याजवळून दूर जाते ) तोफेच्या तोंडीं आतां जाणार. हें तर आतां उघडच आहे ! आणि तें कांहीं चुकावयाचं नाहीं. हुकूम मोडणाराला जयदेवमहाराजांनीं जिवानिशीं सोडलं असं कधीं तरी झालं आहे ?

**श्रीधर०**—पण मी प्रतिज्ञेवर सांगतों-लेखणीची शपथ घेऊन सांगतों.

**शिपाई०**—तें कांहीं नाहीं ! चलो !

**श्रीधर०**—मी नाहीं येत इथून ! मी हालणार नाहीं. मला इथं सुळावर दिलं तरी मी—

**शिपाई०**—सुळावर ! लढवय्याला सूळ कीं तोफ ? वा. जी. सरदार ! चलो.

**श्रीधर०**—अरे, खून, खून, धांवा-धावां ( शिपाई धरून नेतो. )

**तारा०**—हें ठीक झालं. आतां या शिपायाची चुकी त्याच्या लक्षांत येण्यापूर्वी दौलतरावांची सुटका केली पाहिजे. ( जाते. )

---

## प्रवेश ५ वा.

**स्थळ**--ताराबाईचे वाड्यासमोरील रस्ता.

( विलासराव व मानाजी येतात. )

**माना०**—हा पहा ! हाच ताराबाईचा महाल.

**विला०**--मानाजीराव, तुह्मीं माझा निश्चय कायम केलात ! त्याप्रमाणं आतांच जाऊन मी ताराबाईनां भेटतों. ( पुढें जाऊन ) कोण आहे आंत ? ( नोकर येतो त्यास ) ताराबाई आहेत काय ?

**नोक०**—होय सरकार. त्या वरतीं दिवाणखान्यांत बसल्या आहेत.

**विला०**---बरं त्यांनां सांग कीं विलासराव तुमच्या भेटीला येत आहेत. ( नोकर जातो ) मानाजीराव, माझी अब्रू वांचवण्यास ताराबाईशीं लग्न केल्याशिवाय दुसरा कांहींच मार्ग नाहीं काय ?

**माना०**--मुळींच नाहीं. ताराबाईशीं लग्न केल्यानं या शहरांत पसरलेल्या बाजारभुमकेला चांगलाच आळा बसेल आणि राजाच्या गैरवाजवी प्रेमाला तुह्मी मदत करतां असें ह्मणणारांचीं तोंडं साफ बंद पडतील.

**विला०**--ठीक आहे. तुमच्या ह्मणण्याप्रमाणं करतोंच आतां. जातों तर मी. ताराबाईही वाट पहात असेल.

**माना०**--या. ( विलासराव जातो. ) उतावळया, खुळ्या जा. खुशाल जा. तुझा द्वेष करण्याची देखील तुझी योग्यता नाहीं. (पोषाख बदललेला जयदेव येतो)

**जय०**—विश्वासू दोस्त मानाजीराव !

**माना०**-- सरकार !

**जय०**--इंदिरा मिळण्याचा कांहीं लाग आहे का ?

**माना०**--सरकार ! तुमची उत्सुकता साहजिकच आहे आणि या मानाजीचे श्रमही आतां फुकट जाणार नाहींत यामुळं मला आनंद होत आहे. सरकार,—

विलासरावानं इंदिरेला साफ सोडली व माझ्याच सल्यानं तो हल्लीं ताराबाईशीं लग्न करायला तयार आहे.

**जय०**—ह्मणतां काय मानाजीराव ? पण हें तुह्मीं कसं जुळवलंत ?

**माना०**—ताराबाईचा मला या कामीं उपयोग करून घ्यावा लागला. इंदिरा विलासरावांना एक प्रेमपत्रिका लिहित बसली होती. इतक्यांत तिला ते विजयनगरास परत येणार ह्मणून बातमी कळली. त्या आनंदाच्या भरांत तें अर्धें लिहिलेलें पत्र तसंच मेजावर पडून राहिलें. आमच्या ताराबाईनीं ती बहुमोल प्रेमपत्रिका इंदिरेला न कळतां हस्तगत करून घेतली आणि ती मला आणून दिली. ' महाराज ' ' प्राणेश्वरा ' ' प्रियकरा '—इत्यादि प्रेमाच्या विशेषणामध्यें विलासरावांचं नांव कुठंच लिहिलं गेलं नव्हतं. मी त्याचा फायदा घेऊन तें पत्र इंदिरेनं सरकारांना लिहिलं होतं असं विलासरावांला भासवून दिलं.

**जय०**—शाबास ! शाबास !

**माना०**—नंतर आपण दिलेल्या आपल्या तसबिरीवरून तर त्याची पुरीच खात्री झाली. तो प्रतापरावाच्या वाड्यांतून बाहेर पडतो आहे तोंच जसें काय साहजिक गांठ पडल्यासारखी करून त्याला भेटलों. इंदिरेबद्दल आधींच झालेल्या त्याच्या संतापांत मीं आणखी भर घातली आणि त्याला ताबडतोब ताराबाईला मागणी घालण्याची भर दिली. हा पाहिलात का ताराबाईचा वाडा ? आपण येण्यापूर्वींच विलासराव तिला भेटण्याकरितां आंत गेला आहे.

**जय०**—पण या सगळ्या खटपटींत इंदिरा मला कशी मिळणार ?

**माना०**—मी आपल्याला सांगितलेंच आहे कीं प्रतापरावच इंदिरेला आणून सरकारचे स्वाधीन करील ह्मणून.

**जय०**—हें तुह्मी सांगितलंत खरं. पण हें घडवून आणलेंत तर हा कृतज्ञ जयदेव तुह्माला अर्धे राज्य बक्षिस देईल.

**माना०**—( मनांत ) हा मानाजी सगळं राज्य घेणार !

**जय०**—मानाजीराव हें कसंही करून काम फत्ते करा ह्मणजे तुमचे उपकार मी जन्मभर विसरणार नाहीं. बरं मी जातों. परंतु आज संध्याकाळपर्यंत कांहीं तरी आपल्याकडून नक्की बातमी आली पाहिजे. समजलेत. ( जातो )

**माना०**--रात्रीं बातमी ऐकायला तूं जिवंत रहाशील तर ना ? आजच प्रतापरावाची तलवार तुझं रक्त प्राशन करील अशी खबरदारी हा मानाजी घेणार आहे. ही कोण ? इंदिरा ! ( इंदिरा येते )

**इंदिरा०**--मानाजीराव--

**माना०**--या विजयनगरांतील अप्रतिम स्त्रीरत्नाचं या मानाजीजवळ काय काम आहे ?

**इंदिरा**—विलासराव कांहीं वेळापूर्वी आपल्याबरोबर होते ह्मणून ऐकलं ते हल्लीं कुठं आहेत हें कळवाल तर फार उपकार होतील.

**माना०**--जर ते कुठं आहेत येवढीच आपल्याला माहिती पाहिजे असेल तर मी सांगूं शकेन.

**इंदिरा**--कुठं आहेत ते ?

**माना०**--ते पलीकडे ताराबाईच्या वाड्यांत आहेत.

**इंदिरा**—ताराबाईच्या वाड्यांत ? तिथं काय त्यांचं काम आहे ?

**माना०**—तुह्माला अजून कळलंच नाहीं तर. विलासराव आणि ताराबाईचं—

**इंदिरा**--विलासराव आणि ताराबाईचं काय ?

**माना०**--लवकरच लग्न ठरलं आहे.

**इंदिरा**--विलासराव व ताराबाईचं लग्न ?

**माना०**--इंदिरे तुला वाईट वाटल्यासारखं दिसतं. खरोखर इंदिरे तूं जर मला विलासरावासारखं वागविलं असतंस तर अशा क्षुल्लक कारणावरून मी त्याच्यासारखा तुझा त्याग केला नसता. ( इंदिरा एकीकडे पहात उभी राहिली ) हिची आतां तिकडेच तंद्री लागली आहे. गोळीचा अम्मल बराच चढला. हिला आतां येथेंच सोडून जावें व काय मजा होते ती दुरून पहावी हें बरें ( जातो. )

**इंदिरा**--( उसासा टाकून ) विलासरावांचं आणि ताराबाईचं लग्न ठरलं ! होय. असंच मी ऐकलं नाहीं का ! कां माझी ऐकण्यांत चूक झाली ! छे चूक तर नाहींच झाली. विलासरावांचं आणि ताराबाईचें लग्न होणार आणि विलासराव ! तुमच्याकरितां प्राण देण्यास तयार असलेली इंदिरा या देवडीच्या दारा बाहेर

उभी रहावीना ? नाहीं मी आंत जाणार ( पुढें जाते ) पण नको ! जन काय ह्मणेल ? आणि दादा तरी काय ह्मणेल ?

( विलासराव ताराबाईचे घरांतून येतो. )

**विलास०**--इंदिरा आणि इथं उभी !

**इंदिरा**—मानाजीरावांच्या सांगण्याचा प्रत्यक्ष अनुभव पहाण्याला हे हतभागी इंदिरे तूं जिवंत कशी राहलीस ?

**विलास०**—हिला अद्याप मी पुन्हां तिच्या जाळ्यांत सांपडेन असं वाटतं काय ? छेः तिच्याकडे न पहातां तिरस्कारानें एकीकडेच निघून जावें.

( पडद्याच्या दुसऱ्याबाजूस जाऊं लागतो ) आतां तिचा थोडासा सूड घेतल्या सारखा वाटतो आहे ( जाऊं लागतो. )

**इंदिरा**—महाराज आपल्याला एक विनंति आहे. ( विलासराव न ऐकतां जाऊं लागतो. ) विलासराव—

**विलास०**—विलासरावाला कोणी हांक मारली. आपण का ! विलासराव माझंच नांव. आपलं काय काम आहे ?

**इंदिरा**—महाराज मी—

**विलास०**—हं, काय तें सांगा. या अशा एकएक शब्दानं मला कांहीं कळत नाहीं. माझी जिची कांहींच ओळख नाहीं तिचं माझ्याजवळ काम तरी काय असणार ?

**इंदिरा**—माझी आपली कांहींच ओळख नाहीं ?

**विलास०**—छे, ओळख असल्याचं कांहींच आठवत नाहीं. पाहूं बरं ! माझ्या ओळखीच्या एका स्त्रीच्या आणि तुमच्या चेहऱ्यांत थोडंसं साम्य दिसतं खरं. पण तें उगाच पुसट आहे. माझी इंदिरा मूर्तीमंत सद्गुण आणि प्रेम याची मूर्ती होती आणि नुक्त्या जन्मलेल्या मुलाप्रमाणें तिचं अंतःकरण पवित्र होतं त्याचं काय आतां.

**इंदिरा**—महाराज ! मी ऐकलं तें खरं का ?

**विलास०**--काय ऐकलंत तुह्मीं ?

**इंदिरा**—आपलं लग्न जमलं आहे हें खरं का ?

**विलास०**--हें पहा. बाई ज्याचा तुमचा कांहींच परिचय नाहीं अशा मनुष्याची चौकशी करून तुह्माला काय फायदा मिळणार हें मला समजत नाहीं.

**इंदिरा**--महाराज !

**विलास०**--परंतु जर माझ्यासंबंधीं तुह्माला माहिती पाहिजेच असेल तर माझी सांगायला कांहीं हरकत नाहीं. मी आजच शिर्क्यांच्या ताराबाईला मागणी घातली आहे.

**इंदिरा**--शहरांत पसरलेली बातमी खरी आहे तर ! आपलं लवकरच लग्न होणार ?

**विलास०**—एका उदारमनाच्या व पवित्र अंतःकरणाच्या स्त्रीशीं माझं लवकरच लग्न होणार. माझ्या माहितीच्या कित्येक स्त्रियांचीं हृदयं अनिवार विषयवासनेनं भरून राहिलीं आहेत.

**इंदिरा**—आपलीं दूषणं ऐकायला मी आलें नाहीं. माझं येण्याचं कारण—

**विलास०**—आपली स्वतःची तरफदारी करायची असेल.

**इंदिरा**—नाहीं मुळींच नाहीं. प्रत्यक्ष देवदूतांनी येऊन माझी तरफदारी केली तरी आपल्या हृदयांत आतां दयेचा अंकुर फुटायचा नाहीं. हें मी पुरें जाणून आहें. ज्या भाग्यवान् कुमारिशीं आपण लग्न लावणार आहांत तिच्या सुखाआड येण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. माझी परमेश्वराजवळ एवढीच प्रार्थना आहे कीं, त्यानें तुह्मा उभयतांना अक्षय सुखांत ठेवावें व आपल्याला दिर्घायुष्य द्यावें.

**विलास०**--इंदिरे ? तुझ्या पवित्र हृदयावर जयदेव महाराजांची तसबीर बाळगून तूं त्याला कायमचं पापी करून ठेवलंस. माझ्या तसबिरी ऐवजीं तुला राजाची तसबीर जास्त आवडली.

**इंदिरा**—महाराज तुम्ही मला बोलायला फुरसत दिली नाहींत. माझ्याशीं कोणी आणि केव्हां नीचपणा केला त्याचा शोध करायलाही मला अवधी मिळाली नाहीं. आतां ती वेळ निघून गेली. आपण ताराबाईचे झालांच. इंदिरेला आतां आपली आशा राहिली नाहीं. ( डोळे पुसते. )

**विलास०**--हें पहा अजून तरी कबूल कर.

**इंदिरा**—काय कबूल करूं. तुम्ही, माझं नशीब आणि सर्व जगच माझ्या

विरुद्ध उठलें तर मी किती पुरी पडणार ? विलासराव आजचा दिवस दादाच्या नजरेस पडूं नका एवढी मला भीक घाला. ( डोळे पुसते )

**विलास०**--इंदिरे प्रतापरावाच्या नावानें मला भेवडावूं पहातेस काय ?

**इंदिरा**--विलासराव, आपण एकवेळां माझ्यावर प्रेम करीत होतां त्या प्रेमाची आठवण करा आणि मला एवढी भीक घाला. आजचा दिवस गेल्यावर मी दादाची कशी तरी समजूत घालीन. आपण माझी अवहेलना केलीत त्यांत आपला दोष नाहीं. सर्वस्वी माझाच दोष आहे असं सुद्धां मी दादाला सांगेन पण आज दादाच्या नजरेस पडूं नका.

( प्रतापराव येतो. )

**प्रता०**--ताई तुझा अभिमान, तुझी अक्कल गेली कुठें ? तुझं हें कृत्य प्रतापरावाच्या नांवाला शोभण्यासारखं नाहीं. चालती हो. आतांच्या आतां येथून निघून जा. विलासराव.

**विला०**--आपल्याला काय पाहिजे ?

**प्रता०**--तुझे प्राण पाहिजेत. मिळालं तुला थोडक्यांत उत्तर ! इंदिरेवर आपण प्रेम करीत होतां. तिचंही आपल्यावर प्रेम होतं. आपल्याशीं लग्न करण्याबद्दल आपण तिची संमत्ति मिळविलीत व मीही तुमच्या लग्नाला रुकार दिला. नंतर-पण तें कशाला पाहिजे. आतां इंदिरेची अवहेलना करून तुह्मी ताराबाईशीं लग्न करणार आहां असें माझ्या कानावर आलं आहे. विलासराव ! इंदिरा या प्रतापरावाची बहिण आहे समजलांत.

**विला०**--बरं मग !

**इंदिरा**--( दोघांमध्यें येऊन ) दादा ! दादा ! क्षमा कर माझी कांहीं अवहेलना झाली नाहीं. विलासरावांनीं मला मुळींच दुःख दिलं नाहीं. दादा माझ्या तोंडाकडे पहा यावर तुला दुःखाची छटा तरी दिसते काय ? मी उलट हंसतें आहें. दादा ( दुःखाचा उमळा येऊन एकदम रडूं लागते ).

**प्रता०**--विलासराव जर तुमच्यामध्यें माणुसकी शिल्लक असेल तर--

**विला०**--माझ्या नांवाचा जगांतील सर्व पापकर्मे छपविण्यास मी उपयोग करून देईन अशी जर आपल्याला आशा असली तर ती फुकट आहे.

**प्रता०**--आपण इंदिरेचा त्याग केलात हें खरं काय ?

**विला०**—होय जयदेव महाराजांकरितां मी इंदिरेचा त्याग केला आहे.

**प्रता०**—जयदेव महाराजांकरितां ?

**इंदि०**—दादा दादा क्षमा कर ! विलासराव तुमच्या पायां पडतें.

**प्रता०**—( तिचें न ऐकतां ) विलासराव आतां तुह्मी महाराजांबद्दल कांहींसे बोललांत, तें पुन्हां बोला पाहूं !

**विला०**—मी आपल्याला सांगितलं कीं जयदेव महाराजांच्या प्रीतिपात्रा-बरोबर मी लग्न करणार नाहीं.

**प्रता०**—महाराजांचं प्रीतिपात्र ! कोण ?

**विला०**—( इंदिरेकडे बोट दाखवून ) ती पहा.

**प्रता०**—इंदिरा ?

**विला०**—होय, इंदिरा.

**प्रता०**—( रागानें विलासरावाचे तोंडावर गुद्दा मारतो ) हेंच प्रतापरावाचं उत्तर. चल नीचा माझ्या मागें चल. हा प्रतापराव नगरच्या वेशीबाहेर तुझी वाट पहात राहील ( जातो )

**इंदिरा**—( विलासराव तरवार उपसून जाऊं लागतो. इंदिरा गुडघे टेंकून त्याच्या पुढें उभी रहाते ) महाराज मी तुह्माला जाऊं देणार नाहीं.

**विला०**—त्याचा प्राण घेतल्याशिवाय मला समाधान व्हायचं नाहीं. इंदिरे तूं मला अडवूं शकशील ही आशा व्यर्थ आहे. चल सोड माझे पाय ! ( हिसका देतो )

**इंदिरा**—( मोठ्यानें ) ताराबाई, धांवाहो धांवा तुमच्या पतीचे प्राण वांचवा.

**विला०**—तर मग तुला ढकलूनच दिलें पाहिजे. ( ढकलून देतो, इंदिरा एकीकडे पडते. ) हा पहा मी चाललों. ( जातो )

**इंदिरा**—( उठून ) हृदया दुभंगूं नकोस ( ताराबाईचे दारावर धक्के देते ) ताराबाई, धांवाहो धावा आणि आपल्या प्रियकराचे प्राण वांचवा.

( ताराबाई प्रवेश करते )

**तारा०**—आग लागलेल्या घरांत सांपडलेला मनुष्य जसा भीतीनं ओरडतो तसं कोण बाई हांका मारित आहे ? अगबाई इंदिराबाई ही.

**इंदि०**--ताराबाई, मी प्राणाची भीक मागतें आहें. तुमच्या प्रियकराच्या प्राणाची तुमच्याजवळ भीक मागतें. माझ्या दुःखानें दादा वेडा होऊन त्यानं आतांच विलासरावांना गुद्दा मारला आणि ते दोघेही निघून गेले.

**तारा०**—देवा, देवा !

**इंदि०**--ताराबाई अशा स्वस्थ काय उभ्या राहिल्यात ? आपल्या प्राणेश्वराचे प्राण वांचवा.

**तारा०**—इंदिराबाई माझे प्राणेश्वर विलासराव नाहींत, माझ्यानं त्यांना सांगवलं नाहीं. पण तुह्मांला मात्र आतां सांगतें. माझं त्यांच्यावर मुळींच प्रेम नाहीं. माझ्या प्रेमाचा विषय मुरारराव आहेत. आणि तो विषय हस्तगत करण्याकरितां मी एक तुमचं पत्र हस्तगत केलं आणि विलासराव तुमच्या घरीं येणार या आनंदाच्या भरांत तुह्मी असतां या राक्षसणीनं विलासरावाची तसबीर लपवून जयदेव महाराजांची—

**इंदि०**—तसबीर माझ्या हातांत दिलीत आणि माझा घात केलात. ताराबाई, माझ्या जिवाचे मैत्रीणीनं माझा गळा कापला.

**तारा०**—पण आतां मात्र त्याची फेड करतें. इंदिराबाई मला क्षमा करा. मी स्वतः जयदेवमहाराजांकडे जाऊन, त्यांना सर्व कांहीं सांगतें आणि प्रतापरावाचं व विलासरावाचं द्वंद्व होऊं न देण्यावद्दल विनंति करतें. ते परत आल्यावर मी सारी हकीगत तुह्माला सांगेन.

**इंदिरा**—विलासराव, प्राणेश्वरा, ही इंदिराही तुह्माला वांचवावयाला धांवत आली पहा.

---

## प्रवेश ५ वा.

**स्थळ**--ताराबाईचे वाड्यासमोरील रस्ता.

( विलासराव व मानाजी येतात. )

**माना०**—हा पहा ! हाच ताराबाईचा महाल.

**विला०**—मानाजीराव, तुह्मीं माझा निश्चय कायम केलात ! त्याप्रमाणं आतांच जाऊन मी ताराबाईनां भेटतों. ( पुढें जाऊन ) कोण आहे आंत ? ( नोकर येतो त्यास ) ताराबाई आहेत काय ?

**नोक०**—होय सरकार. त्या वरतीं दिवाणखान्यांत बसल्या आहेत.

**विला०**—बरं त्यांनां सांग कीं विलासराव तुमच्या भेटीला येत आहेत. ( नोकर जातो ) मानाजीराव, माझी अब्रू वांचवण्यास ताराबाईशीं लग्न केल्याशिवाय दुसरा कांहींच मार्ग नाहीं काय ?

**माना०**—मुळींच नाहीं. ताराबाईशीं लग्न केल्यानं या शहरांत पसरलेल्या बाजारभुमकेला चांगलाच आळा बसेल आणि राजाच्या गैरवाजवी प्रेमाला तुह्मी मदत करतां असें ह्मणणारांचीं तोंडं साफ बंद पडतील.

**विला०**—ठीक आहे. तुमच्या ह्मणण्याप्रमाणं करतोंच आतां. जातों तर मी. ताराबाईही वाट पहात असेल.

**माना०**—या. ( विलासराव जातो. ) उतावळ्या, खुळ्या जा. खुशाल जा. तुझा द्वेष करण्याची देखील तुझी योग्यता नाहीं. (पोषाख बदललेला जयदेव येतो)

**जय०**—विश्वासू दोस्त मानाजीराव !

**माना०**— सरकार !

**जय०**—इंदिरा मिळण्याचा कांहीं लाग आहे का ?

**माना०**—सरकार! तुमची उत्सुकता साहजिकच आहे आणि या मानाजीचे श्रमही आतां फुकट जाणार नाहींत यामुळं मला आनंद होत आहे. सरकार,—

**माना०**--मला सर्व माहित आहे. इंदिरे तूं कांहीं काळजी करूं नको. परमेश्वर कृपेनं या मानजीला वेळींच बातमी मिळाल्यामुळें त्यांनां सध्यां पकडून बंदोबस्तांत ठेवलं आहे.

**इंदि**--कुठं ? कुठं आहेत ते ? आणखी कुणी एवढं केलं हें ?

**माना०**--मीच केलं !

**इंदिरा**--तुम्ही ?

**माना०**--विलासरावांचं आणि ताराबाईचं लग्न ठरल्याचं ऐकल्याबरोबरच मला याचा पुढं काय परिणाम होईल हें कळून चुकलं आणि त्या प्रमाणं पाळत ठेऊन मी बंदोबस्तही केला.

**इंदिरा**--मानाजीराव या गरीब इंदिरेवर आपले अगणित उपकार झाले ! ( लवून हात जोडून उभी रहाते. )

**माना०**--छे ! छे ! इंदिरे ! अशी लवूं नको ! त्यानं तुझा सुंदर चेहरा माझ्या दृष्टी आड होतो. तुझ्या दर्शनानं देवसुद्धां वेडे होतील. मग माझी काय कथा ? ( तिचे हात धरून ) तुझ्या सौंदर्यानं वेडा झालेल्या या मानाजीला एवढं तरी बक्षीस दे ! ( तिच्या हाताचं चुंबन घेतो. )

**इंदिरा**--मानाजीराव-पण-या वेळीं मीं तुह्मांला क्षमा करतें. मला दादाच्या भेटीला गेलं पाहिजे !

**माना०**--दादाच्या कां ह्मणतेस ! विलासरावाच्या-माझ्या प्रतिस्पर्ध्याच्या भेटीला गेलं पाहिजे असं कां ह्मणत नाहींस ? इंदिरे अशी बिचकूं नकोस. त्याला प्रतिस्पर्धी हेंच नांव शोभतं ! मी तरी निदान त्याला दुसऱ्या नांवानं ओळखत नाहीं.

**इंदिरा**--महाराज ! ही गोष्ट आपण दोघांनीही विसरली पाहिजे.

**माना०**--काय विसरलं पाहिजे ? मला बरोबर ऐकूं आलं नाहीं. ( इंदिरा जाऊं लागते. ) थांब अशी जाऊं नकोस. मी तुझी जी कांहीं अल्प स्वल्प कामगिरी केली त्याचा मोबदला ह्मणून तरी माझं ऐकून घे. मला पुन्हा सांग काय विसरलं पाहिजे ?

**इंदिरा**--क्षमा करा. मला कांहीं सांगायचं नाहीं. मला जाऊंद्या !

**माना०**—दम धर. घाई करूं नकोस. मी लवकरच तुला तुझ्या प्रियकराकडे जाऊं देईन. परंतु तो तुला मात्र निचेष्टीत दिसेल. तूं त्याच्या गळ्यांत कितीही हात टाकलेस तरी त्याचे हात खालींच लोंबत रहातील. तुझ्या ओंठाला त्याचे ओंठ गार लागून तुझ्या आलिंगनानं त्याच्या हृदयाला ऊब येणं शक्य नाहीं. आणि तूं जर एवढं केलंस तर तूं कोणीतरी चेटकी नाहींतर जादूगार आहेस असं मी समजेन. नाहीं! नाहीं! इंदिरे! तूं विलासरावाची बायको होणं आतां शक्य नाहीं. या मानाजीलाच तूं माळ घातली पाहिजेस!

**इंदिरा**—काय? तुह्माला?

**माना०**—होय मला! आणि तीही आज मध्यरात्रीच्या आंतच. ( दुरून प्रतापरावाला पाहून ) ओहो! झालं माझं काम! विजयनगरचा राजमुगुट या मानाजीच्या मस्तकावर आतां खास बसला. इंदिरे! तो पहा प्रतापराव! त्याच्या रक्तानं भरलेल्या तरवारीनंच या मानाजीला आज राजपद दिलं! (जातो.)
( रक्तानं भरलेली तरवार घेऊन प्रताराव येतो. )

**प्रता०**—कोण इंदिरा?

**इंदिरा**—दादा!

**प्रता०**—आज मात्र तुझा दादा हें नांव सार्थ केलं. हें पाहिलंस का? ( तरवार दाखवितो. )

**इंदिरा**—अगबाई! तुझ्या तरवारीवर रक्त आहे.

**प्रता०**—तें असायलाच पाहिजे होतं!

**इंदिरा**—दादा! तूं—

**प्रता०**—मी तुझा सूड उगवला.

**इंदिरा**—राक्षसा! तूं विलासरावांचा वध केलास!

**प्रता०**—मी तुझा सूड घेतला. विलासरावानं माझा स्वतःचा जर अपमान केला असता तर कदाचित् त्याला मारल्याबद्दल मला वाईट वाटलं असतं. परंतु तुझी अवहेलना माझ्याच्यानं सहन होणार नाहीं.

**इंदिरा**—विलासराव! विलासराव! माझ्या प्राणा! माझ्या जीवितेश्वरा! आतां तुह्मांला कुठं शोधूं? ( रडूं लागते. )

**प्रता०**—इंदिरे! हें काय वेड आहे! या प्रतापरावाला जिवापेक्षां अब्रू जास्त प्यार आहे, हें तुला माहीत नाहीं काय?

**इंदिरा**—असं जर आहे, तर दादा! माझाच प्राण घे! आणि आपल्या घराण्याची अब्रू कायमची वांचव!

**प्रता०**—इंदिरे ! चल घरीं जाऊं ? ह्मणजे कालानं तुझा दुःखवेग हलका होईल ! मलाही इथून लवकरच कुठं तरी दूरदेशीं गेलं पाहिजे. कारण मी आता सांपडलों तर या विजयनगरच्या कायद्याप्रमाणं मला सुळावर जावं लागेल. ( तुकोजी, शिपाई वगैरे येतात. )

**तुको०**—पकडा त्याला. प्रतापराव कर्तव्यापुढं माझा इलाज नाहीं. तुम्ही आतांपासून माझे कैदी आहां ?

**प्रता०**—तुमचा त्यांत कांहींच दोष नाहीं. मी आतांच इथून दूरदेशीं जायचा बेत करीत होतों. परंतु तुम्ही माझा बेत सिद्धीस जाऊं दिला नाहींत. जशी परमेश्वराची मर्जी. हा मी तुमच्या स्वाधीन होतों.

**तुको०**—तुह्माला या कृत्याबद्दल सुळीं जावं लागेल ?

**इंदिरा०**—सुळीं जावं लागेल ?

**तुको०**—जयदेव महाराजांनीं तुमच्या द्वंद्वाची बातमी ऐकली आणि हुकुम केला कीं विजयनगरचा कायदा मोडणाऱ्या या दोघांपैकीं जो जिवंत राहील त्याला सुळीं द्यावा.

**प्रता०**—तुम्हीं सांगण्यापूर्वींच माझं काय होणार हें मला माहित होतं !

**इंदिरा**—( प्रतापरावाच्या आंगाला बिलगून ) सुळीं जावं लागणार ? दादा ! तुला सुळीं जावं लागणार नाहीं. नाहीं ! हें खरं नाहीं.

**प्रता०**—इंदिरे !–ताई–गृहस्थ आपल्याला एवढीच विनंती आहे, कीं एक क्षणभर थांबा ! ही माझी धाकटी बहीण आहे. हिच्या शिवाय मला या जगांत कोणी आप्त नाहीं आणि हिच्याकरतांच मी मरणाला तयार आहें.

**इंदिरा**—नाहीं, नाहीं. दादा मरणाची गोष्ट काढूं नकोस ! ( मूर्छीत पडते ).

**प्रता०**—इंदिरे ! इंदिरे ! बोल. बोल कांहीं. मरणापूर्वी तुझा आवाज माझ्या कानांत दुमदुमून राहूंदे. ह्मणजे मरणाबद्दल मला यत्किंचितही दुःख होणार नाहीं. हिला मूर्च्छा आली. गृहस्थहो माझी तुह्माला एक प्रार्थना आहे. माझा वाडा इथून जवळच आहे. तुह्मी माझ्या बरोबर तिथपर्यंत चला ह्मणजे मी हिची योग्य व्यवस्था लावून तुमचे बरोबर येतों.

**तु०**—चला आमची कांहीं हरकत नाहीं ( जातात. )

**अंक २ रा समाप्त.**

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**--तुरुंग, शिपाई पहारा करीत आहे. तुकोजी येतो.

**तुकोजी**--कोण आहेरे आज पहाऱ्यावर ?

**शिपाई**--एसाजी नाईकाचा आज पहारा आहे. ते आतांच फेरी टाकून गेले.

**तुकोजी**--ठीक आहे. येसाजीला सांग कीं, आज पहाऱ्याचा विशेष बंदोबस्त झाला पाहिजे. प्रतापरावास आतांच शिपाई इकडे आणून तुमच्या ताब्यांत देतील. दोन शिपाई आंत जास्त ठेवून तुरुंगाभोंवतीं सक्त पहारा ठेवा. त्याला कोणीही भेटूं देऊं नका. कदाचित् त्याला सोडविण्याचाही प्रयत्न होईल तरी फार सावधपणानें असा. प्रतापराव जर तुमचे पहाऱ्यांतून पळाला तर त्याच्याबद्दल तुह्मांला सर्वांना सुळीं जावें लागेल हें ध्यानांत ठेवा.

**शिपाई**--जी सरकार. मी नाईकांना आपला निरोप कळवितों.

( मानाजी येतो )

**मानाजी**--प्रतापराव कुठं आहे ? काय ? त्याला अजून इकडे आणलं नाहीं ?

**तुकोजी**--प्रतापरावांना पकडलं त्यावेळीं इंदिराबाई त्यांच्या बरोबर होत्या. त्यांना मूर्च्छा आल्यामुळें प्रतापराव त्यांना घरीं घेऊन गेले आहेत. पहारेकरी बरोबर आहेत. ते त्यांना लवकरच इकडे आणतील.

**मानाजी**--तुकोजीराव, मला इतक्यांत हेरानं सांगितलं कीं, प्रतापरावाच्या वारानं विलासराव ठार झाले नाहींत. त्यांना फक्त जखम झाली आहे. परंतु, हे पहा, आपल्याला यासंबंधी नक्की बातमी लागेपर्यंत या गोष्टीचा गवगवा होऊन उपयोगी नाहीं. तुह्मी त्यांचे स्नेही आहां. नाहीं काय ?

**तुकोजी**--होय अशी त्याची समजूत आहे. परंतु आपल्याशिवाय खरा स्नेही या जगांत मला कोणीच नाहीं.

**मानाजी०**—तुझी असेच विलासरावांकडे जा व तिकडची काय खरी हकीकत आहे त्याचा तपास करा. मग परत आल्यावर दौलतराव मान्याच्या बाबतींत तुमच्या स्नेहाची कसोटी घेण्याचा लवकरच प्रसंग येणार आहे.

( तुकोजी जातो. )

या विलासरावाबद्दलची खरी हकीकत सध्या गुप्तच ठेविली पाहिजे. मग प्रसंगाप्रमाणं पुढें काय होतें तें पाहूं.

( प्रतापराव, शिपाई वगैरे येतात. )

**प्रताप०**—आतां खुशाल मला वाटेल तिथं न्या. या जगांतला मायापाश मी पार तोडला आहे. प्रतापराव मरणाला भीत नाहीं. ( मानाजी समोर दिसतो. ) कोण मानाजीराव ! यावेळीं आपण मुद्दाम इकडे येण्याचा उद्देश मी समजलों. परंतु आपला शत्रु संकटांत पाहून त्यांतच आनंद मानण्याइतके क्षुद्र मनाचे आपण आहां ही मला कल्पना नव्हती.


**माना०**—नाईक, प्रतापराव माझ्या ताब्यांत आहेत. तुमची कामगिरी संपली. तुझी आपले लोक घेऊन जा. ( शिपाई मुजुरा करून जातात. ) प्रतापराव मानाईजीराव आपल्या शत्रूवर हा असा सूड घेत असतो.

**प्रताप०**—मरणाच्या द्वारीं उभ्या असलेल्या माणसानं या सूडाबद्दल काय समजायचं. ?

**मानाजी**—हेंच कीं, मानाजी हा त्याचा अद्याप स्नेहीच—आहे. आपण—मला विश्वासघातकी म्हटलं होतं.

**प्रताप०**—आणि अद्यापही आपल्याला तेंच म्हणतों.

**मानाजी**—बरं तर समजा कीं, मी विश्वासघातकीच—आहें. परंतु हें लक्षांत ठेवा कीं आपल्या गुणाची मी किंमत जाणतों. तुमचे वडील—जयदेव महाराजांचे शिक्षक होते. स्वामीनिष्ठा ही तुमच्या घराण्याच्या हाडीं खिळलेली आहे. आपले—सद्गुण न समजण्याइतका मी मूर्ख नाहीं. म्हणूनच आपल्यासारख्याचा स्नेह संपादण्याची माझी खटपट आहे. विलासराव मेले ही खबर मला लागतांच मी महाराजांकडे गेलों व स्वतः आपल्याबद्दल रदबदली केली.



**माना०** – मलां सांगायला सुद्धां शरम वाटते, तुमच्या प्राणाबद्दल तुम्हीं आरण होऊन आपली बहीण या कामांधाच्या विषयवासनेला बळी द्यावी असें त्याचें म्हणणें आहे. [ पृष्ठ ६५. ] [ फोटोग्राफर्स–गुरुदास अँन्ड को.

**मानाजी**—दोन तास महाराजांची विनवणी केली तेव्हां त्यांनीं तुमची शिक्षा रद्द करण्याचें कबूल केलं.

**प्रताप०**—मानाजीराव, तुमचे मध्यस्थीनें प्राण वांचवून घेण्यापेक्षां ह्या प्रतापरावाला मरण्यांत जास्त आनंद झाला असता. परंतु माझ्या मरणानं माझी बहीण निराश्रित होईल तिच्याकरितां तरी मला तुमचे उपकार मानणं भाग आहे.

**माना०**—माझे उपकार मानण्याचं कारण नाहीं. महाराजांनीं आपल्याला जरी प्राणदान दिलं आहे. तरी आपल्या प्राणांपेक्षां प्रिय वस्तूचा ते मोबदला मागत आहेत.

**प्रताप०**—म्हणजे ? तुमच्या बोलण्याचा अर्थ मला समजला नाहीं.

**माना०**—मनुष्याची अब्रू मी प्राणांपेक्षां जास्त समजतों. महाराज तुमच्या अब्रूचा मोबदला मागत आहेत.

**प्रताप०**—मला असं संशयांत ठेवूं नका. सांगा काय आहे तें. माझ्या प्राणाबद्दलच्या गोष्टीकडे मी फारसें लक्ष दिलं नाहीं. परंतु माझी अब्रू—

**माना०**—प्रतापराव तुम्ही तें ऐकिल्यावर रागानें वेडावून जाल अशी मला भीति वाटते.

**प्रताप०**—बोला, बोला काय आहे तें. तुमच्या अशा संदिग्ध भाषणानें माझ्या अंगाला सहस्र वेदना होत आहेत.

**माना०**—प्रतापराव, मला वचन द्या. तुह्मी रागाऊं नका, असं मी म्हणत नाहीं. परंतु रागानं वेडे होऊन कांहीं तरी अघोर कृत्य करणार नाहीं एवढं तरी वचन द्या.

**प्रताप०**—कांहीं असलं तरी मी शांत राहीन असें मी वचन देतों. तुह्मी काय ह्मणालांत ? माझ्या अब्रूचा मोबदला—माझ्या घराण्याची पिढीजाद सरदारी तर— काढून घेत नाहींत !

**माना०**—नाहीं नाहीं. प्रतापराव, तुमची पिढीजाद सरदारी काढून घेतली असती तरी हरकत नव्हती. ती तर क्षुल्लक बाबत आहे. सरदारी गमाविली तर ती परत मिळवितां येते. प्रतापराव—मला सांगायलासुद्धां शरम वाटते. तुमच्या प्राणांबद्दल तुह्मी आपण होऊन आपली बहीण या कामांधाच्या विषयवासनेला बळी द्यावी असं त्याचं ह्मणणं आहे.

**प्रताप०**—काय ?

**माना०**—तुमच्या प्राणांचा मोबदला तुमच्या बहीणिनें दिला पाहिजे.

**प्रताप०**—( तरवार उपसून ) अरे अधमा, जयसेना ! तूं जरी अमृत प्याला असलास तरी हा प्रतापराव ह्या अपमानाबद्दल तुला स्वर्गाची वाट दाखवील. माझी बहीण–इंदिरा–हे स्वर्गस्थ पूर्वजांनों–तुमच्यानें हें ऐकवतं तरी कसं ? तुमच्या घराण्याच्या अपमानाचा सूड घ्यायाला पुन्हा ह्या पृथ्वीवर येण्याकरितां तुमचे आत्मे उसळ्या मारीत असतील ? माझी बहीण–या प्रतापरावाच्या राजनिष्ठेचें हेंच बक्षीस काय ?

**माना०**—आतां मला सांगा. अशा राजाचा विश्वासघात केला तर त्यांत काय पाप आहे ? असल्या पापी राजाला या विजयनगरचें सिंहासन भ्रष्ट करूं देण्यापेक्षां याचा निकाल लावला तर त्यांत काय गैर आहे ? विजयनगरांत कट्यारीसारखें बारीक हत्यारही उपयोगी आहे असं–ह्मटलं तर त्यांत पाप आहे काय ?

**प्रताप०**—नाहीं नाहीं. त्या अधमाच्या एका केंसालाही मी तुह्माला धक्का लावूं देणार नाहीं. त्याच्या प्राणाचा मालक मी आहें. त्याच्या काळजावर माझा हक्क आहे. त्याचं काळीज फाडून हा प्रतापरावच त्याचा प्राण घेणार. हा पहा मी असाच चाललों. भर दरबारांत सर्व सरदारांसमोर त्या हरामखोराला सिंहासनावरून खेंचून ठार मारितों. ( जाऊं लागतो. )

**माना०**—( त्यास आडवून ) थांबा ! थांबा ! दरबारांत तो कदाचित् तुमच्या हातून सुटेल परंतु जर तुमच्या मनांतच असेल तर सूड घेण्याची उत्तम संधी तो होऊनच आणून देत आहे. त्याचं ह्मणणं आहे कीं, आजच रात्रीं तुह्मीं त्याला आपल्या वाड्यांत मेजवानीला बोलवावं आणि मेजवानीची इतर मंडळी निघून गेली कीं, तुह्मीं स्वतः इंदिरेला त्याच्या स्वाधीन करावी.

**प्रताप०**—अरे नीचा ! माझ्या पूज्य पूर्वजांच्या किर्तीला कलंक लावून त्यांचाच वाडा कुंटणखाना बनवूं पाहतोस काय ? पुरे झालं. जास्त ऐकण्याची माझी इच्छा नाहीं. ( जाऊं लागतो. )

**माना०**—प्रतापराव, माझं ऐका. उतावळेपणानें तुमचा बेत ढांसळूं देऊं नका. महाराज तुमच्या वाड्यांत मेजवानीला येऊन तुमचा बहुमान करीत आहेत. ( प्रतापराव कांहीं बोलूं लागतो त्यास आडवून ) थांबा. माझें परत ऐकून घ्या.

मी त्याला सांगेन कीं, तुह्मीं सर्व अटी कबूल केल्या आहेत. तो तेव्हांच फसून जाईल आणि तुमचे जाळ्यांत सांपडेल. तो एकदां तुमचे तावडींत आला कीं, खुशाल तुमच्या अपमानाबद्दल त्याचा बळी घ्या.

**प्रताप०**—ठीक आहे. असेंच करतों तर. ह्या मसलतीनें तो माझ्या हातांतून निसटायची धास्ती नाहीं.

**माना०**—मग चलातर व्हा पुढं. मी आतांच जाऊन त्याला सांगतों कीं, आपल्या येण्यानं प्रतापरावाला फार मोठी धन्यता वाटत आहे. तुह्मी पुढली सर्व तयारी ठेवा.

**प्रताप०**—त्या नीचाचा प्राण घ्यायला माझ्या हाताची तर आतांपासून तयारी आहे.

**माना०**—चला तर. (दोघेही जातात. पडदा पडतो.)

## प्रवेश २ रा.

**स्थळ**–दौलतरावाच्या वाड्याचा बाहेरील भाग.

( दौलतराव व तारा येतात. )

**दौलतराव**—पोरी, तूं आज माझे प्राण राखलेस !

**तारा**—पण आतां असं करायचं ? वेशीवरचे सगळे पहारे उठलेले आहेत. तेव्हां आधीं इथून कुठंतरीं दुसरीकडे जाण्याचं पहावं !

( मुरारराव प्रवेश करितो )

**मुरारराव**—काकासाहेब आधीं तिकडे चलावं राईतल्या वेशीजवळ माझा नोकर उभा आहे. आणि तिथं दोन घोडीं खोगीर घालून तयार ठेविलीं आहेत. आपण रिकिबींत पाय ठेवायचा अवकाश ! कुठलं तरी सुरक्षित ठिकाण गाठावं; मीही आपल्याला पोंचवायला येतों.

**तारा०**—( समोर पाहून ) अगबाई ! हें काय ? श्रीधरपंडितांना सोडून दिलं वाटतं ? ते इकडेच येताहेत कुणीतरी त्यांची ओळख पटवून त्यांना मोकळं केलंसं दिसतं !

**मुरारराव**—कांहीं फिकीर नाहीं ! अजून सुटून जाण्यापुरता वेळ आहे. काकासाहेब आतां विलंब नको ! चलावंच.

**दौलतराव**—माझी कुठं ना आहे.

( एकदम नौबत, शिंगें वगैरे रणवाद्यांचा ध्वनि होतो, व हरहरमहादेव अशी गर्जना ऐकू येते. व फितूर–फितूर असा ओरडा होतो. )

**दौलतराव**—काय फितूर ( तुकोजी, व कांहीं शिपाई दौडत येतात. )

**तुकोजी**—पळा–पळा–फौजेंत फितूर झाला आहे. सरकारवाड्याला गराडा पडला. शहरभर फितुरी लोक पसरले आहेत. पळा–पळा—

**दौलतराव**—( तिरासारखा पुढें होऊन ) पळा–मुर्दाडा–पळण्याचं पुन्हां नांव तर काढ, कीं तुझी गर्दनच उतरतों. ( शिपायांस ) मर्दहो-फिरा मागं ह्या फितुरी निमकहरामाची खोड मोडायची संधी आयती चालून आली आहे–पोरा–

मुरारराावा आज बघ तुझ्या काकाची मर्दुमकी–मर्दहो–चला कचरतां कां ? फितुरांचा काळ हा सरदार दौलतराव जिवंत आहे–तोंपर्यंत––

( श्रीधरपंडित एकदम पुढें होऊन )

**श्रीधरपंडित**––ऐका, हा कबूल जबाब ऐका.

**तुकोजी**––सरदार दौलतराव साहेब–माफ करा–आपण आमचे कैदी आहां.

**दौलतराव**––अस्सं ? ठीक आहे. पण ह्या निमकहरामाची खोड जिरवल्यावर मी कैदी–तोंपर्यंत नाहीं.

**तुकोजी**––फितुऱ्यांची खोड जिरवायला महाराज आहेतच. आणि ते त्यांची खोड पक्की जिरवतीलही. सध्या ती काळजी आपल्याला नको. कारण फितुरीची ही हूल मी फक्त आपल्याकरितांच उठविली होती, अन् तिचा उपयोगही झाला.

**दौलतराव**––फसगत. पुरी फसगत. लढाईपरी लढाई नाहीं–आणि कैदीतर झालोंच.

**मुरारराव**—तुकोजी, शिपाई म्हणवतां आणि असं कसं फसवून पकडतां ? शिपायाला साजत नाहीं राव हें.

**तुकोजी**—राव काय.

**दौलतराव**––( मुराररावास ) चुप. चुप बस पोरा. आमची चुकी झाली, त्याला आतां कांहीं तोड नाहीं. तुकोजी हा मी तुमच्या स्वाधीन होतों.

**मुरारराव**––नाहीं काकासाहेब, इतक्यांत नाहीं आपण कैदी. तुकोजी कोणाच्या हुकमानं पकडतां ? तुमच्याजवळ महाराजांच्या सही शिक्याचा हुकूम कुठं आहे तो काढा.

**श्रीधरपंत**––ओ. हो. बिगर हुकूम पकडतां ? बे कायदेशीर अटक करतां ? कुठं आहे तुमचा हुकूम ( स्वगत ) माझ्याशीं गांठ आहे. पुरा सूड उगवतों मघांच्या माझ्या बिगरहुकूम अटकेबद्दल.

**मुरारराव**—–लेखी हुकूमच नाहीं तर कसे पकडणार काकासाहेबांना ? काकासाहेब अद्यापपर्यंत तर आपण मोकळे आहांत. यापुढं तुकोजीरावांनीं लेखी हुकूम आणला तर गोष्ट निराळी. तेव्हां आपल्या पहिल्या बेताप्रमाणें आपण रिकिबीस पाय लावा. हिरोजी महाराजांकडे गेला आहेच. आपल्याविषयीं त्यांचा काय मनोदय आहे तें निश्चित कळेपर्यंत कुठं तरी निर्धास्तपणें आणि गुपचुप असा म्हणजे झालं.

**तुकोजी**—बेत खासा आहे रावसाहेब–पण सरदारांना मी इथून जाऊं तरी खास देणार नाहीं. ( नाईकास ) नाईक चला, नाकेबंदी करा. अन् अगदीं खडा पहारा ठेवा. सरदारसाहेब नाइलाज आहे. सध्या आपण सगळेच आमचे कैदी अहांत.

**दौलतराव**—बरोबर आहे. आतां जाण्याची आशाच नको; या म्हाताऱ्याचं आतां काय व्हायचं असेल तें होईल, स्वराज्याकरितां तुर्कांशीं झगडायला आम्हीं ज्यावेळीं प्रथम समशेर उपसली, त्याचवेळीं आम्हीं हातावर शीर घेतलं आहे! महाराजांनीं मला जरी तोफेच्या तोंडीं दिलं, तरी तें हुकूम मोडून लढल्याबद्दल–हुकूम मोडून गनिमाला पाठ दाखविल्याबद्दल नाहीं कांहीं. अन् तेंच माझ्या जिवाला समाधान वाटत आहे.

**श्रीधरपंत**—सरदारसाहेब, आपण आतां आह्मांला सोडून जाणारच. तेव्हां आपल्या धनदौलतीची अखेरची कांहीं विल्हेवाट लावयचं मृत्युपत्र वगैरे लिहिणं असल्यास ही लेखणी आपल्या सेवेला—

**दौलतराव**—आग लाव तुझ्या लेखणीला आणि लिहिण्याला. ( श्रीधरपंडित दचकून मागें सरतो ) तारे बेटा, तूं रडूं नकोस. आतां रडून काय उपयोग? नशिबीं आलं आहे तें भोगलंच पाहिजे. बाळा मुरारराव, इकडे हात कर ( मुराररावाचा हात धरून त्याचे हातीं तारेचा हात देतो ) बाळांनो सुखानं नांदा–तुमचा जोडा देवानं एकमेकांकरितांच केला आहे. त्याचा न कळत विजोड करण्याचा वेडा विचार माझ्या डोक्यांत आला होता. पण परमेश्वराची योजना कांहीं चुकत नसते. बाळांनो देव तुमचं कल्याण करो. माझी काय धन दौलत आहे, ती सर्व तुमची आहे. महाराजांनीं मला कदाचित् क्षमा केलीच; तरीही ती आपणा सर्वांना पुरून उरण्यासारखी धनंतर आहेच.

**हिरोजीः**—( घाई घाईनें प्रवेश करून ) आनंदाची बातमी धनीसाहेब, हें पहा सरकारचं क्षमापत्र. महाराजांनीं आपली हकीकत शांतपणानं ऐकून घेतली आणि आपल्या सारख्या स्वामिभक्त सेवकाला त्रास सोसावा लागला ह्याबद्दल दिलगिरी दाखविली.

**दौलतराव**—महाराजांचा जयजयकार असो. माझी पुण्याई आज फळास आली. चला बाळांनो तुह्माला मी स्वतः महाराजांच्या पदरांत घालतों.

( सर्व जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

(स्थळ—बाग.)

(मानाजीराव व जयदेव येतात.)

**मानाजी०**—सरकार, या पलीकडल्या महालांत प्रतापरावानं आपली शय्या तयार करविली आहे. आपल्याला तिकडे नेण्याबद्दल मला सांगितलें आहे. प्रतापराव स्वतः इंदिरेकडे जाऊन तिला आपल्या महालांत घेऊन येण्याकरितां गेला आहे.

**जय०**—मानजीराव, आजच्या या भावी आनंदाचें सर्व श्रेय तुमच्याकडे आहे. आज होणाऱ्या या स्वर्गीय सुखाबद्दल हा जयदेव तुमचा ऋणी आहे.

**माना०**—(एकीकडे) स्वर्गीय कां ? आज मी तुला प्रत्यक्ष स्वर्गसुख देईन.

**जय०**—खरोखर मानाजीराव, मी जेव्हां 'द्वंद्वयुद्धांत विलासराव पडले' ही बातमी ऐकली तेव्हां मला फारच वाईट वाटलें. परंतु आतां ऐकलं कीं, विलासरावांना थोडी जखम मात्र झाली आहे, व त्यांतून ते लवकरच बरे होतील.

**माना०**—आतांच्या ऐन सुखाच्या वेळीं विलासरावाच्या] मृत्यूच्या बातमीनें महाराजांच्या मनांत निष्कारण खिन्नता उत्पन्न होऊन सुखाचा मात्र विरस झाला असता. विलासरावांना लहानशी जखम झाली आहे, त्यांत काळजी करण्यासारखं कांहींच नाहीं. जाऊं द्या सरकार. ही वेळ त्याबद्दलच्या विचाराची नाहीं. आपली प्रणयशय्या विलासरावाच्या विचारानं उगाच कठोर करून घेऊं नये.

**जय०**—आतां त्याची फारशी काळजी नाहीं. परंतु तुह्मी आतां जा व प्रतापरावांना प्रिये इंदिरेला लवकर पाठवून द्यायला सांगा.

**माना०**—हा असाच तिकडे जातों.

**जय०**—जा. जा. लवकर मला प्रत्येक क्षण कसा युगासारखा वाटतो आहे.

(दारांतून महालांत जातो.)

**माना०**—प्रत्येक क्षण युगासारखा वाटतो काय ? जयदेवा, क्षण, घटिका, प्रहर, दिवस, मास, वर्ष, आणि युग यासारख्या कालगणनेच्या भानगडींतून मी तुला लवकरच मुक्त करतों. आजची रात्र तरी या कामाला किती योग्य आहे ! अमावास्येची कालरात्र ! यावेळीं तुला सर्व सृष्टि स्मशानवत्

असून या महालांतील झगझगीत दिवे तुझ्या चिताग्नीचे ठिकाणीं आहेत. या सर्वांची पूर्णता व्हायला तुझ्याच देहाची जरूर आहे. आणि ती पूर्तताही लवकरच होईल. ( पडद्याकडे पाहून ) ओहो ! ही पहा आमच्या अक्कल-शून्य आणि खुळ्या हस्तकांची स्वारी इकडेच येत आहे. ( प्रतापराव येतो ) या, प्रियदोस्त या. एथपर्यंत तर तुमची कामगिरी पार पाडली. जयदेव अंत-र्महांत निजला आहे. तिथें त्याच्या प्रियसखी कट्यारीची आणि त्याची गांठ घालून द्या.

**प्रता०**—विलासराव मेले नाहींत हें मला आतांच कळलं. हेंच जर दोन प्रह-रांपूर्वी कळलं असतं तर बरं झालं असतं !

**माना०**—कां बरं ?

**प्रता०**—हें जर पूर्वी कळलं असतं तर जयदेव माझा असा अपमान करता ना आणि मलाही खून करण्याची पाळी आली नसती.

**माना०**—खून ! ! मला वाटत होतें कीं, तुह्मी तरी अशा ऐन वेळीं भलत्याच विचारनें आपला निश्चय डळमळूं देणार नाहींत. तुमच्या बोलण्यावरून एखाद्याला वाटेल कीं, आपण अंगिकारलेलें काम आपल्या लौकिकाकरितां करीत नसून स्वार्थाकरितांच करीत आहां.

**प्रता०**—मानाजीराव, हा प्रतापराव एखाद्या भाडोत्री मारेकऱ्याप्रमाणं त्याच्या खून कधींही करणार नाहीं. ज्या हातांत आजपर्यंत ही यशस्वी तरवार धरून वीराला साजेल अशीच मर्दुमकी गाजविली तोच हात आतां मारेकऱ्याच्या कट्यारीनं दूषित करून दुसऱ्या हातानं निःशस्त्र शत्रूचा गळा दाबून त्याचा खून करण्याचं काम हा प्रतापराव करणार नाहीं. जा, जा. नीच मारेकऱ्यांच्या हातांत शोभणाऱ्या घातकी कट्यारी, यापुढें तरी माझा हात विटाळूं नकोस ! ( कट्यार फेकून देतो ) तुमची तरवार इकडे द्या. तो दुष्ट निजला असला तर त्याला लाथ मारून जागा करून त्याच्या हातांत तुमची तरवार देतों, आणि द्वंद्वं युद्ध करून त्याचा प्राण घेतों.

**माना०**—हें काय तुह्मी वेड्यासारखं मनांत आणलंत ?

**प्रता०**—प्रतापराव अस्सल हाडाचा शिपायी आहे, मारेकरी नाहीं. हें जगाच्या दृष्टोत्पत्तीस आणणार.

**माना०**—द्वंद्वामध्यें कदाचित् जयदेवही विजयी होईल !

**प्रता०**—त्यांत काय आहे ? तसं झालं तर वीराला उचीत असेंच मरण मला येईल.

**माना०**—होय. राजाच्या हातून मरण्यांत भूषण आहे खरं; परंतु तुमच्या मरणानं तुमच्या घराण्याची अब्रू मात्र वांचण्याचा संभव नाहीं. इंदिरेला तुह्मी जिवंत असतां मिळणारा पाठिंबा तुमच्या प्रेताकडून मिळणार नाहीं. मग तिला या विषयांध जयदेवाच्या तडाक्यांतून सुटण्याची आशाच नको.

**प्रता०**—( विचार करून ) होय. असं होण्याचा संभव आहे खरा !

**माना०**—पण जाऊं द्या ! मघांपासून माझी चूक होते आहे. राजाशीं संबंध होण्यापासून तुमच्या घराण्याच्या होणाऱ्या बहुमानाचाही तुह्माला विचार केला पाहिजे.

**प्रता०**—( तरवार अर्धी उपसून ) काय पुन्हा बोला पाहूं ?

**माना०**—( संथपणें ) एकवेळ कां दहा वेळ बोलेन. जो असा अपमान सहन करून घेईल त्याची त्याला अर्धी मुर्धी संमति असलीच पाहिजे. तुमचा तो दोन प्रहरचा राग आणि तें अवसान गेलं कुठें ! मला वाटतं इंदिरा वाढायला आली त्यावेळीं राजानं तिच्या हाताला हळूंच केलेल्या स्पर्शानं तुह्मी सुद्धां थंड झालांत ! तुह्मी दरबारी मंडळींना आग्रह करण्यांत गुंतले असतां इकडे राजानं इंदिराबाईचा पदर धरून खेचला !

**प्रता०**—हें जर माझ्या त्या वेळीं लक्षांत आलं असतं तर तो मेजवानी पुरी करायला जीवंत राहिला नसता.

**माना०**—तेंच कशाला ? तुह्मी महाराजांना मेजवानीला बोलावलंत, प्रत्यक्ष राजवाड्यांत होणार नाहीं असा थाट केलात आणि महाराज आज इंदिराबाईच्या महालांत निजणार आहेत अशी बाहेर दाट बातमी पसरली आहे.

**प्रता०**—कोणाची हिंमत आहे अशी--

**माना०**—माझी हिंमत आहे. या बिजयनगरांतील प्रत्येक माणसाची हिंमत आहे. जर राजा तुमच्या येथून जिवंत परत गेला तर तो ज्या फुलाकरितां आला होता त्याचा गंध त्यानं चाखलाच असला पाहिजे. असं प्रत्येक इसम ह्मणणारच.

**प्रता०**—पुरे ! पुरे ! माझा निश्चय कायम झाला. जयदेव आज मेलाच पाहिजे.

**माना०**—शाबास ! आपल्या घराण्याचा अभिमान तुमच्यामध्यें पुन्हा जागृत झालेला पाहून मला खरोखर आनंद होतो आहे. ( कट्यार उचलून ) घ्या ही कट्यार, आणि करा आपलें काम फत्ते आणि हें लक्षांत ठेवा कीं तुमच्या घराण्याची अब्रू बचावण्यांत तुह्मी या विजयनगरचे रयतेवरही उपकारच करीत अहां. जा त्या पलीकडच्या महालांत जयदेव आहे. असेच जाऊन ही कट्यार त्याच्या कांळजांत खुपसा आणि रक्ताचा पाट वाहूं द्या.

**प्रता०**—ठीक आहे, एवढें झाल्यावर मी तुह्माला हाक मारतों.

**माना०**—मी जवळच आहे. पण हें पहा तुह्माला पाहतांच तो आपल्या प्राणाबद्दल गयावया करील आणि तुमच्यां कोमल मनाला दयेचा पाझर फुटेल, तसें होऊं देऊं नका त्याच्या प्राणदानाच्या आरोळ्यांना दाद न देतां इंदिरेच्या नांवाची क्षणोक्षणीं आठवण देऊन त्याचा प्राण घ्या ! ( जातात.

( पडदा पडतो. )—

## प्रवेश ४ था.

**स्थळ**--दिवाणखाना. भिंतीस मोठमोठ्या तसबिरा लावलेल्या आहेत व मागील बाजूस महालांत जाण्याचा दरवाजा आहे.

( प्रतापराव येतो )

**प्रताप०**—झाला ! ठाम निश्चय झाला ! जयदेव मेलाच पाहिजे.

**इंदिरा**—( आंतून ) थांब !

**प्रताप०**—( चपापून चोहोंकडे पाहून ) माझ्या विचाराच्या लहरी हवेंत मिसळल्यामुळें त्याचा आवाज कानीं आला. अद्याप एखाद्या मारेकऱ्याप्रमाणें मी खून करणार आहें असंच माझ्या मनाला कां वाटतं ? छे ! तें उपयोगी नाहीं. जयसेन मेलाच पाहिजे, सूडाच्या विचारानं डोकं भणभणून मन दगडासारखं झालं पाहिजे.

**इंदिरा**—( आंतून ) थांब !

**प्रताप०**—( पुन्हा चपापून ) अं ? आतां तर आवाज स्पष्ट ऐकूं आला. ( चोहोंकडे पाहून ) लांबून दिव्याच्या मंद उजेडांत कोणी तरी इकडेच येत आहेसं दिसतं. ( जरा थांबून ) कोण आहे ?

( इंदिरा पुढें येते )

**इंदिरा**—दादा !

**प्रताप०**—कोण ताई ! तूं माझ्या निश्चयाच्या आड येणार ?

**इंदिरा**—माझ्या महालाच्या खिडकींतून मी सहज रोषनाईची मौज पहात होतें. तों दिव्याच्या उजेडांत तूं आणि मानाजीराव बोलतांना दिसलांत. मानाजीरावासारख्या सर्व सद्गुणांच्या शत्रूबरोबर रात्रींच्या प्रहरीं तुझं येवढं काय चाललं आहे हें पहाण्याकारितां मी बाहेर आलें. तों तुमचा भयंकर बेत मीं ऐकिला. दादा, तूं काय खून करणार ?

**प्रताप०**—काय खून ?

**इंदिरा**--दादा ! मानाजीरावाकडून दुसरं तूं काय शिकणार ?

**प्रताप०**—पलिकडच्या महालांत राजा निजला आहे. मी तेथें जाऊन माझी कट्यार त्याच्या काळजांत खुपसणार !

**इंदिरा**—वा ! ! तुझ्या सरदारीला शोभण्यासारखंच काम आहे ! मी त्याला सध्यां राजा ह्मणून ओळखत नाहीं. तो आपला निमंत्रित पाहुणा आहे. दादा, तूं राजाला आमंत्रण केलंस ! तुह्मी दोघेही पंक्तीला जेवलांत !

**प्रताप०**—या राजानं माझे प्राण वांचविण्याबद्दल मोबदला मागितला आहे. तो मोबदला काय आहेसा तुला वाटतं ?

**इंदिरा०**—प्रतापरावाच्या प्राणांबद्दल या त्रिखंड पृथ्वीचा मोबदलाहि थोडाच होईल !

**प्रताप०**—माझ्या प्राणांचा मोबदला पृथ्वीचे मोलाहूनही जास्त मागितला आहे. आणि तोही तूं दिला पाहिजेस. माझ्या प्राणांकरितां तुझ्या कौमार्याचा बळी पाहिजे आहे !

**इंदिरा०**—( नुसता दीर्घ श्वास सोडते. )

**प्रताप०**—ताई, मी येईपर्यंत तूं इथंच उभी रहा. ह्मणजे त्या नीचाच्या प्राणांताच्या आरोळ्या तुला ऐकायला मिळतील.

( जाऊं लागतो )

**इंदिरा०**—थांब ! थांब ! दादा ! तुझा हात खुनाच्या रक्तानं माखूं नकोस !

**प्रताप०**—ताई !

**इंदिरा**—काय बरं !

**प्रताप०**—मीं स्वतः तुला:त्याच्या महालांत पोंहोंचवावां अशी राजाची इच्छा आहे. बोल तुझी तयारी आहे काय ?

**इंदिरा**—दादा; असा रागावूं नकोस. तूं महाराजांनाच इकड पाठीव.

**प्रताप०**—काय त्यालाच इकड पाठवूं ?

**इंदिरा०**—दादा, तुझा माझ्यावर विश्वास असेल तर मी सांगतें तसंच कर, आणि तूं बाजूला लपून रहा. प्रसंग पडल्यास तुला हांक मारीन.

**प्रताप०**—( एकीकडे ) हिच्या मनांत काय आहे समजत नाहीं. आतांपर्यंत तिच्या सद्गुणांवर माझा पूर्ण विश्वास आहे. तेव्हां हाही प्रयत्न करून पहावा.

**इंदिरा०**—दादा, महाराजांना इकड पाठवून दे.

**प्रताप०**—हिच्या नेत्रांत आज विलक्षण तेज दिसूं लागलं आहे. हें पापाचं खास नव्हे. तेव्हां ही ह्मणते त्याची प्रचीति पहातोंच! ( उघड ) सरकार, महाराज, ही पहा प्रतापरावानं इंदिरेला आपल्याकडे आणिली आहे. आपण बाहेर यावं.

( दारांतून जयसेन येतो. )

**जयसेन**—दोस्त प्रतापराव, तुमचे अनंत उपकार आहेत. मी तुह्मांला प्राण दिला इतकंच नाहीं तर आजच्या या आनंदाबद्दल मी तुह्मांला माझ्याजवळ दरबारांत जागा देईन. आणि तुमची सरदारी वाढवीन. तुह्मी बेफिकीर असा. जयसेन मित्रांना विसरत नाहीं.

**प्रताप०**—सरकार, माझ्यावर बहुमानाचा वर्षाव करीत आहेत. पण आतां माझी कांहीं इथं गरज नाहीं. मी रजा घेता.

( प्रतापराव खांबाआड लपतो. )

**जय०**—प्रिये, इंदिरे! आजच्या आनंदाच्या वेळीं तुझ्या चेहऱ्यावरील खिन्नता टाकून दे. अशी मान खालीं घालूं नको. एकाद्या अर्धमीलित सुंदर गुलाब कळीचा भार तिच्या कोमल देठाला सहन न होऊन तो लवून जरी आपल्या शिरावर धारण करींत असलेल्या कळीच्या सौंदर्यानें नम्र झालासें दाखवितो तरी त्यामुळें तो त्या सुंदर कलिकेचें—सौंदर्य नष्टच करतो. तद्वत्‌च तुझी खालीं घातलेली मान तुझा जरी विनय दाखविते तरी ती दैवी सौंदर्याची हानीच करते आहे. इंदिरे पहा; वर पहा. हा तुझा दास तुझ्या सेवेंत हजर आहे. हा तुला नेहमीं आपल्या हृदयांत बाळगून बाहेर तुझा बहुमानच करील.

**इंदिरा**ः—माझा बहुमान कसा होईल महाराज!

**जय०**—इंदिरे मी दर्जा वाढवीन. प्रत्यक्ष महाराणीचा इतमाम नाहीं इतका इतमाम तुझ्या सेवेंत ठेवीन. शेकडों दासदासी इंदिरेचा प्रत्येक शब्द झेलण्याला तयार रहातील. या विजयनगरांतील मोठमोठ्या मानी सरदारांच्या स्त्रिया तुझ्या पुढं नम्र होतील. आणि हा दास तुझ्या नित्य सेवेंतच धन्यता मानील. चल इंदिरे, ही खिन्नता सोडून दे. हें पाहिलंस कां? तुझ्या दादानं केलेल्या रोषनाईच्या उजेडानं या दिवाणखान्यांतील प्रत्येक वस्तूला कसं प्रसन्न केलं आहे, ह्या पाहिल्यास का तसबिरा. यांतील पुरुषांचे चेहेरे या दीपतेजानं कितीतरी प्रसन्न दिसताहेत!

चित्रकारानं या तसबिरा रंगविण्यांत आपल्या चित्रकलेची परमावधि केली आहे. परंतु विश्वकर्म्यानं रंगविलेल्या या सजीव पुतळीमध्यें सर्व चित्रांची शोभा एकवटून शतपट वृद्धिंगत झालेली दिसते.

**इंदिरा**—महाराज, आपण चिताऱ्याची कुशलता वाखाणलीत त्यांतच आपल्या मनाचा मोठेपणा दिसून येत आहे. या तसबिरा खरोखर आपल्या मनाला रिझवून आनंद देणार आहेत.

**जय०**—इंदिरे माझी अशी थट्टा करूं नकोस. प्रेमाच्या भाषणामध्यें मी कुशल नसेन. परंतु तुझ्या विषयींच्या प्रेमाचा सांठा हृदयांत पूर्ण भरलेला आहे.

**इंदिरा०**—नाहीं. नाहीं. महाराज ही थट्टा नव्हे. या माझ्या पूर्वजांचा तसबिरीकडे आपण किंचित् लक्ष पुरवावं अशीच माझी इच्छा आहे. ( एक तसबिरीकडे जाऊन ) हे पाहिलेत का ? आमच्या घराण्याचे मूळ पुरुष. यांना आपले पूर्वज विश्वसेन महाराज यांनीं त्यांच्या पराक्रमावर खुष होऊन झुंझारराव ही पदवी दिली. आपली स्वतःची विजयी ढाल यांना बहुमानानं नजर केली. तीच ही ढाल यांचे हातांत दाखविली आहे. पहा, पहा. महाराज ! ते कसे कुर्रेवाज नजरेनें जगाकडे पहात आहेत. त्यांची नजर पहाणाऱ्यांच्या हृदयाला भेदून जाते. जणूं काय आपल्या घराण्याचं पवित्र रक्त कोण दूषवित आहे याचा ते छडा लावीत आहेत.

**जय०**—आणि हें पाहिलंत का ? त्यांच्या चेहऱ्यावरची उग्रता प्रत्येक पिढीबरोबर कमीकमी होऊन शेवटीं या तुझ्या गोंडस तोंडावरील स्मित हास्यांत तिचं रूपांतर झालं आहे.

**इंदिरा**—हें पाहिलंत कां ? यांचं नांव गंभीरराव. यांना लोक खुनी म्हणत आहेत.

**जय०**—काय खुनी ! तुमच्या घराण्याला खुनाचा कलंक आहे हें मला माहित नव्हतं.

**इंदिरा**—त्यांच्या खुनाबद्दल आम्हाला मुळींच कमीपणा वाटत नाहीं. महाराज यांच्या किल्ल्याला तुर्कांचा वेढा पडला होता. त्यांनीं आपल्याकडून शिकस्त केली परंतु तुर्कांजवळ सैन्यबळ जास्त. त्यामुळें त्याचा निरुपाय झाला. व जेव्हां तुर्क किल्ल्याचा दरवाजा फोडून आंत शिरले तेव्हां त्यांनीं आपली एकुलती

एक मुलगी तुर्कांच्या हातीं सांपडूं नये म्हणून तिचा शिरच्छेद केला व लागलीच तीच तरवार आपल्यावर चालवून आत्महत्या करून घेतली.

**जय०**--प्रिये, इंदिरे. आतां या शुष्क बाबतींतच आपण वेळ घालवूं लागलों तर खरोखरच या ढिलाईमुळं माझ्या प्रेमाच्या तीव्रतेची तुला शंका येईल. लाडके, या मृतांच्या सहवासांत गेला इतका वेळ पुरे झाला. चल आतां महालांत जाऊं.

**इंदिरा**--महाराज आतां एकच तसबीर आपल्याला दाखवितें ती आपण शांतपणें पाहिलीत कीं ही इंदिरा आपल्या सेवेला तयार आहे. ही पहा महाराज. ही तसबीर आपल्या ओळखीची आहे काय ? ( तसबीर दाखविते ).

**जय०**--ही तुझ्या वडिलांची आहे.

**इंदि०**--( आनंदानें ) होय. ही माझ्या बाबांचीच तसबीर उदारचरित, सदाचरणी व वीर्यशाली मालोजीरावांचीच ही तसबीर ! महाराज आज आह्मी जरी एखाद्या खोपटांत रहात असतों, मिष्टान्न भोजनाबद्दल आह्माला जरी कंदमूलांवर रहावं लागतं तरी आमच्या बाबांच्या नांवाच्या कीर्तिरूप संपत्तीनें आह्मी मोठ्या श्रीमंत सरदारापेक्षांही सहस्रपट श्रीमान् असतों आणि अशा संपत्तीचं आह्मी भूषणचं मानलं असतं. माझे बाबा कोण होते ?

**जय०**--उदार मनाचे व सद्गुणी पुरुष होते.

**इंदि०**--एवढंच ! महाराज आपल्याला विस्मृती झालीशी दिसते. मी आपल्याला आठवण करून देतें. आपण जेव्हां लहान होतां तेव्हां आपल्याला राजकुमारास योग्य शिक्षण देण्याकरितां विजयनगरच्या सर्व सरदारांची आपले वडील विश्वसेन महाराजांनीं कसोटी घेतली त्यांत माझे बाबाच त्यांचे पसंतीस उतरल्यावरून त्यांनीं आपल्याला त्यांच्या स्वाधीन केलं, माझ्या बाबांनीं राजकुमारास योग्य असं व्यवहारिक आणि धार्मिक शिक्षण आपल्याला देऊन शस्त्रविद्येंतही आपणाला प्रवीण केलं. प्रत्यक्ष दादाला जी जी शस्त्रविद्या आमचे बाबांनीं शिकविली ती ती आपल्यालाही शिकविली. आपलं जसजसं तरुणवय होऊं लागलं तसं तसं शस्त्रविद्येंत आपलं प्राविण्य विशेष दिसूं लागलं. आपल्याला युवराजपद मिळाल्यावर सर्व सरदारपुत्र व राजकुमार यांची शस्त्रविद्येंत महाराजांनीं परीक्षा घेतली. त्यांत आपण व दादा यांनीं जमलेल्या सर्व कुमारांना पराभूत करून विजयमाला

मिळविली त्यावेळीं तर बाबा आनंदानं डुलूं लागले होते. तो काळ गेला. विश्वसेन महाराज वारले. आपण राजपदावर आलांत आपण तरुण आहांत, याचा फायदा घेऊन तुर्कांनीं विजयनगरावर स्वारी केली, गिरिदुर्गाच्या लढाईत बाबा आपले सन्निध होते ( जयदेव चपापतो ) असे चपापूं नका. आपल्या घोड्याशीं घोडा भिडवून बाबा लढत होते व जेव्हां एका दांडग्या तुर्काची तरवार आपल्या छातींत खास घुसते असं बाबांनीं पाहिलं त्यावेळीं झपाट्यानं घोडा मध्यें घालून तो वार माझ्या बाबांनीं आपले छातीवर घेतला व तुमच्या प्राणरक्षणाकरितां तुमच्या पायाजवळ आपला बळी दिला ( एकदम तसबिरीस मिठी मारते ) बाबा, बाबा तुमच्या कुडींत जरी प्राण नाहीं, हृदयांत ताजं रक्त उसळत नाहीं, बाहूंना चलन नाहीं, तरी मी ही पहा तुम्हाला कडकडून भेटते हं. महाराज आतां मी तयार आहें. या निर्जीव तसबिरीपासून मला सोडवा. या, या. आपली हिंमत असेल तर मला माझ्या बाबांच्या मिठींतून सोडवा. या, या. आपल्या प्राणदात्याचे उपकार त्याच्या मुलीचें कौमार्य भ्रष्ट करून फेडा.

**जय०**—इंदिरे, धन्य आहे तुझी ! आज तूं या जयदेवाच्या डोळ्यांत सणसणीत अंजन घालून त्याची धुंदी उतरवलीस. आतां मला माझा नीचपणा स्पष्ट दिसूं लागला आहे. माझ्या अंतःकरणांत दिव्य प्रकाश पडून त्यांत पूर्वीचा अधमपणा स्पष्ट दिसूं लागला.

**इंदिरा०**--जयदेव, तुम्हाला अंतःकरण आहे तर अझून तुमच्यांत माणुसकी शिल्लक आहे म्हणायची ! ( तसबिरीपासून दूर होऊन ) हृदया ! आनंदानं उचंबळूं नकोस. दादा ! दादा ! ( हाक मारते ) ( प्रतापराव येतो ) महाराज हा पहा दादा आला.

**प्रताप०**--( पुढें येऊन ) इंदिरे ताई. मला कडकडून भेटूं दे ( तिला मिठी मारतो ) आज तूं आमचा वंश धन्य केलास. मी तुमचें सर्व भाषण ऐकलं. मला वाटतं कीं आपल्या घराण्याच्या आदिदैवतानं तुझ्या शरीरांत आपलं दिव्यतेज घालून या अखिल जगाला सद्गुणाचा प्रभाव दाखवून चकित केलं [ राजाकडे वळून ] जयदेव--

**इंदि०**--दादा, महाराज हे इथं उभे आहेत.

**प्रता०**--तूंच त्यांना आज पुन्हां महाराज केलंस. तूंच त्यांच्या मस्तकांवर

पुन्हां हा विजयनगरचा राजमुगुट चढविलास. पुनराभिषिक्त महाराजांचा हा नम्र प्रजाजन प्रणाम करीत आहे.

**जय०**—उठा, उठा, प्रतापराव आपला महान् अपराधी हा जयदेवच आपली क्षमा मागतो आहे. आतां झालथा गोष्टी विसरून जा.

**प्रताप०**—सरकार या हृदयांत आतां त्यांना वास्तव्य मिळणार नाहीं. आपण या खांबाआड उभे रहा, व मी काय करतों त्याची सध्यां चौकशी करूं नका. [ जयदेव खांबाआड उभा राहतो ] ताई तूंही जरा आड जा. [ इंदिरा खांबाआड होते. ] [ मानाजीराव येतो. ]

**प्रता०**—मानाजीराव, मानाजीराव, झालें आपलें काम फत्ते झालें.

**मानाजी०**—मेला का तो ?

**प्रताप०**—तुह्मी सांगितल्याप्रमाणें माझी कट्यार थेट त्यांच्या काळजांत खुपसून दिली. आणि त्यांच्या प्राणदानाच्या विनवण्यांच्या वेळीं इंदेरेची त्याला क्षणोक्षणीं आठवण दिली.

**मानाजी०**—( हंसून ) हं असं काय ? ( आपला हात कपाळावरून हळूं हळू फिरवतो )

**प्रताप०**—काय ? यांत येवढं आनंदाची उसळी येण्यासारखं काय झालं ? तुह्मी आपला हात कपाळावरून असा कां फिरवतां ? इतकं विशेष काय झालं त्यांत ?

**मानाजी०**—(मोठ्यानं उपरोधिक हंसून ) वेड्या खुळ्या—

**प्रताप०**—कां बरं ? असं कां आतां ?

**मानाजी०**—एकूण तूं राजाचा वध केलास तर !

**प्रताप०**—मी फक्त तुमच्याच सांगण्याप्रमाणें केलं.

**मानाजी०**—आणि ह्मणूनच मी तुला खुळा ह्मणतों. जयदेवाच्या डोक्यावरून राजमुकुट काढून तूं आज या मानाजीचे शिरावर चढविलास आणि ह्मणूनच मी मघां आपल्या कपाळावरून हात फिरविला. त्याच वेळीं राजमुकुट माझे मस्तकावर आहेच असा मला भास झाला. पण खरं विचारशील तर राजपद माझं झालं या याबद्दलच्या आनंदापेक्षां तुझ्यासारख्या मूर्खाकडून तें मिळवून घेतलें यांत मला जास्त आनंद होत आहे.

**प्रताप०**--मानाजीराव, तुह्मींच मला राजाचा वध कर ह्मणून सांगितलंत ?

**मानाजी०**--हो, आणि ज्याअर्थी तूं आतां राजाचा खून केलाच आहेस, त्याअर्थी तुला आणखीहि सांगतों. इंदिरेविषयीं वाईट विचार मीच जयदेवाच्या मनांत प्रथम भरवून दिले. आणखी ऐक. तुझ्या प्राणाबद्दल इंदिरेच्या कौमार्याचा बळी मागण्याचा सल्ला जयदेवाला मींच दिला.

**प्रताप०**--काय तुह्मीं ?


**मानाजी०**--तुला आणखी सांगतों ऐकून ठेव. उद्यां मी विजयनगरचा राजा होणार ! माझ्या पक्षाच्या तीनहजार लोकांनां मला राजा होण्याची विनंति करण्याबद्दल पूर्वींच तयार करून ठेविले आहेत. आणि मी एकदां राजा झालों कीं प्रथम जयदेवाच्या वधाबद्दल तुला फाशीं देणार. आणि मांग तुझ्याभोंवतीं फास लावीत असतां हा मानाजीराव इंदिरेच्या गळ्यांत हात टाकून तिच्यासह तुझी मजा पहायला येणार ! ( पाय हापटून ) कोण आहेरे तिकड ! ( चार पांच पहारेकरी येतात ) पकडा या राजघातक्याला ! यानं आपल्या जयदेव महाराजांच वध केला आहे. ( राजा पुढें येतो त्यास पाहून चपापून ) हें काय आहे ! मी काय स्वप्नांत आहें ! कीं माझी कल्पनाच जयदेवाची छाया उत्पन्न करून मला भेवडवूं पहाते आहे !

**जय०**--मानाजीराव--

**माना०**--( एकीकडे ) जयदेवच हा. हा तर जिवंत आहे. माझा घात झाला. परंतु आतां भिऊन उपयोगी नाहीं. माझ्या बुद्धिमत्तेनं आज यापेक्षांही दुर्धर प्रसंगांतून मला पार पाडलं आहे. ( उघड ) महाराज आपण का ? या घातकी राजद्रोह्याच्या जाळ्यांतून आपण सुखरूप पार पडलेले पाहून या आपल्या सेवकाला किती तरी आनंद होत आहे ! ( गुडघे टेकून मुजरा करतो. )

**जय०**--कपट्या, ऊठ उभा रहा. तुझ्या स्पर्शानें माझे कपडे विटाळवूं नकोस. तुझं सर्व कपट मला पूर्णपणें कळून आलं. कोण आहेरे ! पकडा या हरामखोराला.

**माना०**--( तलवार उपसून ) खबरदार ! दूर उभे रहा. ( शिपाई मागें सरतात ) माझ्या तरवारीचा प्रभाव यांनीं आजवर नुसता पाहिला आहे पण आतां त्यांना तो अनुभवावा लागेल. माझा विश्वासघात झाला आहे तरी मी भीत नाहीं. सिंह जरी खड्डांत सांपडला तरी त्याचेबरोबर दोन हात करून त्याला पकडण्या-



**माना०**—हें काय आहे कीं माझी कल्पनाच जयदेवाची छाया उत्पन्न करून नेत्रद्वारा पहात आहे. ( पृष्ठ ८२. )

फोटोग्राफर्स गुरुदास ॲन्ड को. ]

ची या भ्याडांची काय छाती आहे ? ( राजास ) तूंच या कामाला योग्य आहेस तूं पुढं येत नसलास तरी माझी तलवार तुझा प्राण घेतल्यावांचून राहणार नाहीं. ( राजाचे आंगावर जातो, प्रतापराव त्याला जखमी करतो ) प्रतापराव, या वेळीं तूं जिंकलं आहेस. मी आतां मरणार. या वेळीं माझ्या तोंडांतून विषारी श्वास निघते तर तेसुद्धां तुझ्या शरीरावर सोडून त्याचा कोळसा केला असता. पण थांब, तूं असा कसा सुटणार ? ( तलवार उचलण्याचा प्रयत्न करतो परंतु खालीं पडतो व मरतो. इंदिरा येते व प्रतापरावास मिठी मारते )

**इंदि०**—दादा ! दादा ! मी सर्व पाहिलं ! परमेश्वरानं आज महाराजावरचं संकट टाळलं ह्मणायचं ।

**जय०**—प्रतापराव तुह्मीं मला जिवदान दिलंत ! प्रिय भगिनी इंदिराबाई हा जयदेव आपल्याला दिलेल्या त्रासाबद्दल पुन्हां क्षमा मागतो आहे. ( विलासराव येतो )

**विला०**—कुठं आहे ? कुठं आहे माझी प्रिया इंदिरा ( इंदिरेजवळ येऊन ) प्रिये, इंदिरे हा दास तुझा सर्वस्वी अपराधी आहे. तूं सर्वस्वी निरपराधी असून मी तुझा नाहक छळ केला त्याबद्दल मला क्षमा कर. ( तिच्या पायां पडतो )

**इंदि०**—( उठवून ) हें काय बाई भलतंच ! हा माझ्या नशिबाचाच खेळ झाला. त्यांत मी आपल्याला मुळींच दोष देत नाहीं.

( दौलतराव, मुरारराव, तारा, व हिरोजी येतात. )

**दौलत०**—सरकार हा महान अपराधी दौलतराव आपल्याला प्रणाम करतो आहे. महाराजांनीं कृपावंत होऊन या सेवकाला क्षमा केली आहे. हे माझ्यावर अनंत उपकार आहेत.

**जयदेव०**--दौलतराव, आपल्यासारखे स्वामिभक्त सेवक या राज्यांत लाभले आहेत ह्मणूनच आमची दौलत कायम आहे. तुमच्या सर्व अपराधांची माफी करून-पूर्वीचेच मानमरातब तुमचेकडे कायम राहतील. ( मुराररावाकडे पाहून ) हे कोण ?

**दौलत०**--हा माझा पुतण्या मुरारराव. सरकारचरणावर घालण्याकरितां मुद्दाम आणिला आहे.

**जय०**--वा ! आनंदाची गोष्ट आहे. मान्यांच्या घराण्यांतील पुरुषांची या राज्याला फारच आवश्यकता आहे. ( विलासरावाकडे पाहून ) विलासराव !

**विलास०**--सरकार.

**जयदे०**--राजभगिनी इंदिरेचा आपणच स्वीकार करावा अशी माझी तुह्माला विनंति आहे. ती आपल्याला सर्वतोपरी योग्य आहे. आमच्या भगिनीला देणगी ह्मणून मानाजीचं रिकामं झालेलं अमात्यपद आह्मी आपल्याला आनंदानं अर्पण करीत आहों. ( मुराररावाला ) सरदार मुरारराव, विलासरावांचे दरबारांतले हुद्दे आजपासून आपल्याकडे दिले आहेत. मान्यांच्या घराण्याला साजेल अशीच सेवा आपल्याकडून होईल अशी आमची खात्री आहे. आपली राजनिष्ठा पूर्वीप्रमाणंच कायम ठेवून, या नव्या वैभवाचा तुह्मीं उभयतांनीं दीर्घ काल उपभोग घ्यावा.

**इंदिरा०**--आमच्या पुण्यशील बाबांच्या कृपाप्रसादानं आजचा हा आनंदाचा दिवस दिसला. तसंच आमचं आयुष्य त्यांच्या प्रसादानं आनंदानं जावो अशी जगन्नियंत्याला या दीन कन्येची प्रार्थना आहे !

समाप्त.